सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# जागतिक अर्थसत्तेकडे भारताची वाटचाल

**लक्ष्यवेध** — प्रतिनिधी

भारतीयांसाठी न्यूझीलंड हा देश आज-वर प्रामुख्याने दोनच गोष्टींसाठी परिचित होता. एक म्हणजे, क्रिकेटच्या मैदानावरील एक कडवा प्रतिस्पर्धी म्हणून आणि दुसरे म्हणजे, निसर्गसौंदर्याने नटलेला, पर्यटनासाठी भुरळ घालणारा किवींचा देश म्हणून. न्यूझीलंडचे बर्फाच्छादित डोंगर, हिरवागार निसर्ग आणि तिथली शांतता भारतीयांना नेहमीच खुणावत आली. उच्च शिक्षणासाठी जाणारा एक मर्यादित वर्ग सोडला, तर दोन्ही देशांमधील संबंध हे सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रापुरतेच मर्यादित. नुकतीच नवी दिल्लीत स्वाक्षरी झालेल्या भारत- न्यूझीलंड मुक्त व्यापार करार, दोन्ही देशांतील संबंध भक्कम करणारा ठरला आहे. या करारामुळे न्यूझीलंडची ओळख आता आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करण्याच्या भारताच्या प्रवासातील एक अत्यंत विश्वासार्ह व्यापारी मित्र अशी प्रस्थापित होणार आहे.

या करारातील अनेक ठळक तरतुदी भारताच्या भविष्यातील अर्थकारणाला दिशा देणाऱ्या आहेत. सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, या करारामुळे भारतीय वस्तूंना न्यूझीलंडच्या बाजारपेठेत करमुक्त प्रवेश मिळणार आहे. यात प्रामुख्याने कापड उद्योग, चामड्याच्या वस्तू, दागिने, अभियांत्रिकी उत्पादने आणि औषधनिर्माण क्षेत्राचा समावेश आहे. दुसरे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सेवाक्षेत्राला मिळणारी चालना.

न्यूझीलंडने भारतीयांसाठी व्हिसा प्रक्रियेत मोठी शिथिलता आणण्याचे मान्य केल्याने, भारतीय तरुणांसाठी न्यूझीलंडमध्ये रोजगाराच्या नवीन संधी सहज उपलब्ध होणार आहेत. त्याचबरोबर, पुढील १५ वर्षांत न्यूझीलंडकडून भारतात तब्बल २० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचे लक्ष्यही करारांतर्गत निश्चित करण्यात आले आहे. ही गुंतवणूक प्रामुख्याने अन्नप्रक्रिया उद्योग, नवीकरणीय ऊर्जा, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा यांसारख्या अत्यंत कळीच्या क्षेत्रांमध्ये होणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात कोणताही करार तेव्हाच यशस्वी होतो, जेव्हा तो दोन्ही बाजूंच्या फायद्याचा असतो. भारत- न्यूझीलंड मुक्त व्यापार करार याचेच उत्तम उदाहरण ठरावे. न्यूझीलंडच्यादृष्टीने विचार केल्यास, त्यांच्या उत्पादनांसाठी आणि तंत्रज्ञानासाठी एका विशाल बाजारपेठेची नितांत आवश्यकता होती. गेल्या काही वर्षांत न्यूझीलंडसारख्या देशांना, चीनवरील अति- अवलंबित्व महागात पडल्याचे जाणवले होते. अशा स्थितीत, भारतासारखी १४० कोटी लोकसंख्येची, राजकीय स्थैर्य असलेली आणि सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था त्यांना सुरक्षित पर्याय वाटणे स्वाभाविकच.

**भारतातून नुकतीच न्यूझीलंडसोबत ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. पुढील १५ वर्षांत २० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य यातून निर्धारित करण्यात आले. हा करार दोन देशांतील व्यापारी संबंधच नव्हे, तर जागतिक अर्थकारणातील भारताचे वाढते वर्चस्व सिद्ध करणारा ठरला आहे.**

भारताला यातून काय मिळणार? तर भारताला न्यूझीलंडचे प्रगत तंत्रज्ञान, विशेषतः कृषी आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातील जागतिक दर्जाची कौशल्ये मिळणार आहेत. आपल्याकडे हजारो टन शेतमाल योग्य साठवणुकीअभावी वाया जातो. न्यूझीलंडचे तंत्रज्ञान यावर रामबाण उपाय ठरू शकते. त्याशिवाय, भारतीय उत्पादनांसाठी न्यूझीलंडची बाजारपेठ खुली झाल्यामुळे, भारताच्या निर्यातीला मोठे बळ मिळणार आहे. तसेच, इंडो- पॅसिफिक क्षेत्रात चीनच्या वाढत्या हस्तक्षेपाला आळा घालण्यासाठीही, भारताला न्यूझीलंडसारख्या विश्वासार्ह देशाची तितकीच मदत होणार आहे. या करारातून भारतातील व्यापारी, उद्योजक आणि गुंतवणूकदारांचे हित कसे साधले जाईल, हा अत्यंत कळीचा प्रश्न आहे. आजवर भारतीय उत्पादनांना न्यूझीलंड बरोबरच्या व्यापारात विविध शुल्कांना सामोरे जावे लागत होते. परिणामी, आपली उत्पादने महाग ठरतानाच, चीन किंवा अन्य आग्नेय आशियाई देशांच्या उत्पादनांसमोर स्पर्धेत मागे पडत असत. आता हे आयातशुल्क शून्य झाल्यामुळे, महाराष्ट्रातील कापूस आणि वस्त्रोद्योग, गुजरातमधील हिरे व्यापारी, तसेच दक्षिणेतील अभियांत्रिकी उत्पादने न्यूझीलंडच्या बाजारपेठेत अधिक स्वस्तात उपलब्ध होतील. आपल्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठीही ही एक सुवर्णसंधीच आहे. त्याशिवाय, न्यूझीलंडकडून येणाऱ्या गुंतवणूकीमुळेही देशात लाखो नवीन रोजगार निर्माण होतील. अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील मुद्दा होता, तो भारतीय शेतकऱ्यांच्या, विशेषतः दुग्ध व्यवसायिकांच्या हिताचा. न्यूझीलंड हा दुग्धजन्य पदार्थांचा जगातील सर्वांत मोठा निर्यातदार देश आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पादनांना भारतात मुक्त प्रवेश दिला, तर भारतीय दुग्ध व्यवसायाला त्याचा फटका बसण्याची भीती होती. मात्र, भारत सरकारने अत्यंत मुत्सद्दीपणे या करारात भारतीय शेतकऱ्यांचे हित जपले आहे. भारत सरकारने संवेदनशील क्षेत्रांना संरक्षण देत, केवळ पूरक क्षेत्रांमध्येच दरवाजे खुले केले आहेत, हे विशेष अभिनंदनीय आहे. आपण सध्याच्या व्यापार आकडेवारीवर नजर टाकल्यास, दोन्ही देशांमधील व्यापार भारताच्या इतर देशांसोबतच्या व्यापाराच्या तुलनेत फारच कमी, म्हणजे साधारणतः १.५ ते २ अब्ज डॉलर्सच्या आसपास आहे. पण, आता परिस्थितीत आमूलाग्र बदल होणार आहे.

न्यूझीलंडची संपूर्ण बाजारपेठ भारतासाठी खुली झाल्याने, येत्या पाच ते सात वर्षांतच हा द्विपक्षीय व्यापार दुप्पट किंवा तिप्पट होण्याची शक्यता आहे. भारताचे 'क्ट ईस्ट' आणि प्रशांत महासागर क्षेत्रातील व्यापार वृद्धीचे धोरणही या करारातून अधिक गती घेईल. भारताने नुकतेच संयुक्त अरब अमिराती, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांसोबत यशस्वीरित्या मुक्त व्यापार करार केले. मॉरिशससारख्या देशाशी आपण करारबद्ध झालो आहोत आणि आता न्यूझीलंडने भारतासोबत भागीदारी केली आहे. भारताची जागतिक महासत्तेशी म्हणजेच अमेरिकेशी, तसेच युरोपीय महासंघ आणि इंग्लंडबरोबर व्यापार कराराबाबत अतिशय सकारात्मक चर्चा सुरू आहे. महामारीनंतर जगाला हे कळून चुकले आहे की, जागतिक पुरवठा साखळी एका देशावर अवलंबून ठेवणे किती धोकादायक आहे. त्यामुळे जगभरातील देश आता 'चायना प्लस वन' हे धोरण अवलंबत आहेत. अशा वेळी, जगाला भारताशिवाय अन्य कोणताही सशक्त पर्याय दिसत नाही.

(पान ६ वर)

**वेध** — अनय जोगळेकर



# सांगा 'नरकाचे द्वार' नेमके कोणते?

**वाढती महागाई, घटते रोजगार, जनतेमध्ये राष्ट्रप्रमुखांविषयी खदखदणारा असंतोष, बाललैंगिक शोषणाचे जगाला लाज आणणारे कलंकित प्रकरण आणि आता खुद्द राष्ट्राध्यक्षांवरील हल्ल्याचा प्रयत्न... ही कुठल्या 'थर्ड वर्ल्ड'मधील देशाची नव्हे, तर स्वतःला 'महासत्ता' म्हणून मिरवणाऱ्या अमेरिकेची सद्यस्थिती. हे पाहता, तुम्हीच सांगा मग नेमके 'नरकाचे द्वार' कोणते?**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येचा तिसरा प्रयत्न अयशस्वी ठरला. दि. २५ एप्रिलला वॉशिंग्टन येथील 'हिल्टन हॉटेल'मध्ये 'व्हाईट हाऊस'मधून वार्तांकन करणार्या विविध माध्यमांच्या प्रतिनिधींसाठी एका वार्तालापाचे आयोजन करण्यात आले होते. ट्रम्प यांनी पहिल्यांदाच अशा कार्यक्रमाचे आयोजन केले असल्यामुळे, तसेच सध्याच्या अमेरिका आणि इराणमधील वाटाघाटींच्या पार्श्वभूमीवर ते काय बोलतात, याची उत्सुकता होती. कार्यक्रमाला सुमारे २ हजार, ५०० लोक उपस्थित होते. डोनाल्ड ट्रम्प, जे. डी. व्हान्स आणि ट्रम्प यांच्या मंत्रिमंडळातील सहकारी मंचावर असताना गोळ्या झाडल्याचा आवाज झाला आणि सुरक्षारक्षकांनी सगळ्या अभ्यागतांना सुरक्षित जागी हल नंतर लक्षात आले की, कॅलिफोर्नियामध्ये राहणाऱ्या ३१ वर्षीय कोल थॉमस लन या अभियंत्याने शस्त्रास्त्रांसह घुसण्याचा प्रयत्न केला.

ट्रम्प यांच्या सुरक्षारक्षकांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला असता, त्याने गोळीबार केला. हल्लेखोराने हल्ल्याच्या दहा मिनिटांपूर्वी आपण हल्ला कशासाठी करत होता, याचा जाहीरनामा आपल्या कुटुंबीयांना पाठवला होता. तो हिल्टन हॉटेलमध्येच मुक्कामाला होता. अमेरिकेच्या अध्यक्षांच्या कार्यक्रमामधील ढिसाळ सुरक्षा व्यवस्था पाहून अनेकांना आश्चर्य वाटते. दि. १३ जुलै २०२४ रोजी पेन्सिल्विनियातील बटलर येथे डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर सभेतील भाषणादरम्यान गोळ्या चालवण्यात आल्या. एक गोळी कानाला चाटून गेल्यानंतर ज्या त्वरेने ट्रम्प खाली वाकले आणि तेथील सुरक्षा रक्षकांनी हल्लेखोराला मारल्यानंतर ज्या निग्रहाने त्यांनी रक्तबंबाळ चेहर्यासह हाताची मूठ आवळून उपस्थित जनसमूहाला आपला लढा चालू ठेवण्याचा आदेश दिला, त्यामुळे अमेरिकेच्या निवडणुकीचे पारडे फिरले. त्यानंतर फ्लोरिडा येथे ट्रम्प यांच्या गोल्फ कोर्सवरही त्यांच्या हत्येचा प्रयत्न अयशस्वी झाला. अमेरिकेत राजकीय हिंसाचार जुना नाही. आतापर्यंत अमेरिकेच्या चार अध्यक्षांच्या हत्या झाल्या असल्या, तरी १९८१ साली अध्यक्ष रेनॉल्ड रिगन यांच्या हत्येच्या अयशस्वी प्रयत्नानंतर अध्यक्षांना लक्ष्य करण्यात हल्लेखोरांना यश आले नव्हते. त्यामुळे जगातील सगळ्यात जुनी लोकशाही व्यवस्था म्हणून ओळख असणार्या अमेरिकेत पुन्हा एकदा राजकीय हिंसाचाराचे पर्व सुरू झाले का, अशी भीती वाटणे स्वाभाविक आहे.

गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी उजव्या विचारसरणीचे मायकल सॅवेज यांच्या पॉडकास्टमधील संवादाची चार पानी पोस्ट समाजमाध्यमांत शेअर केली. त्यात एकूणच स्थलांतरितांबद्दल आणि विशेषतः भारतीय स्थलांतरितांबद्दल अनेक अपमानास्पद दावे केले होते. अमेरिकेतील भारतीय वंशाचे उद्योजक अमेरिकन तरुणांऐवजी भारता-तून आलेल्या लोकांना नोकर्या देतात. त्यांना धड इंग्रजीही बोलता येत नाही. अमेरिकेत मूल जन्माला आले की, त्याला तत्काळ नागरिकत्व मिळते आणि मग हे लोक भारत, चीन किंवा जगातील अन्य कुठल्यातरी 'नरकमय' भागातून आपले संपूर्ण कुटुंब अमेरिकेत आणतात. हे मत स्वतः ट्रम्प यांचे नसले, तरी त्यांनी ते समाजमाध्यमांवर प्रसारित करून एका प्रकारे त्याला आपला पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले.

लवकरच अमेरिकेच्या संसदेमध्ये 'एचबी व्हिसा' कार्यक्रम पुढील काही वर्षे गोठवून त्यानंतर त्यात मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्याबाबतचे विधेयक सादर करण्यात आले आहे. त्यात 'एच१बी व्हिसा'ची लॉटरी पद्धत बंद करणे, वार्षिक मर्यादा ६५ हजारांहून २५ हजारांवर आणणे, तसेच वर्षाला किमान दोन लाख डॉलर पगार असणाऱ्यांनाच या व्हिसासाठी पात्र ठरवण्याच्या अटी टाकण्यात आल्या आहेत. या सगळ्या गोष्टी वेगवेगळ्या दिसत असल्या, तरी त्या एकाच श्रृंखलेचा भाग आहेत.

अमेरिका पूर्णपणे दुभंगलेली आहे. अमेरिकेतील मूठभर लोक उच्च तंत्रज्ञान क्षेत्राद्वारे संपूर्ण जगावर राज्य करत आहेत, पण दुसरीकडे तेथील कोट्यवधी श्वेतवणय लोकांना आपल्या कुटुंबाचे पालन-पोषण करण्यासाठी दोन किंवा तीन नोकऱ्या कराव्या लागत आहेत. अमेरिकेत पैसे वाचवायची पद्धत नसल्यामुळे अनेक तरुणांना उच्च शिक्षण परवडत नाही. कर्ज काढून उच्च शिक्षण घेतले, तर 'एआय' तंत्रज्ञानामुळे नोकऱ्या मिळत नाहीत. आपल्या समस्यांना जगातील इतर भागांतून आलेले लोक कारणीभूत आहेत, असा त्यांचा विश्वास. गंमत म्हणजे, पारंपरिकरित्या डाव्या डेमोक्रॅटिक पक्षाला मतदान करणार्या भारतीय लोकांनी २०२४ सालच्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाच्या अति-डाव्या, तसेच मुस्लीमधार्जिण्या धोरणांना कंटाळून मोठ्या संख्येने ट्रम्प यांच्यासाठी निधी संकलन आणि मतदानही केले. तेव्हा अशी अपेक्षा होती की, ट्रम्प यांच्या विजयामुळे वर्षानुवर्षे रिपब्लिकन पक्षावरील श्वेतवणय वंशवादी लोकांचा प्रभाव कमी होईल आणि अमेरिकेतील भारतीयांना त्यात योग्य ते स्थान मिळेल. ट्रम्प यांच्या विजयामध्ये अमेरिकेच्या औद्योगिक पट्ट्यातील श्वेतवणय श्रमिकांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांचा भारतीयांकडे बघण्याचा दृष्टिकोन धार्मिक किंवा वंशवादी नसला, तरी तो स्वच्छ नाही. बाहेरून आलेल्या लोकांमुळे अमेरिकेतील श्वेतवणय लोकांना रोजगार मिळत नाहीत, अशी त्यांची धारणा. ज्याप्रमाणे महाराष्ट्रात आणि देशाच्या अन्य भागांत भूमिपुत्रांचे राजकारण करणारे पक्ष परप्रांतीयांकडे पाहतात, त्याचप्रमाणे हे लोक अमेरिकेत येऊन स्थायिक झालेल्या आणि अमेरिकेचे नागरिकत्व मिळवलेल्या भारतीयांकडे पाहतात.

सध्याच्या इराण युद्धाला या वर्गाचा मोठ्या प्रमाणात विरोध आहे. अमेरिकेने जगाचे प्रश्न न सोडवता, अंतर्गत विषयांत लक्ष घालावे, असे त्यांचे मत. इराणमधील युद्ध एक-दोन आठवड्यांत संपेल, अशी ट्रम्प यांची धारणा असल्यामुळे त्यांनी या पाठीराख्यांचे मत विचारात न घेता, युद्धामध्ये उडी घेतली. इराणमधील युद्धाला दोन महिने पूर्ण होत असताना, त्याचा अंत दृष्टिपथात नाही. या युद्धामुळे अमेरिकेत महागाई मोठ्या प्रमाणावर वाढली असून, गॅसोलिनच्या किमती ५० टक्के वाढून एक गॅलनला चार डॉलरच्या वरती पोहोचल्या आहेत. पुढच्या महिन्यात त्या पाच डॉलरचा आकडा पार करतील, असा अंदाज आहे. परिस्थिती अशीच राहिली, तर नोव्हेंबर २०२६ मध्ये होणार्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला सिनेट, तसेच प्रतिनिधीगृहातील आपले बहुमत गमवावे लागेल. युद्ध अर्ध्यावर सोडले, तर इराण होर्मुझच्या आखातातून करवसुली करून युद्धात झालेले नुकसान भरून काढण्यासोबतच अण्वस्त्र बनवण्याच्या प्रयत्नांना वेग देईल.या परिस्थितीत ट्रम्प आपल्या युद्धविरोधी मतदारांचे लक्ष इतरत्र वळवण्याचे प्रयत्न करत आहेत. अमेरिकेतील भारतीयांना त्याची किंमत चुकवावी लागत आहे. ट्रम्प यांची खेळी निवडणुकांकडे लक्ष ठेवून केली असली, तरी त्यातून समाजमन कलुषित होत आहे. 'झोहो' या जगप्रसिद्ध भारतीय कंपनीचे संस्थापक श्रीधर वेम्बू यांनी एका 'ट्विट'द्वारे अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांना साद घातली आहे. ते म्हणतात, जसे मी ३७ वर्षांपूर्वी केले होते, तसेच तुम्हीही अमेरिकेत पैशांशिवाय, पण उत्तम शिक्षण आणि भारताचा सांस्कृतिक वारसा घेऊन आलात. तुम्ही उल्लेखनीय यश मिळ अमेरिका आपल्यासाठी अनुकूल ठरली; त्याबद्दल आपण कृतज्ञ राहिले पाहिजे.

(पान ६ वर)

विश्वसंचार मल्हार कृष्ण गोखले

# 'एल्डरिज' युद्धनौका 'टेलिपोर्ट' झाली. आत्ता होती, कुठे गेली?



**होर्मुझ सामुद्रधुनीच्या नाकेबंदीमुळे अनेकांच्या कल्पनाशक्तीला भलतेच धुमारे फुटायला लागले आहेत. दि. २८ ऑक्टोबर १९४३ या दिवशी 'यू. एस. एस. एल्डरिज' ही अमेरिकन नौदलाची विनाशिका 'फिलाडेल्फिया' नाविक तळावरून एकाएकी गायब झाली आणि ३२० किमी दूरच्या नॉर्फोक बंदरात प्रकट झाली. याला एखादी वस्तू 'टेलिपोर्ट होणे' असे म्हणतात. पर्शियन आखातातून येणारे तेलाचे टँकर्स अशा रितीने 'टेलिपोर्ट' करता येतील का, याबद्दल लोक चर्चा करीत आहेत. असे अर्थातच करता येणार नाही. पण, यानिमित्ताने अमेरिकन समाजमानसात कोणकोणत्या 'कॉन्स्पिरसी थिअरीज' धुमाकूळ घालत असतात, त्याकडे एक दृष्टिक्षेप टाकूया.**

भारताचा संपूर्ण आर्थिक व्यवहार रिझर्व्ह बँक संचालित करते; पण खुद्द रिझर्व्ह बँक भारत सरकारच्या अर्थमंत्रालयाद्वारे संचालित केली जाते. अमेरिकेत असे नाही. फेडरल रिझर्व्ह बँक ही सगळे आर्थिक व्यवहार संचालित करते, पण ती फेडरल गव्हर्नमेंटच्या म्हणजे अमेरिकन केंद्र सरकारच्या अधीन नाही. असे कसे घडू शकते, या तांत्रिक तपशीलात आता न जाणे योग्य. परंतु मुद्दा असा की, त्यामुळे अनेकांचे असे म्हणणे आहे की, 'इल्युमिनाटी', 'फ्री मेसन्स', 'बिल्डरबर्ग', 'कमिटी ऑफ थ्री हंट्रेड' इत्यादी गुप्त पंथ अमेरिकेचा संपूर्ण अर्थ व्यवहार आपल्या ताब्यात ठेवून आहेत.

अमेरिकेत जगातल्या प्रचलित शब्दांपेक्षा वेगळे शब्द वापरण्याची फॅशन आहे. त्यामुळे ते करन्सी नोटेला 'नोट' न म्हणता 'बिल' असे म्हणतात. अमेरिकन चलनामध्ये सात प्रकारच्या 'नोटा' किंवा 'बिल्स' प्रचारात आहेत. सगळ्यात लहान नोट एक डॉलरची आहे. तिच्या पुढच्या म्हणजे दर्शनी भागावर अमेरिकेचा पहिला राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन याचे चित्र आहे. पाठच्या बाजूला एका कोपर्यात 'गरुड' हे अमेरिकेचे राष्ट्रीय चिन्ह आणि दुसऱ्या कोपऱ्यात एक पिरॅमिड आणि त्याच्यावर एक डोळा असे चिन्ह आहे. अनेक अभ्यासकांच्या म्हणण्याप्रमाणे हे चिन्ह 'इल्युमिनाटी' या गुप्त पंथाचे बोधचिन्ह आहे. त्यानंतर दोन डॉलरच्या नोटेवर एका बाजूला टॉमस जेफर्सन या माजी राष्ट्राध्यक्षाचे चित्र आणि पाठच्या बाजूला अमेरिकेच्या स्वातंत्र्याची घोषणा, या प्रसंगाचे चित्र आहे. पाच डॉलरच्या नोटेवर एका बाजूला अब्राहम लिंकनचे चित्र, तर पाठच्या बाजूला 'लिंकन मेमोरियल' या वास्तूचे चित्र आहे. नंतर दहा डॉलरच्या नोटेवर पुढच्या बाजूला अलेक्झांडर हॅमिल्टन हा राष्ट्राध्यक्ष, तर पाठीमागे अमेरिकन ट्रेझरीचे चित्र आहे. २० डॉलरच्या नोटेवर पुढे अॅन्ड्रयू जॅकसन हा राष्ट्राध्यक्ष, तर पाठी 'व्हाईट हाऊस'चे चित्र आहे. ५० डॉलरच्या नोटेवर पुढे युलिसिस ग्रँट हा राष्ट्राध्यक्ष, तर पाठी 'कॅपिटॉल' या अमेरिकन संसदेच्या इमारतीचे चित्र आहे आणि १०० डॉलरच्या नोटेवर पुढे बेंजामिन फ्रॅन्कलिन हा राष्ट्राध्यक्ष, तर पाठी 'इंडिपेन्डन्स हॉल' म्हणजे ज्या इमारतीत अमेरिकेच्या स्वातंत्र्याची उद्घोषणा करण्यात आली, तिचे चित्र आहे.

एक ते १०० डॉलरपर्यंतच्या या प्रत्येक नोटेवर अन्य आवश्यक नोंदींबरोबरच एक वाक्य आवर्जून लिहिलेले असते. ते म्हणजे, 'इन गॉड वुई ट्रस्ट.' 'आम्ही देवावर विश्वास ठेवतो.' जगातली सर्वशक्तिमान अमेरिका आपल्या चलनी नोटांवर हे वाक्य आवर्जून छापते. शासन हे निधर्मी असले पाहिजे, 'सेक्युलर' असले पाहिजे वगैरे उपदेश फक्त हिंदू समाजालाच करणार्या आपल्याकडच्या कथित निधर्मी विचारवंतांनी हे आवर्जून लक्षात घ्यावे. असल्या निधर्मी मुखंडांची पोरं बहुधा कायमची अमेरिकेत निघून गेलेली असतात! त्यांच्याकडे गेल्यावर, पोरांनी नोटा हातात दिल्या, तर नीट पाहा, अमेरिकन शासन निधर्मी नाही, हे ते शासनकर्ते, सध्याच्या पृथ्वीवरचा जो परमेश्वर म्हणजे 'डॉलर,' त्या नोटेवरच ठासून सांगतायत! 'इन गॉड वुई ट्रस्ट!' असो. तर या नोटांचे हे वर्णन एवढ्याचसाठी दिले की, अमेरिकेत नव्यानेच प्रकट झालेल्या एका 'कॉन्स्पिरसी थिअरी'प्रमाणे या विविध नोटा एका विशिष्ट प्रकारे दुमडल्या की, प्रथम दिसते की 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'चे दोन टॉवर्स व्यवस्थित उभे आहेत; मग दिसते की त्यांच्या शिखरांमधून धूर येत आहे; मग दिसते की ते भुईसपाट होऊन तिथे फक्त एक धुराचा ढग उरला आहे. हे अविश्वसनीय आहे, पण असे दिसते, हे तर कुणी नाकारू शकत नाही.

युरोपात गेली कित्येक शतके अशा समजुती रूढ आहेत की, ज्यांना अतींद्रिय शक्ती अवगत आहेत. असे काही लोक एकत्र येऊन संपूर्ण जगावर राज्य करू पाहात आहेत. या लोकांच्या गुप्त संघटना असून, विविध सैतानी अघोरी देवतांची उपासना करून ते अतींद्रिय शक्ती मिळवत असतात. 'इल्युमिनाटी', 'फ्री मेसन्स', 'बिल्डरबर्ग', 'कमिटी ऑफ थ्री हंट्रेड' ही या गुप्त संघटनांपैकी काहींची नावे आहेत. युरोपात चर्चमुळे या सगळ्या अघोर पंथीयांना बराच पायबंद बसला. (म्हणजे, असे युरोपीय अभ्यासकांना वाटते.) मग १५व्या शतकात युरोपीय लोकांना स्थलांतर करण्यासाठी अमेरिका हा एक नवाच भूप्रदेश मिळाला. युरोपमध्ये ज्यांना काही उपजीविकेचे साधन नव्हते, ते लोक भराभर अमेरिकेत गेले. तसेच हे गुप्त पंथाचे लोकपण गेले. नव्या अमेरिकन राष्ट्राचे 'फाऊंडिंग फादर्स' किंवा 'उद्गाते' असे ज्यांना म्हटले जाते, ते सगळेच लोक म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन, टॉमस जेफर्सन, बेंजामिन फ्रॅन्कलिन, अलेक्झांडर हॅमिल्टन, अॅन्ड्रयू जॅकसन हे सगळेजण 'इल्युमिनाटी' किंवा 'फ्री मेसन्स' पंथांचे अनुयायी होते. म्हणून तर एक डॉलरच्या नोटेवर पिरॅमिड आणि डोळा हे चिन्ह आले. याला म्हणतात, 'कॉन्स्पिरसी थिअरी' किंवा 'कारस्थान सिद्धांत.' असे अनेक सिद्धांत पश्चिमी देशांमध्ये रूढ आहेत. हे सिद्धांत मांडणार्या अभ्यासकांचे असे म्हणणे आहे की, अशा अनेक गुप्त संघटना आजही अस्तित्वात असून, त्यांना संपूर्ण जगावर स्वामित्व मिळवायचे आहे. किमान संपूर्ण जगाच्या आर्थिक व्यवहारांवर त्यांना नियंत्रण मिळवायचे आहे; नव्हे, त्यांनी मिळवलेच आहे! कारण, डॉलर हेच आज जगातले सर्वांत मजबूत चलन आहे आणि तो डॉलर तर त्या गुप्त संघटनांच्या ताब्यात आहेच. असेच इतरही अनेक 'कारस्थान सिद्धांत' वेगवेगळ्या क्षेत्रांत असून, त्यावर नियमितपणे लेखन करणारे अनेक पत्रकार आहेत, लेखक आहेत. त्यांच्यातले सगळेजण काही छा-छू गिरी करणारे नसून, विद्वान आणि गांभीर्याने अभ्यास करणारे आहेत. आपल्याकडे जसा आपण ब्रिटिशांनी आपला इतिहास विकृत केल्याचा सिद्धांत मांडतो, तसा युरोपातले विद्वान त्यांच्या इतिहासाच्या उलट्या विकृतीकरणाचा सिद्धांत मांडतात. उदा. आपण असे म्हणतो की, भगवान गौतम बुद्ध इसवी सन पूर्व काळात होऊन गेला, पण ब्रिटिशांनी मुद्दाम त्याचा काळ इसवी सनानंतरचा दाखवला. म्हणजे, 'आमचा येशू अगोदर; तुमचा बुद्ध नंतर,' असे त्यांना दाखवायचे होते. युरोपीय विद्वान म्हणतात की, चर्च अधिकार्यांना येशू किंवा त्याचे धर्मप्रसारक किती महान होते, हे लोकांना दाखवायचे होते. पण, तशा फारशा गोष्टी उपलब्धच नव्हत्या. मग त्यांनी नंतरच्या काळातले राजे, संत किंवा तत्सम मोठ्या लोकांच्या जीवनातल्या गोष्टी उचलल्या आणि त्या अगोदरच्या काळातल्या येशू आणि शिष्यांच्या चरित्रांमध्ये घुसडल्या. यंव रे गब्रू!

खरे म्हणजे आपल्याला हा नमुना माहीत आहेच. विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय आणि त्याच्या दरबारातला चतुर तेनालीराम यांचे मजेदार किस्से आपल्याकडे अकबर आणि बिरबलाच्या गोष्टी म्हणून खपवल्या जातात. असो. तर यातला महत्त्वाचा मुद्दा असा की, वर दिलेल्या 'रिव्हर्स हिस्ट्री' सिद्धांतावर खुद्द सर आयझॅक न्यूटनचा विश्वास होता. आता सर आयझॅक न्यूटनला तरी आपल्याकडचे, देवाला 'रिटायर' करायला निघालेले कथित विचारवंत 'अंधश्रद्धाळू' म्हणणार नाहीत, अशी आशा करूया. अशा अनेक 'कारस्थान सिद्धांतां'मधला एक मोठाच चमत्कारिक भासावा असा किस्सा म्हणजे, 'यू. एस. एस. एल्डरिज' या अमेरिकन नौदलातल्या युद्धनौकेचा. दि. २८ ऑक्टोबर १९४३ या दिवशी 'एल्डरिज' ही विनाशिका नौदलाच्या 'फिलाडोल्फिया' येथील तळावरून एकाएकी अदृश्य झाली. एक निळा झगझगीत प्रकाशझोत कुठून तरी आला आणि ३०० फूट लांबीची, १ हजार, ६०० टन वजनाची 'एल्डरिज' एकदम आपली दिसेनाशीच झाली. बघणार्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. ही काय भुताटकी! पण, ही भुताटकी एवढ्यावर थांबली नाही. 'फिलाडेल्फिया' नाविक अड्ड्यापासून ३२० किमी दूर व्हर्जीनिया प्रांतातल्या नॉर्फोक बंदरात 'एस. एस. अॅन्ड्रयू फुरुसेथ' एक मालवाहू जहाज उभे होते. याच्या जवळ ही 'एल्डरिज' विनाशिका एकदम प्रकट झाली. फुरुसेथवरचे खलाशीपण चकित होऊन बघत राहिले. एकदम हवेतून प्रकट व्हावी, तशी ही 'एल्डरिज' आली तरी कुठून? पुन्हा थोड्या वेळाने 'एल्डरिज' तिथून गायब झाली आणि 'फिलाडेल्फिया'तल्या मूळ जागी प्रकट झाली. नंतर असे आढळले की, 'एल्डरिज'वरचे अनेक नौसैनिक गायब झाले आहेत. अनेकजण 'एल्डरिज'च्या फळ्यांवर डिंकाने चिकटवावेत तसे चिकटून, पडले आहेत आणि अनेकजण मानसिक धक्क्याने वेड लागण्यासारखे करताहेत. 'कारस्थान सिद्धांत'वाल्यांचे मत असे की, अमेरिकन नौदल किंवा 'सी.आय.ए.' किंवा युद्धखाते अख्खी युद्धनौका अदृश्य करता येईल का, अशा प्रकारचे उच्च दर्जाचे वैज्ञानिक प्रयोग करत होते. युद्धनौका अदृश्य (पान ६ वर)

---

पोरकी पोरं डॉ. तुषार सावरकर

# कचऱ्यात हरवणारं बालपण

पहाट अजून पूर्ण उजाडलेली नसते. शहराच्या आकाशात मंद प्रकाश असतो. रस्त्यांवर अजूनही शांतता असते. शहर झोपेत असतानाही काही लहान मुलं आधीच आपल्या दिवसाची सुरुवात करून बसलेली असतात. त्यांच्या खांद्यावर मोठी पोती असतात, हातात लोखंडी काठी किंवा तुटका हुक असतो. ते कचरापेट्यांजवळ, रस्त्यांच्या कडेला किंवा कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ उभे असतात. लोकांसाठी तो कचरा असतो; पण या मुलांसाठी तोच उपजीविकेचा स्रोत असतो.

कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून प्लॅस्टिक, कागद, बाटल्या, लोखंडाचे तुकडे- जे काही मिळेल ते ते काळजीपूर्वक वेगळं करतात. दिवसाच्या शेवटी ते काही रुपये मिळविण्यासाठी ते विकतात. अशा प्रकारे हजारो मुलं रोज शहराच्या कचरापेट्यांमध्ये आपलं बालपण शोधत असतात. शहरांमध्ये कचरा वेचणारी मुलं हे आता अनोळखी दृश्य राहिलेलं नाही. ती आपल्याला ट्रॅफिक सिग्नलजवळ दिसतात, रेल्वे रुळांच्या बाजूला दिसतात, कचरा डेपोच्या परिसरात दिसतात. या दृश्याची सर्वांत मोठी शोकांतिका म्हणजे ते आपल्याला दिसत असूनही समाजाच्या जाणिवेत मात्र अदृश्य राहतात. या मुलांच्या हातात खेळणी नसतात, पुस्तकं नसतात, शाळेची बॅग नसते. त्यांच्या बालपणात खेळाचे मैदान नसते; असतात फक्त कचऱ्याचे ढिगारे. बालपणातील उत्सुकता आणि स्वप्नं हळूहळू कचऱ्याच्या धुळीत हरवत जातात. भारतात कचरा वेचणाऱ्या कामगारांची संख्या लाखोंमध्ये असल्याचा अंदाज विविध अभ्यासांमध्ये व्यक्त केला जातो. या असंघटित क्षेत्रात मुलांचाही मोठा सहभाग असल्याचे संशोधनातून स्पष्ट होते. उदाहरणार्थ, दिल्लीसारख्या शहरातच लाखो कचरा वेचक काम करतात आणि त्यामध्ये मुलांचाही लक्षणीय वाटा आहे. या कामात गुंतलेल्या मुलांपैकी मोठा हिस्सा ११ ते १५ वर्षे वयोगटातील असल्याचे अभ्यासांमधून दिसून येते. सामाजिक पृष्ठभूमी पाहिली तर या मुलांपैकी मोठा हिस्सा वंचित समुदायांमधून येतो.

सुमारे ६२ टक्के अनुसूचित जाती, २४ टक्के अनुसूचित जमाती आणि उर्वरित इतर मागासवर्गीय समुदायातील आहेत. त्यामुळे कचरा वेचणाऱ्या मुलांचा प्रश्न हा केवळ आर्थिक दारिद्र्याचा नसून सामाजिक विषमता आणि वंचिततेशीही जोडलेला आहे. या मुलांच्या शिक्षणाची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. विविध अभ्यासांनुसार कचरा वेचणाऱ्या मुलांपैकी मोठा हिस्सा शाळेबाहेर आहे आणि अनेक मुलं पूर्णपणे निरक्षर आहेत.

कुटुंबातील गरिबी, अस्थिर उत्पन्न, स्थलांतर, पालकांचे असंघटित रोजगार आणि रोजच्या उदरनिर्वाहाचा ताण यामुळे मुलांना लहान वयातच कामात उतरावं लागतं. अशा परिस्थितीत शाळा ही त्यांच्या आयुष्यातील एक दूरची गोष्ट बनते. पुस्तकं आणि शिक्षण ही त्यांच्या दैनंदिन वास्तवाचा भाग राहत नाहीत. परिणामी शिक्षण हरवतं; त्याचबरोबर भविष्याची अनेक दारेही बंद होतात. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये काम करणाऱ्या या मुलांचं आयुष्य गंभीर आरोग्य धोक्यांनी वेढलेलं असतं. कचऱ्यात तुटलेल्या काचा, धारदार धातूचे तुकडे, वैद्यकीय कचरा, रासायनिक पदार्थ आणि सडलेले अन्न असू शकते. अशा वातावरणात काम करताना मुलांना वारंवार जखमा होतात, संसर्ग होतो आणि विविध आजारांचा धोका निर्माण होतो.

त्वचारोग, अॅलर्जी, श्वसनाचे विकार आणि डोळ्यांच्या समस्या यांचा त्रास मोठ्या प्रमाणावर आढळतो. परंतु या मुलांकडे ना हातमोजे असतात, ना मास्क, ना कोणतीही सुरक्षा साधनं. त्यांचा प्रत्येक दिवस आरोग्याच्या धोक्यांशी झुंज देतच सुरू होतो. या क्षेत्रात आर्थिक शोषणाची साखळीही मोठी आहे. मुलं कचरा गोळा करून तो मध्यस्थांना विकतात. पण त्यांच्या श्रमाच्या मोबदल्यात त्यांना अत्यल्प पैसे मिळतात. असंघटित क्षेत्रात असल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचं कायदेशीर संरक्षण नसतं.

अनेक वेळा कुटुंबाच्या आर्थिक गरजेमुळेच मुलांना या कामात ढकललं जातं. काही वेळा ठरावीक पैसे न आणल्यास त्यांना घरातही मारहाण सहन करावी लागते. या परिस्थितीत मुलींची अवस्था अधिकच असुरक्षित बनते. कचरा वेचताना त्यांना छेडछाड, लैंगिक शोषण आणि मानवी तस्करीच्या धोक्यांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे त्यांचं बालपण दुहेरी वंचिततेत अडकतं दारिद्र्याची आणि लिंगभेदाची. भारतामध्ये बालकामगारांविरोधात कायदे आहेत.

शिक्षणाचा हक्क कायदा प्रत्येक मुलाला मोफत आणि सक्तीचं शिक्षण देण्याची हमी देतो. तरीही शहरांच्या कचरापेट्यांमध्ये काम करणारी मुलं ही वास्तवता आजही कायम आहे. याचा अर्थ असा की, समस्या केवळ कायद्यांची नाही; ती व्यवस्थेतील आणि समाजातील उदासीनतेची आहे. शहरी कचरा व्यवस्थापन ही स्थानिक प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. प्रत्यक्षात शहरांच्या स्वच्छतेत कचरा वेचकांचा मोठा वाटा असतो. ते पुनर्वापरयोग्य वस्तू वेगळ्या करतात, ज्यामुळे कचऱ्याचं प्रमाण कमी होतं आणि पर्यावरणालाही फायदा होतो. परंतु या योगदानाची सामाजिक दखल घेतली जात नाही. समाजाच्या दृष्टीने ही मुलं अनेकदा अदृश्य ठरतात. ती आपल्या आजूबाजूला असतात, पण आपल्या जाणिवेत नसतात. आपण त्यांना कधी दयेने पाहतो, कधी त्रासदायक समजतो; पण त्यांच्या हक्कांविषयी गंभीरपणे विचार करत नाही. कचरा वेचणाऱ्या मुलांचा प्रश्न हा केवळ दारिद्र्याचा नाही; तो सामाजिक न्याय, बालहक्क आणि मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. प्रत्येक मुलाला सुरक्षित वातावरण, शिक्षण, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे.

कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये बालपण घालवणं ही कोणत्याही समाजासाठी स्वीकारार्ह गोष्ट असू शकत नाही. या समस्येवर उपाय शोधताना केवळ मुलांना कामातून बाहेर काढणं पुरेसं नाही. जर कुटुंबाच्या उपजीविकेचा प्रश्न सुटला नाही, तर मुलं पुन्हा त्याच परिस्थितीत अडकू शकतात. (पान ६ वर)



---

कथा बबन मोहरील

# ऋणानुबंध



हॅलो काका! मी गौरी बोलतेय.'' ''हां गौरी बेटा! बोल. कशी आहेस?'' ''ओटी सांभाळते आहे की ओटा? का सगळं ऑटो मोडमध्ये टाकून ओटीटी सुरू आहे?'' काकांच्या एका दमातल्या या ओपनिंग सेंटेन्सनी गौरी हसत सुटली. काही सेकंदांनी हसणं थांबवत म्हणाली, ''घरीच आहे काका आणि पुस्तक वाचत होते. सध्या उन्हाळ्यामुळे लोक इलेक्टिव्ह सर्जरी टाळतात त्यामुळे काम थोडं कमी आहे. तुमच्या शहरात एक छोटं काम आहे, सकाळी ते आटोपून मग तुमच्या घरी येते.''

''अरे वा! जरूर ये. आम्ही जेवायला थांबू तुझ्यासाठी. किती दिवसांपासून बोलावतोय तुला.'' काका आनंदाने म्हणाले. काका म्हणजे गौरीच्या वडिलांचे शालेय घट्ट मित्र! इतके की, त्यांच्या मैत्रीची ऊब दोन्ही कुटुंबीयांच्या पुढच्या पिढीपर्यंत पोचली, रुजली आणि टिकली होती. तिच्या वडिलांच्या अकाली निधनानंतर तिला काकाच वडिलांच्या ठिकाणी. तिला त्यांचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व आणि हजरजबाबीपणा फार आवडायचा. तसे ते एक प्रसिद्ध आणि अनुभवी शल्य चिकित्सक. ४० वर्षांहून अधिक प्रॅक्टिसच्या या सगळ्या प्रवासात आलेले अनुभव नेमक्या शब्दात वाचकांपर्यंत पोहोचविण्याची ताकद त्यांच्या वाचेत आणि लेखणीत आहे. वाचन संस्कृतीवर त्यांचा प्रचंड विश्वास. दुसऱ्या दिवशी ती त्यांच्या घरी पोहोचली. 'ये ग मुली!'' काकांच्या आवाजातल्या अगत्याने आणि चेहऱ्यावरच्या स्मित हास्याने गौरीचा चेहरा आनंदाने अजून खुलला. ''अगं, ऐकते का? आपल्याकडे मोठी लेखिका आली आहे बघ. ये लवकर.'' काकांनी काकूंना आवाज देऊन बोलावले.

''हो आले आले.'' काकूंच्या आवाजातही आपलेपण अन् अगत्य जाणवत होतं. ''काय काका! तुम्ही पण आल्या आल्या माझी टिंगल करायला सुरुवात केली. डॉक्टर झाली खूप झालं, थोडं फार काहीतरी लिहिते म्हणून लेखिका नाही झाली. हो ना काकू?'' ''अरे नाही कसं नाही! आहेच तू लेखिका. सगळ्या मोठ्या लेखकांची सुरुवात अशीच होते, एकदम कुणी मोठं होत नाही.'' काकू माझ्या जवळ बसत म्हणाल्या. ''भाषेची गोडी आणि गंमत, नेमक्या शब्दांचा योग्य तिथे वापर, अलंकारांनी, म्हणींनी, वाक्प्रचारांनी, उपमा-रूपकांनी आणि भावपूर्ण शब्दांनी सुंदर होत जाणारी भाषा, मनात आलेलं व्यक्त करता येण्याची मुभा आणि त्यातून मिळणारा आनंद, हे सगळं आवडतं म्हणून लिहिते; बाकी आजच्या या रील्सच्या काळात भाषेचं भवितव्य काय आणि वाचकगण कुठे हा प्रश्नच आहे. तसं पण लिखाण माझा छंद आहे, व्यवसाय नाही'' गौरीने काकाकाकूंचा समोर कबुली दिली. 'एक्झॅक्टली!

लिखाणाचं व्यवसायीकरण कशाला करायचं? वाचन संस्कृती टिकविण्यासाठी आणि नव्या पिढीला जोडण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज आहे, घरात, शाळेत, समाजात आणि समाज माध्यमातही. जेणेकरून मराठीचे भविष्य उज्ज्वलच राहणार.'' ''अहो, मराठीचं भविष्य उज्ज्वल करायला निघाले, पण पुतणीच्या वर्तमानाची चौकशी कराल का? जरा विचारा की, जावई, नातवंड कसे आहेत?'' काकू मध्येच बोलल्या. सगळे हसायला लागले. गौरी म्हणाली, ''काकू सगळे मजेत आहेत, आपापल्या कामात व्यस्त आणि मस्त आहेत. मला तुमच्या दोघांचं अनडिव्हायडेड अटेंशन हवं होतं ना म्हणून एकटीच आली.'' गौरीने मध्येच भाव खाऊन घेतला. ''अरे हो, पण आज तुमचं नंदनवन रिकामं रिकामं का? नीरज-नीलिमा आणि मुलं कुठे आहेत?''


'' आमच्या दोघांचं अनडिव्हायडेड अटेंशन पाहिजे होतं ना तुला, म्हणून त्यांना घरातून पाठवून दिलं. म्हटलं जा, एक आठवडा बाहेर राहा.'' काका मध्येच बोलले. ''काय हो! उगाच तिला त्रास देताय तुम्ही.'' काकूंनी लटका राग दाखवला. ''अगं, मुलांच्या सुट्या म्हणून उत्तर भारत फिरायला गेलेत सगळे. ''बरं! तुम्ही गप्पा मारा, मी १० मिनिटांत जेवायला वाढते'' काकू उठत म्हणाल्या. ''ये माझ्या बरोबर.'' काका म्हणाले. काका तिला त्यांच्या खोलीला लागून असलेल्या खोलीत घेऊन गेले. तिथे पुस्तकांची कपाटं होती. ती काकांनी तिच्यासाठी उघडी केली. ''हे बघ माझी पर्सनल लायब्ररी! खूप जुनं आणि रेअर कलेक्शन आहे यात. तुला पु.लं.ना भेटता आलं नाही, याची नेहमी खंत असते ना?'' आणि त्यांनी गौरीला पु.लं.ची स्वाक्षरी असलेलं 'रसिक हो!' हे पुस्तक सुपूर्द केलं. गौरीचे डोळे अक्षरशः चमकले.

''काका! हे मला?'' ''हो. यातली जी पुस्तकं तुला हवीत, जितकी हवीत, ती तुझी.'' त्या क्षणी तिच्या आनंदाला पारावार उरला नाही. तेवढ्यात काकूंनी आवाज दिला.. ''अरे, आल्या आल्या तिला घेऊन पुस्तकांमध्ये गुंतलाय. तिला काही खाऊ पिऊ तर द्या, पोरगी इतक्या दिवसांनी आलीय.'' तेवढ्यात खालून हॉस्पिटलमधली नर्स वरती आली. ''सर, एक ५० वर्षांचा माणूस आलाय. त्याच्या पोटात दुखतंय म्हणतो.'' ''हे बघ गौरी...'' काका हातवारे करून बोलले...''आता तू आणि मी छान वेळ घालवतोय तर त्याच्या पोटात का दुखावं? आत्ताच जाऊन बघतो त्याला!'' काकांनी ते अशा स्वरात म्हटलं की बोलवायला आलेली नर्स पण हसायला लागली. ''आलोच १० मिनिटांत. तू तोपर्यंत पुस्तकं बघ!'' काका खाली गेले, तोवर तिने अजून पुस्तके त्यांच्या शेल्फमधून काढली. त्यात तिला अनेक पुस्तके सापडली जी ती शोधत होती, पण बाजारात उपलब्ध नव्हती. बऱ्याच पुस्तकांत काकांचं नाव लिहून लेखकांनी स्वाक्षरी केली होती. काका २०-२५ मिनिटांत परत आले आणि जेवणाच्या टेबलावर पुन्हा गप्पा रंगल्या. काका म्हणाले, ''आता मी प्रॅक्टिस कमी आणि पठन-पाठांतर यात जास्त वेळ घालवतो.'' ''पाठांतर?'' गौरीने दचकून विचारलं. 'रोज सकाळी काहीतरी पाठ करतो. मग एखाद्या विषयावर पानभर लिहितो. त्यामुळे वेळ चांगला जातो, लिहिण्याची-वाचण्याची सवय जिवंत राहते, बँकेतली सही सही-सही मॅच होते.'' ते हसत म्हणाले. ''देवाच्या कृपेने डोळे आणि डोकं शाबूत आहे, ते तसंच राहावं म्हणून मी त्यांना वाचन-लेखनाची लाच देत असतो.'' 'ब्रेनला लाच!' आपल्या ब्रेनला आपणच लाच देतोय हा कन्सेप्ट गौरीला फारच मजेशीर वाटला. जेवण झाल्यावर काकूंनी केलेल्या शेवयाच्या खिरीवर ताव मारत गप्पांचं सत्र डायनिंग टेबलवरून बैठकीत शिफ्ट झालं. तिला काका आणि त्यांच्या कुटुंबीयांचं नेहमी कौतुक वाटायचं. डॉक्टरी, शेकडो रुग्ण, नातेवाईक, मित्रमंडळी आणि समाजसेवी संस्थांशी निगडित असंख्य कार्यकर्त्यांचा मोठा गोतावळा! पु.लं.च स्वाक्षरी असलेलं पुस्तक पुन्हा हातात घेऊन ती काकूंकडे पाहत म्हणाली,''काकू, हे पुस्तक काका मला देतायत. (पान ६ वर)

वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

# जगावेगळी तक्षशिला-२



इ.स. पहिल्या अर्धशतकातील ती महाकाय सिंधू नदी पार करून वाटाड्याने अपोलोनियस, डॅमिस आणि त्यांच्या उंटांना 'तक्षशिला' येथे नेले. येथील लोक शेतातल्या कापसाने बनवलेले कपडे वापरत होते.त्यांची पादत्राणे पपायरस वनस्पतीची आणि टोपी कातड्याची होती. येथील उच्चभ्रू लोक फिकट रंगाचे रेशमी कपडे वापरत होते. ते फिकट रंग बघून अपोलोनियसला फार आनंद झाला. तक्षशिलेचा आकार 'निनेवेह' या प्राचीन इराकमधील राजधानीएवढाच होता.

अपोलोनियस म्हणतो की, ग्रीक शहरासारखी तक्षशिलेच्या सभोवताली संरक्षक तटबंदी होती. अपोलोनियसला एका मंदिरात ठेवले गेले. या मंदिरात गर्भगृहाभोवती ताम्रपट्ट्यांवर अलेक्झांडर आणि पोरसच्या पराक्रमाचे चित्रण केले होते. हत्ती, घोडे, सैनिक, तलवारीसारखी विविध अ०ायुधे चांदी, सोने, जस्ताने बनवली होती. सैनिकांच्या, पोरस आणि अलेक्झांडरच्या भावमुद्रा विलोभनीय होत्या. अपोलोनियसचे मत पडले की, चित्रांमध्ये रंगांची आवश्यकता नव्हती. कारण भारतीय व्यक्ती मोठ्या डोळ्यांमुळे, पसरट जबड्यामुळे, फेंदऱ्या नाकामुळे, सावळ्या रंगामुळे ओळखू येतोच.

राजाने तीन दिवस नगरात राहण्याची त्यांना परवानगी दिली. तीन दिवसांपेक्षा जास्त कोणीही आगंतूक तक्षशिलेत राहू शकत नव्हता. आता अपोलोनियसला राजवाड्यात आणण्यात आले. तक्षशिला पाहून अपोलोनियसला अथेन्सची आठवण आली. तक्षशिलाचे छोटे रस्तेदेखील नियोजनबद्ध बांधले होते. एकमजली टुमदार घरं होती; जमिनीच्या खाली तळमजला होता. राजवाड्यात जाताना त्यांनी संगमरवरी लाल रंगाचे आणि त्यावर लगडलेल्या सोन्याने चमकत असलेले सूर्यमंदिर पाहिले. जागोजागी अलेक्झांडर आणि पोरसचे पुतळे उभे होते. आश्चर्य म्हणजे राजवाडा साधा होता. बॅबीलोनचा भपकेबाजपणा न्यायदालनात किंवा दरबारात दिसला नाही. अपोलोनियसने राजा फ्रेयोटेसच्या साधेपणाची तारीफ केली तेव्हा राजाम्हणाला, ''माझ्याकडे येत असलेल्या पैशाचा विनियोग मी प्रजेच्या हितासाठी करतो. मी दारू पीत नाही. व्यायामासाठी शिकार करतो. स्वतः मशागत करून माझ्या बगीच्यात पिकविलेला भाजीपाला आणि फळे जेवणात घेतो.''

राजाने नंतर वाटाड्याला आणि दुभाषकाराला बाहेर जाण्यास सांगितले आणि तो अस्खलित ग्रीकमध्ये बोलू लागला...''मी कधी विसरत नाही की, मी सामान्यांपैकीच एक आहे. मी कोणालाच सांगतही नाही की मला ग्रीक भाषा येते. तुमच्या प्रेमाने मला जिंकले. तुम्ही तत्त्ववेत्ते आहात. तत्त्ववेत्ता नेहमीच राजाच्या वरती असतो. मला तुमच्याबद्दल अतिशय आदर वाटतो.'' राजा बोलला. दोघेही जण एकत्र जेवायला बसले. त्यांच्या स्वागतासाठी गळ्यात फुलांच्या माळा घातल्या. राजवाड्यात जेवणाअगोदर फुलांच्या माळा घालण्याची पद्धत होती. जेवणाचे मेज गुडघ्याएवढे उंच होते आणि दालनाच्या मध्यभागी ठेवले होते. मोठाले मासे, वाघ, सिंह, बकऱ्यांचे मोठमोठे सांगाडे टेबलवर ठेवले होते. पाहुणा मेजावर जाऊन मांसाचा तुकडा कापून त्याच्या थाळीत ठेवत असे. प्राचीन काळचा एक प्रकारचा तो 'बुफे' होता. त्याच भोजनगृहात करमणुकीसाठी हरप्रकारचे खेळही ठेवण्यात आले होते. अपोलोनियसला राजाबद्दल जाणून घ्यायचे होते. त्याने राजाला विचारलेच,

''राजा, तू तत्त्वज्ञानाकडे कसा वळला? आणि तुला ग्रीक भाषा येते कशी?'' राजा म्हणाला, ''पूर्वी जहाज बंदराला लागायचं तेव्हा लोक विचारात पडायचे, हे समुद्री चाचे तर नाहीत ना! आता जेव्हा जहाजावरून माणसं उतरतात तेव्हा पहिला प्रश्न विचारण्यात येतो, तुम्ही तत्त्वज्ञ आहात का? पण खरं सांगू का, सागरी चाचे आणि तत्त्वज्ञ यात फारसा फरक नाही. तत्त्वज्ञान या क्षेत्रातही आता अनेक बाजारबुणगे सापडतात. चोरांना शिक्षा होते, या खोट्या तत्त्ववेत्त्यांना नाही. आमच्या देशात मात्र तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांचे चारित्र्य बारकाईने तपासले जाते. अगोदरच्या तीन पिढ्यांचा इतिहास निष्कलंक असेल आणि तो नैतिकदृष्ट्या अतिशय उच्च पातळीवर असेल तरच त्याला तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी म्हणून स्वीकारण्यात येते. आमच्याकडे माणूस मृत झाल्यावर त्याच्या आयुष्याचा संपूर्ण इतिहास राजदरबारातील नियुक्त अधिकारी लिहितो. तरुण माणसाचे डोळे, भुवया आणि चेहऱ्याची ठेवण पाहून त्याच्याविषयी मत बनवण्यात येते आणि तो तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी म्हणून लायक आहे का हे तपासण्यात येते.''

राजाने त्याचा आयुष्यपट अपोलोनियसला उलगडून सांगितला. त्याचे वडील लहानपणीच अनाथ झाले. राज्य चालावे म्हणून नातेवाईकांनी कारभार सांभाळला. पण काही दुष्ट सरदारांनी त्यांच्याविरुद्ध कट रचला. वडिलांना वयाच्या १६ व्या वर्षी दूर झेलमच्या पलीकडे पळून जावे लागले. पण त्या प्रदेशातल्या राजाने वडिलांना त्याची गादी देऊ केली. वडिलांनी ती स्पष्टपणे नाकारली आणि शिक्षणासाठी उच्च कुळातील ऋषिमुनींकडे जाऊ देण्याची विनंती केली. वडिलांचे शिक्षण झाले. लग्नही झाले आणि फ्रेयोटेसचा जन्म झाला. फ्रेयोटेस राजाचे १२ व्या वर्षापर्यंत सर्व शिक्षण ग्रीक भाषेतून झाले.

त्यानंतर त्याच्या वडिलांप्रमाणे अरण्यात जाऊन उच्च कुळातील ऋषिमुनींकडून त्याने त्याचे शिक्षण पूर्ण केले. एव्हाना वडिलांचा मृत्यू झाला होता. वयाच्या १९ व्या वर्षी पोरक्या अवस्थेत फ्रेयोटेस वाडवडिलांचे राज्य मिळविण्यासाठी परतीच्या वाटेला निघाला. फ्रेयोटेस टाहो फोडून वाटेतल्या लोकांना सांगत होता...''मी तुमचा राजा आहे! मी तुमचा राजा आहे!'' आणि लोक त्याला आनंदाने स्वीकारत होते. फ्रेयोटेसच्या दर्शनाने लोकांना त्याच्या वडिलांचे दर्शन झाल्याचा भास होत होता. शेवटी शहरात आल्यावर लोकांनी मशाली पाजळून त्याचे जोरदार स्वागत केले. अपोलोनियस आणि फ्रेयोटेस राजाच्या गप्पागोष्टी रंगात आल्या असतानाच गाण्याचे मधुर स्वर चारी दिशांतून वर आले. अपोलोनियसने विचारले की, अचानक गाणे का सुरू झाले? त्यावर राजाने उत्तर दिले की, येथील ही पूर्वापार प्रथा आहे. राजाला चांगली झोप लागावी आणि सकाळी उठल्यावर न्यायनिष्ठ राजाने जनतेच्या हितासाठीच काम करावे यासाठी हे सुमधुर गीत गायक गात आहेत.

तीन दिवसांनंतर अपोलोनियसने तक्षशिला नगरी सोडली. त्याचे उंट थकले होते त्यामुळे राजाने त्याला नवीन पांढरेशुभ्र उंट भेट दिले. दोन दिवसांच्या प्रवासानंतर पोरस राजा प्राणपणाने जेथे लढला होता तेथे अपोलोनियस आणि डॅमिस येऊन पोहोचले. तक्षशिलेच्या आसपासच्या प्रदेशात फिरताना अपोलोनियस अनेक जातीजमातींना भेटला. त्यातील उत्तर-पश्चिमेतील 'सोफोई' जमावाने त्याला प्रभावित केले. सोफोईंचा महान गुरू तत्त्ववेत्ता इआर्कसच्या अस्खलित ग्रीक वाणीने अपोलोनियसचे मन जिंकले. अपोलोनियसचे बालपण, त्याचे आईवडील, त्याला वाटेत भेटलेला डॅमिस या त्याच्या आयुष्यात घडलेल्या सर्व गोष्टी इआर्कसने सहज सांगितल्या. अपोलोनियसला आश्चर्याचा धक्काच बसला. तो म्हणाला,''माझ्याबद्दलचे एवढे बारीक तपशील तुम्हाला कसे माहीत आहेत?''

इआर्कस म्हणाला, ''कारण आम्ही तुमच्या आत्म्याचा प्रवास जाणतो. अगोदरच्या जन्मांची रहस्येही आम्हाला माहीत असतात.'' सोफोईंच्या सहवासातच अपोलोनियसला 'पेंटार्बा' या विलक्षण रत्नाबद्दल समजले. पृथ्वीच्या पोटातील अग्नीप्रमाणे तेजस्वी रत्नात अन्य सर्व माणिकरत्ने आकर्षित करण्याची ताकद आहे. या रत्नाला शोधण्यासाठी यज्ञविधी करावा लागतो. अपोलोनियसला गंगेपल्याड जमिनीखाली राहणाऱ्या पिग्मी लोकांचीही माहिती मिळाली. गरुड आणि सिंहाचे मिश्रण असलेल्या 'ग्रिफिन' या शूर प्राण्याबद्दल ऐकून तो अचंबित झाला. वाघ, सिंह, हत्तींनादेखील तो हरवायचा. सूर्यकिरणांपासून उत्पन्न झालेला, सोन्यासारख्या तेजस्वी फिनिक्सने ५०० वर्षांचे आयुष्य भारतात घालवले. नंतर नाईल नदीच्या उगमाजवळ झेप घेत स्वतःच्या सुगंधी घरट्यात शोकगीत गात त्याने स्वतःला जाळून घेतले. भारतातील हंसही त्यांच्या मृत्यूसमयी गाणे गातात,

(पान ६ वर)

# सूर्यनमस्कार

## दिसणाऱ्या देवाची उपासना



आनंद स्पंदन

डॉ. अविनाश मोहरील

आपण तेजोपासक आहोत. भागवतातील जडभरत किंवा शकुंतलेचा मुलगा भरत यांच्यावरून आपल्या देशाचे 'भारत' हे नाव रूढ झाले असेलही; पण त्यापेक्षा 'भा' म्हणजे तेज आणि त्यात नेहमी 'रत' असलेल्या लोकांचा प्रदेश म्हणजे 'भारत' हे कारण जास्त सयुक्तिक वाटते.

आकाशातील सूर्य स्वतःही तळपतो आणि आपल्या तेजाने त्रिभुवन उजळून टाकतो. हा दाहक असला तरी संजीवक आहे. याच्यामुळेच पृथ्वीवरचे जीवन टिकून आहे. पृथ्वी याच्या भोवती नियमित लंबवर्तुळाकार मार्गाने फिरत वैशाखात मेषेत असताना सूर्यापासून सर्वाधिक जवळ असल्याने सूर्य नेहमीपेक्षा जास्त तेजस्वी भासतो.

**'आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविअंशुमान्।'**

म्हणजे आदित्यात विष्णू आणि सर्व तेजस्वींमध्ये सूर्यरूपाने मीच वास करतो, असे स्वतः भगवंत विभूतियोगात सांगतात. त्यांनी आपले गूढ योगरहस्य सर्वात प्रथम कुणाला सांगितले असेल तर सूर्याला. तेथून ते परंपरेने सर्वत्र प्रसारित झाले. विष्णुनाम सहस्रातही सूर्य या अर्थाची अनेक विशेषणे विष्णुवर्णनाकरिता लावलेली आढळतात. त्यातील सर्वात परिचित उदाहरण म्हणजे नारायण.

**'आरोग्यं भास्करात् इच्छेत:'** ज्याला आरोग्य हवे त्याने सूर्योपासनेने मिळवावे. अशा या सूर्याची मित्र, रवि, सूर्य, भानु, खग, पुष, हिरण्यगर्भ, मरिची, आदित्य, सविता, अर्क आणि भास्कर ही १२ नामे उच्चारत नियमितपणे त्याला साष्टांग नमस्कार घालणे यासारखा सर्वांगसुंदर व्यायाम दुसरा नाही. मात्र, ही नावे केवळ स्तुतिपर नसून त्या प्रत्येकामागे सूर्याचा एकेक विशिष्ट गुण, कार्य आणि तत्त्व सूचित आहे. त्यांचा संबंध काल, ऋतू आणि जीवनशक्ती यांच्याशी आहे.

या नामांतून सूचित होणारा अर्थ आणि त्यातून व्यक्त होणारे तत्त्व यांचा विचार करण्यापूर्वी उदाहरण म्हणून काही नामांच्या व्युत्पत्ती बघितल्याशिवाय त्यांचे रहस्य समजणार नाही.

**मित्र :** यातील मि या धातूचा अर्थ मापन, बंध किंवा जोड. 'मिनोति बध्नाति इति मित्र:' म्हणजे जो लोकांना एकत्र जोडतो तो मित्र. यामुळे सामाजिक ऐक्य निर्माण होते.

**रवि :** रव् म्हणजे ध्वनी, गर्जना. 'रवति इति रवि:' जो स्पंदने निर्माण करतो तो रवि.

**सूर्य :**

१) 'सुराणां इयते इति सूर्य:' म्हणजे देवांचा अधिपति हा एक अर्थ. आणि २) 'सृ गतौ: इति सूर्य:' जो सतत पुढे सरकतो, गतिमान राहतो, म्हणून प्रवाही राहून तेजस्वी दिसतो तो सूर्य.

**खग :** 'खे गच्छति इति खग: ख' म्हणजे आकाश, त्यात गमन करतो तो खग. दिशा आणि कालचक्राचा निर्देशक.

**पूषा :** पूष म्हणजे पोषण. 'पोषयति इति पूषा.' जो पोषण करतो तो पूषा.

**सविता :** सू-सुव् म्हणजे उत्पादन करणे, प्रेरणा देणे. याला तृ हा प्रत्यय लागून सवितृ-सविता हा शब्द तयार झाला. आता व्यापक अर्थ पाहू.

**मित्र :** सर्वांशी स्नेह करणारा, सकाळच्या कोमल सूर्यप्रकाशात समाजात एकात्मता निर्माण करणारा.

**रवि :** तेजस्वी, चमकणारा, प्रकाश आणि उष्णता देऊन जगाला उजळवणारा ऊर्जा निर्माण करून शेती, जलचक्र, हवामान यांचा कारक.

**सूर्य :** स्वयंस्फूर्त प्रकाश देणारा. पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे सूर्यापासूनच ऊर्जा प्राप्त होते.

**भानु :** ज्ञानाचा प्रकाश. अज्ञानाचा अंधार दूर करणारा, बुद्धी आणि विवेक यांचा दाता.

**खग :** म्हणजे कालगतीचे प्रतीक. दिवस, रात्र, ऋतू, वर्ष यांचा कारक.

**पूषा :** हा पालनकर्ता आहे. शेती, अन्न, वद्धी सर्व याच्याशी संलग्न.

सूर्याशिवाय अन्ननिर्मिती नाही. पूषा हा जीवनाचा आधार.

**हिरण्यगर्भ :** उपनिषदे म्हणतात हे तर सृष्टीचे तेजस्वी सुवर्ण गर्भबीज. याच्यामुळेच सृष्टीची उत्पत्ती.

**मरीची :** सहस्ररश्मी. तेजस्वी सहस्त्र किरणे. यांच्याद्वारेच पृथ्वीवर उष्णता, ऊर्जा आणि जीवन पोचते.

**आदित्य :** म्हणजे अदितीचा पुत्र. या नावातून त्याच्या दैवी आणि संरक्षक रूपाचा प्रत्यय येतो. यामुळेच धर्म, नियम स्थिर राहून संरक्षणाचे आश्वासन मिळते.

**सविता :** प्रेरणा देणारा. गायत्री मंत्रात याचेच स्तवन आहे. याच्यामुळेच नवीन विचार आणि सर्जनशीलता जागवते.

**अर्क :** सूर्याचे हे औषधी रूप आहे. सूर्य आरोग्य, जीवनशक्ती देत अनेक व्याधींचे निराकरण करतो. उदा. सौरसूक्तातील 'हृद्रोग मम सूर्य हरिमाणं च नाशय' ही ऋचा. सूर्यामुळे हृद्रोग आणि हरिमाण म्हणजे कावीळही बरी होते.

मयूरकवीचा कुष्ठरोग सूर्योपासनेने बरा झाला व त्याने मयूरशतक नावाचे स्तुतिपर काव्य रचले. सौर स्नानाने डी व्हिटॅमिनची कमतरता दूर होते.

**भास्कर :** भा म्हणजे तेज. तेजाचा कारक तो भास्कर. अज्ञानरूपी अंधकाराचा स्वतेजाने नाश करून प्रकाश देत ज्ञान निर्माण करणारा.

**'लोकालोकालोक: कमलारुण मंडल:सूर्य:।'** सूर्याला केवळ खगोलीय वस्तू न म्हणता त्याच्या विविध नामातून सामाजिक ऐक्य निर्माण करणारा (मित्र), भौतिक प्रकाश देणारा (रवि-भानु), मानसिक प्रेरणादायी (सविता), आरोग्यदायक (अर्क), ज्ञानदायक (भास्कर) हिरण्यगर्भ म्हणजे ब्रह्मांडीय चेतना हा सूचित अर्थ लक्षात घ्यावा. त्याला समाज, विज्ञान, आरोग्य आणि अध्यात्म यांचा केंद्र समजावा.

वेदांनीही चैत्र- वैशाखादी १२ महिन्यांच्या सूर्यांच्या विविध रूपांतील १२ आदित्य कोण ते सांगताना या नावांतून त्याची अनुक्रमे धाता, अर्यमा, मित्र, वरुण, इन्द्र, विवस्वान, पूषा, पर्जन्य, अंशुमान, भग, त्वष्टा आणि विष्णू ही संबोधने योजिली. त्यातून पुढीलप्रमाणे तत्त्वे व्यक्त होतात.

चैत्रातील धाता सृष्टिनिर्मिती सांगतो, वैशाखातील अर्यमा (मित्ररवि) समाज रचना करतो, मैत्री आणि सामाजिक संतुलन राखतो, वरुण नियम आणि मर्यादा सांभाळतो, इंद्र शक्ती आणि वर्षा देतो, विवस्वान (रवि) तेज आणि उष्णता देतो, पूषा पोषण करतो, पर्जन्य जीवनदायी ऊब देतो, अंशुमान (भानु) किरणे आणि उर्जेतून व्यक्त होतो, भग हा ऐश्वर्यदायक, त्वष्टा (सविता आणि अर्क) रचना करतो तर फाल्गुनातील विष्णू म्हणजे सर्वत्र भासमान होणारा भास्कर हा त्याची सर्वव्यापकता सांगतो.

**निरीक्षण :** आतापर्यंतच्या विवेचनावर नीट विचार केला तर एक अद्भुत क्रम लक्षात येतो.

**मित्र :** सामाजिक बंध, रवि आणि भानु म्हणजे स्पंदन आणि प्रकाश, पुष म्हणजे पोषण. सविता म्हणजे सृजन आणि सातत्य. भास्कर म्हणजे अंतिम प्रकाशाचे रूप.

थोडक्यात म्हणजे बंधन, स्पंदन, प्रकाशन, पोषण, सृजन आणि पूर्णता हे एका विशाल जीवनप्रवाहाचे प्रतीक आहेत. सृष्टी, गती, पोषण, चेतना आणि ज्ञान हा संपूर्ण प्रवास या नामांत सामावलेला आहे.

सूर्यनमस्कार घालताना यांत्रिकता नको तर ती विशिष्ट नामे, त्यामागील उदात्त तत्त्वज्ञान, शरीरशास्त्र आणि साधना यांचा एकत्र मेळ अपेक्षित आहे. प्रचलित १२ नामे किंवा वेदांनी सुचवलेली धाता, अर्यमा.. वगैरे १२ नामे ही सर्व जीवन, काल, चैतन्य, धर्म यांचे केंद्रबिंदू आहेत. एकाच सूर्याच्या अनेक नामांतून एकमेव सत्याचे सहस्त्ररश्मी प्रकट होतात.

सूर्याची १२ नामे ही केवळ स्तुती नसून ती कालमापनाची पद्धत आहे, त्यात जीवनशास्त्राचे सूत्र आहे. ती योगसाधनेचे आधार आहेत.

सूर्यनमस्काराच्या १२ शारीरिक स्थिती- कृती करताना या तत्त्वांचे स्मरण करावे. सूर्यनमस्कार हा फक्त शारीरिक व्यायाम नसून तो संपूर्ण जीवनचक्राचा संक्षिप्त अनुभव आहे. सूर्योपासनेचा एक विशेष म्हणजे ही प्रत्यक्ष दिसणाऱ्या देवतेची उपासना आहे.

विवेचन

श्रीरंग श्री. हिर्लेकर

# हरविलेली शांतता



मागील आठवड्यात मला आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामधील एका कार्यक्रमानिमित्त एका लहानश्या गावात जाण्याचा योग आला. कार्यक्रम अतिशय उत्तम झाला. त्यानंतर सहजच शहरातून आठ दिवस ग्रामीण भागात राहण्यासाठी गेलेल्या आमच्या विद्यार्थ्यांशी गप्पा मारण्याच्या हेतूने एका मोकळ्या व विस्तीर्ण परिसरात त्यांना सोबत घेऊन उभा राहिलो. मला अचानक त्या सबंध परिसरात एक मनाला प्रसन्न करणारा विलक्षण अनुभव आला. आपल्याला इतके प्रसन्न का वाटते आहे हे कळेचना.

थोडा बारकाईने विचार केल्यानंतर मला असे जाणवले की, माझ्या मनाला शीतलता प्रदान करणारी गोष्ट कोणती असेल तर ती होती मला एक वेगळी अनुभूती देणारी त्या परिसरातील नीरव शांतता. शहराच्या कोलाहलापासून दूर आम्ही सारे उभे होतो. मी माझ्या विद्यार्थ्यांना १० मिनिटे अजिबात न बोलता शांत राहायला सांगितले. आम्ही सारे मिळून तो अपूर्व अनुभव घेत होतो. निःशब्द शांतता. क्वचित एखाद्या पक्ष्याचा गुंजारव किंवा मंदिरातली मंजूळ घंटी. या दोन मनमोहक आवाजाव्यतिरिक्त कोणताही आवाज नाही. आम्ही सारे ध्यान लागल्यागत ती शांतता अनुभवत राहिलो. साधारण १५ मिनिटांनी त्या शांततेला छेदत मी स्वतःला आणि माझ्या विद्यार्थ्यांना एक प्रश्न विचारला. किती दिवसांपूर्वी अशी शांतता अनुभवली आहे. माझ्या काही विद्यार्थिनी म्हणाल्या आयुष्यात पहिल्यांदा. मलादेखील खूप वर्षांपूर्वी आमच्या युथ होस्टेलच्या एका कार्यक्रमांतर्गत रंगुबेली नावाच्या गावाला गेलो असता मेळघाटात अशीच शांतता अनुभवल्याचे स्मरत होते. परंतु गेल्या अनेक वर्षांत असा प्रसंगच आला नव्हता. शहरातील आधुनिक व चकाकी असलेल्या वातावरणात राहात असताना आपण गमावलेली ही एक अमृततुल्य बाब आहे. नीरव शांतता. आपल्या शहरातील दिवसच मुळात कोलाहलाने सुरू होतो. गाड्यांचे, लोकलचे, भाजीवाल्यांचे, दूधवाल्यांचे, शाळेच्या वाहनांचे असले विविध आवाजभरल्या पहाटेपासून सुरू होतात. आपल्याला सवय तर अशी होऊन बसली आहे की, या आवाजाशिवाय जागच येत नाही. या आवाजासोबत मोठाल्या शहरात माणूस नावाचे यंत्र जागे होते आणि दिवसभराच्या धावपळीला प्रारंभ होतो. बारकाईने दिवसभराच्या दिनचर्येमध्ये सहज गंमत म्हणून आपल्या सभोवतालचे आवाज एकदा काळजीपूर्वक ऐकून बघा.

वेगवेगळ्या अनावश्यक आवाजांनी आपण घेरलेलो आहोत. रस्त्यांवर सर्वात मोठा त्रास आहे तो कर्कश हॉर्नस्चा. हाताच्या बोटाला सवयच अशी झालेली आहे की, साधारणपणे दर मिनिटाला दोन वेळा हॉर्न वाजविलाच जातो. अगदी अजिबात गर्दी नसलेल्या रस्त्यांवरदेखील हॉर्न वाजवित गाड्या जाताना दिसतात. यात भर पडते ती मुद्दाम गाड्यांना बसवून घेतलेल्या आवाजी सायलेन्सरची. फाट फाट आवाज करीत स्पीड बाईकर्स रस्त्याने जातात व त्यांना कुणीही थांबवू शकत नाही. एखाद्या कारमधील म्युझिक सिस्टिमचा आवाज गाडीच्या बाहेर ५० फुटांपर्यंत पोहोचेल इतका मोठा असतो; पण त्याला कुणीही काहीही म्हणू शकत नाही. रस्त्याने जात असलेल्या लक्झरी बसेस तुफान वेगात जातात आणि त्यांच्या आड कुणीही येऊ नये म्हणून कानठळ्या बसविणारे पॉवर हॉर्नस् ते वाजवितात. लक्षपूर्वक हे सारे ऐकले तर आपण किती जास्त प्रमाणात ध्वनी प्रदूषण करतोय आणि शांततेचा भंग करतोय, याची जाणीव होईल. आपल्याला ती होतच नाही. कारण या आवाजांमध्ये आपल्याही वाहनाचा आवाज मिसळलेला असतो. रस्त्यांवर असे तर चौकांमध्ये वेगवेगळ्या निमित्ताने मोठमोठ्या आवाजात डीजे वाजविणे हा धार्मिक योगदानाचा भाग बनलाय. मिरवणुका, लग्नसमारंभ या सर्व सार्वजनिक व खाजगी उत्सवांमध्ये डीजे लावून झिंग आल्यागत नाचणे व त्याचा आवाज पंचक्रोशीत दणदणीतपणे पसरल्याशिवाय समारंभांना शोभाच येत नाही. मंत्र्यांचे गावात येणे, एखाद्या महाराजांचे प्रवचनासाठी येणे, स्नेहसंमेलनाचा प्रसंग असणे, विद्यार्थी निवडणुका जिंकणे यासारख्या अनेक प्रसंगी जोरजोरात डीजे वाजायलाच हवा व कर्णकर्कश फटाके फुटायला हवे, ही आनंद साजरी करण्याची रीतच आहे.

माझी एखाद्या देवतेवर किंवा देवतांवर श्रद्धा असणे किंवा नसणे हा माझ्या व्यक्तिगत विचारशैलीचा भाग असू शकतो; परंतु या देवतांवरील सिनेमाच्या गाण्याच्या चालींवरील भक्तिगीते(?) कान फुटेपर्यंत ऐकणे मला बंधनकारक आहे. मंदिर असेल, मशीद असेल, समाजमंदिर असेल तेथून आपल्यावर भक्तीचा आवाजी अत्याचार होत राहतो आणि आपल्या देशात त्याबाबत तर बोलायची सोयच नाही. बोललात तर धार्मिक भावना दुखावण्याचे भय. त्याला पर्यायच नाही. या चौकामधील किंवा महत्त्वाच्या ठिकाणांवरील हे ध्वनी प्रदूषण कमी पडते की काय म्हणून अशाच प्रकारचे प्रदूषण घरांमधूनही होताना दिसते. घरी पाऊल टाकल्यावर दूरदर्शनवरील विविध वाहिन्यांच्या माध्यमातून आवाज चाललेलाच असतो. तेथेही सगळे कसे अंगावर येणारेच. कटकारस्थाने, आरडाओरड, कल्लाहल्ला ही या मालिकांची ओळख बनली आहे. त्यात सराऊंड साऊंड लावून त्याची तीव्रता वाढविली जाते. त्या मालिकांचेच संस्कार म्हणून की काय; घराघरांतून वाढलेल्या तणावांमुळे कुटुंबातील सदस्यांचेही एकमेकांवरओरडणे वाढलेच आहे.

कार्याच्या ठिकाणचा राग घरी मुलाबाळांवर निघतो, आरडाओरड ऐकू येते. एकंदरीत काय तेथेही शांतता दुरापास्त ठरते. कुटुंबासोबत चित्रपट बघायला गेलो तर तेथेही अक्षरशः अनेक वेळा कान बंद करून ठेवावे लागतात. कारण डॉल्बी डिजिटलच्या इफेक्टमुळे आवाज दसपट वाढून ऐकू येतो. पडद्यावरही काय चित्र असतात. हिरोची सटकली की तो दबंगाई करतो. त्याच्या मारामारीचा आवाज किंवा गाड्यांच्या तुटफुटीचा आवाज कानाचे पडदे फाटून टाकतील की काय, याची भीती वाटते. आपल्या मोठाल्या शहरात मध्यरात्रीच्या पुढेही आवाज येतच असतात. मला तर असे वाटते की, या आवाजामुळेच झोपही लागते इतकी त्याची सवय होऊन बसली आहे. ध्वनी प्रदूषणाच्या बाबतीत देशात असलेला कायदा कुठेही पाळला जात नाही, हे विदारक सत्य आहे. विशिष्ट डेसिबलच्या वर आवाज असायला नको अन्यथा कायदेशीर कारवाई करण्याचे प्रावधान कायद्यात आहे.

(पान ६ वर)

आकलन **डॉ. शुभांगी पारकर**



# लोकसंख्यावाढीचा बोजा पृथ्वीला डोईजड

जगात चीन, जपानने पूर्वी लोकसंख्या नियंत्रण यशस्वी केले, तर भारताची लोकसंख्या जगात सर्वाधिक असूनही या देशात काही लोक प्रत्येक कुटुंबात पाच मुले जन्माला घालण्याची भाषा करीत आहेत. असुरक्षिततेतून ही भाषा येत असली आणि त्याचे गंभीर परिणाम अशी भाषा करणाऱ्यांच्या लक्षात येत नसले, तरी ते शास्त्रज्ञांच्या लक्षात आल्यावाचून राहत नाही. लोकसंख्यावाढीच्या भस्मासुराचे अन्य काही परिणाम असले, तरी सर्वात गंभीर परिणाम म्हणजे पृथ्वीला आणि निसर्गालाही लोकसंख्यावाढीचे हे ओझे आता झेपत नाही.

लोकसंख्यावाढ ही केवळ सामाजिक किंवा आर्थिक समस्या नसून पर्यावरणाशी थेट निगडित आहे. पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधने मर्यादित आहेत; पण त्यांचा वापर करणारी लोकसंख्या अमर्यादितपणे वाढत आहे. यामुळे अन्नधान्य, पाणी, ऊर्जा यांसारख्या मूलभूत गरजांवर ताण वाढत आहे. जंगलतोड वाढत आहे. नद्या कोरड्या पडत आहेत आणि शेतीयोग्य जमीन कमी होत चालली आहे. हे सर्व एका मोठ्या पर्यावरणीय संकटाचे संकेत आहेत. याहूनही गंभीर बाब म्हणजे हवामान बदलाची तीव्रता. औद्योगिकीकरण, वाहनांचा वाढता वापर आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरेकी वापर यामुळे वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढत आहे.

परिणामी, जागतिक तापमान वाढत असून हिमनद्या वितळत आहेत. यामुळे समुद्राची पातळी वाढत आहे. लोकसंख्यावाढ अशीच सुरू राहिल्यास या प्रक्रियांना अधिक गती मिळेल आणि नैसर्गिक आपत्ती, पूर, दुष्काळ, चक्रीवादळे यांची तीव्रता आणि वारंवारता वाढेल. लोकसंख्यावाढीचा थेट परिणाम जैवविविधतेवरही होतो. वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत. अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने अन्नसाखळीवर परिणाम होऊन मानवालाच फटका बसतो.

निसर्गाशी छेडछाड केल्याचे परिणाम किती भयंकर असू शकतात, हे आपण वारंवार अनुभवत आहोत. या परिस्थितीत लोकसंख्या नियंत्रण ही केवळ एक धोरणात्मक नव्हे, तर अस्तित्वाची गरज बनली आहे. शिक्षणाचा प्रसार, कुटुंब नियोजनाबाबत जागरूकता आणि आरोग्य सुविधांचा विस्तार यांद्वारे लोकसंख्यावाढ नियंत्रित करता येऊ शकते. याशिवाय, सरकारांनी कठोर आणि परिणामकारक धोरणे राबविणे आवश्यक आहे. तथापि, केवळ सरकारी प्रयत्न पुरेसे नाहीत. प्रत्येक नागरिकाने आपल्या जबाबदाऱ्या ओळखणे गरजेचे आहे.

'लहान कुटुंब, सुखी कुटुंब' ही संकल्पना केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्षात उतरली पाहिजे. तसेच पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, संसाधनांचा विवेकपूर्ण वापर करणे आणि निसर्गाचा आदर राखणे ही काळाची गरज आहे. आपण आजच जागरूक झालो नाही, तर उद्याचा दिवस अधिक कठीण असेल.

लोकसंख्यावाढ हे एक 'मूक संकट' आहे. ते हळूहळू आपले अस्तित्व धोक्यात आणत आहे. त्यामुळे आजच ठोस पावले न उचलल्यास भविष्यात मानवजातीला अशा नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागेल, ज्यातून सावरणे अत्यंत कठीण ठरेल. पृथ्वीवरील मानवी लोकसंख्येने आता धोक्याची पातळी ओलांडली असून निसर्ग स्वतःचे संवर्धन करण्यास असमर्थ ठरत आहे, असा खळबळजनक निष्कर्ष एका नवीन आंतरराष्ट्रीय अभ्यासातून समोर आला आहे. गेल्या दोन शतकांमधील आकडेवारीचा आधार घेत संशोधकांनी मानवी अस्तित्वावर भविष्यात ओढवणाऱ्या संकटाचा वेध घेतला आहे.

सध्या जगाची लोकसंख्या ८.३ अब्ज आहे. पृथ्वी वर्षभरात जेवढे नैसर्गिक स्रोत (पाणी, अन्न, इंधन) तयार करू शकते, त्यापेक्षा आपण ७० ते ८० टक्के जास्त वेगाने त्यांचा वापर करीत आहोत. सोप्या भाषेत सांगायचे तर गरज भागवण्यासाठी आपल्याला सध्या १.७ ते १.८ पृथ्वींची आवश्यकता आहे. अभ्यासकांच्या मते, पृथ्वी केवळ २.५ अब्ज लोकांना दर्जेदार आणि सुरक्षित जीवन देऊ शकते.

आजची लोकसंख्या या मर्यादेपेक्षा तीन पट जास्त आहे. १९५० पूर्वी लोकसंख्या आणि संसाधने यामध्ये एक प्रकारचे संतुलन होते; मात्र त्यानंतर झालेल्या वेगवान औद्योगिकीकरणामुळे आपण 'नकारात्मक लोकसंख्या टप्प्यात' प्रवेश केला, जिथे वाढती लोकसंख्या प्रगतीऐवजी समस्यांचे कारण बनली. प्रसिद्ध शास्त्रज्ञ कोरी ब्रॅडशॉ यांच्या मते, जीवाश्म इंधनाच्या अतिवापरामुळे मानवाने निसर्गामध्ये क्षमतेपेक्षा जास्त विस्तार केला आहे. विकसित देशांमध्ये लोकसंख्या कमी असली, तरी संसाधने वापरण्याची पद्धत निसर्गावर जास्त ताण निर्माण करत आहे. याचे परिणाम म्हणजे जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास आणि गंभीर हवामान बदल. संयुक्त राष्ट्रांनी आधीच पाणीबाणीचा इशारा दिला आहे.

अन्नटंचाई आणि प्रदूषणामुळे जगभरातील जीवनमान खालावत चालले आहे. कल असाच राहिला, तर २०६० ते २०७० पर्यंत जगाची लोकसंख्या ११.७ ते १२.४ अब्ज इतकी होईल. इतक्या मोठ्या लोकसंख्येला सामावून घेण्याची आणि त्यांचे पोषण करण्याची क्षमता पृथ्वीमध्ये उरलेली नाही, असे या अभ्यासात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. शास्त्रज्ञांनी भविष्यातील पिढ्या वाचवण्यासाठी काही महत्त्वाचे बदल सुचविले आहेत. संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे, जगभरात शिक्षण आणि कुटुंब नियोजनावर अधिक भर देणे हे उपाय सुचविले आहेत. लोकसंख्या कमी असलेल्या समाजात पर्यावरण आणि मानवी आरोग्य दोन्ही उत्तम राहते.

पुढील काही दशकांमध्ये आपण घेतलेले निर्णय पृथ्वीचे भवितव्य ठरवणार आहेत. वेळीच पावले न उचलल्यास मानवजातीला मोठ्या नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागेल. आजच्या युगात मानवजातीसमोर उभे असलेले सर्वात गंभीर आव्हान म्हणजे वाढती लोकसंख्या आणि त्याचा निसर्गावर होणारा परिणाम. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाचे जीवनमान सुधारले असले, तरी त्याच वेळी पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे.

या पृष्ठभूमीवर 'वाढत्या लोकसंख्येमुळे निसर्गाचे संरक्षण करणे कठीण होत आहे' हा मुद्दा गांभीर्याने विचार करण्यासारखा आहे. लोकसंख्यावाढ ही केवळ आकड्यांची वाढ नसून संसाधनांच्या मागणीमध्ये झालेली वाढ आहे. अधिक लोक म्हणजे अधिक अन्न, पाणी, निवारा आणि ऊर्जा यांची गरज. या गरजा पूर्ण करण्यासाठी जंगलतोड, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. परिणामी जंगलांचे क्षेत्र कमी होत आहे, जैवविविधता नष्ट होत आहे आणि वन्य जीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

याशिवाय, वाढत्या लोकसंख्येमुळे प्रदूषणाची समस्या तीव्र झाली आहे. वाहनांची संख्या वाढल्याने वायुप्रदूषण वाढते. औद्योगिक कचऱ्यामुळे जलप्रदूषण होते आणि प्लॅस्टिकसारख्या अपघटक पदार्थांमुळे भूमी प्रदूषित होते. हे सर्व घटक निसर्गाच्या संतुलनाला बाधा पोहोचवतात. हवामान बदल ही याच प्रक्रियेची एक गंभीर परिणती आहे. निसर्ग संरक्षणासाठी विविध उपाययोजना केल्या जात असल्या, तरी अपुऱ्या ठरत आहेत. सरकारे धोरणे आखतात, संस्था जागरूकता निर्माण करतात; पण लोकसंख्येचा प्रचंड दबाव या सर्व प्रयत्नांवर मात करतो. उदाहरणार्थ, वृक्षारोपण मोहिमा राबविल्या जातात; त्याच वेळी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोडही सुरूच असते. या समस्येवर उपाय म्हणून लोकसंख्या नियंत्रण हा एक महत्त्वाचा घटक आहे.

शाश्वत विकास या संकल्पनेचा अवलंब करणे आवश्यक आहे, ज्यात विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल राखला जातो. तसेच प्रत्येक नागरिकाने आपल्या पातळीवर जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. पाण्याची बचत, ऊर्जा बचत, प्लॅस्टिकचा किमान वापर आणि पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे यामुळे मोठा बदल घडू शकतो.


वाढती लोकसंख्या ही निसर्ग संरक्षणासाठी एक मोठे आव्हान आहे; पण ती अजेय नाही. योग्य नियोजन, जागरूकता आणि सामूहिक प्रयत्न यांच्या जोरावर आपण पृथ्वीचे संरक्षण करू शकतो. निसर्ग आपला शत्रू नाही, तर आपल्या अस्तित्वाचा आधार आहे, हे लक्षात ठेवूनच पुढे वाटचाल करायला हवी. (लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.

---

**ग्लोबल वॉर्मिंगचे प्रमाण वाढल्यापासून प्रत्येक शहराचे तापमानदेखील वाढत चाललेय. त्यामुळे नुसता पंखा असून आता भागत नाही. अगदी थंडी जरी असेल तरी तिचं प्रमाण देतानासुद्धा, काल रात्री एसी लावायला लागला नाही हो, असं सांगून देण्यात येतं. यावरून आपल्या जीवनशैलीमध्ये या एसीचं महत्त्व किती आहे, हे कळतं.**

घरंदाजी **केदार साधले**

# उन्हाळा करा सुसह्य



पु. ल. देशपांडे मुंबईबद्दल म्हणायचे की, मुंबईला ऋतू दोनच; उन्हाळा आणि पावसाळा. गुलाबी थंडीचा अनुभव मुंबईकर फक्त चार-पाच दिवसच काय तो घेतात. साधारण तीन-चार महिने पावसाळ्याचे सोडले तर बाकीचे महिने उन्हाळा मुंबईच्या पाचवीलाच पुजलेला आहे. हा उन्हाळा सुरू झाला की, साधारणपणे दूरचित्रवाणीवर एकतर उन्हाळी पावडरची जाहिरात सुरू होते, नाहीतर पंख्यांची! पण या सगळ्यात सुपरस्टार असतं ते म्हणजे वातानुकूलित यंत्र! पूर्वी चैनीच्या उपकरणाच्या यादीमधले हे उपकरण आता गरज या यादीत आलेलं आहे.

आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य घटक बनलेल्या या यंत्राबाबत आज थोडं जाणून घेऊयात. ग्लोबल वॉर्मिंगचे प्रमाण वाढल्यापासून प्रत्येक शहराचे तापमानदेखील वाढत चाललंय. त्यामुळे नुसता पंखा असून आता भागत नाही. अगदी थंडी जरी असेल तरी तिचं प्रमाण देतानासुद्धा, काल रात्री एसी लावायला लागला नाही हो, असं सांगून देण्यात येतं. यावरून आपल्या जीवनशैलीमध्ये या एसीचं महत्त्व किती आहे, हे कळतं. साधारण बाथरूम सोडून आपण हल्ली प्रत्येक खोलीमध्ये एसी लावलेला बघतो. अर्थात किचनमध्ये एसी लावताना त्या किचनची एक्झॉस्ट सिस्टीम नीट डिझाईन करावी लागते.

साधारणपणे या एसीचे खालील प्रमाणे प्रकार असतात-

1. विंडो एसी 2. स्प्लिट एसी

3. Ductable एसी 4. Ductable pñßbQ>

यात घरातील वापरासाठी शक्यतो विंडो आणि स्प्लिट हे प्रकार वापरले जातात. काही मोठ्या विलामध्ये ductable स्प्लिटदेखील वापरले जातात. मात्र, मुख्यत्वे घरात हेच दोन प्रकार आपण वापरतो. विंडो एसी हा त्याच्या नावाप्रमाणेच विंडोध्ये लावला जातो. यात साधारण .७५ पासून अगदी ३ टनपर्यंत क्षमतेचे एसी बाजारात उपलब्ध असतात. आपल्या घराला किती टनचा एसी लावायचा हे ठरवायला काही बेसिक नियम असतात. साधारण १ टन क्षमतेचा एसी हा जर त्या खोलीची उंची ९ फूट असेल, तर १५० स्क्वेअर फूटपर्यंत क्षेत्रफळ असलेली खोली थंड करतो.

अर्थात हा ढोबळ म्हणजे thumb rule आहे आणि हा नियम पूर्णपणे रिकामी भिंत, जमीन आणि छत यांना लागू होतो. मग विचारात घ्यायचं, घरातलं सामान आणि त्या खोलीच्या खिडकीची दिशा; ज्यातून सूर्यप्रकाश आत येतो. अशा सर्व गोष्टी विचारात घेऊन मग त्याची क्षमता कमी-अधिक होऊ शकते. ही साधारण माहिती आपल्याला माहिती असणं आवश्यक आहे. जेणेकरून उगाच अवास्तव क्षमता आणि पर्यायाने किमती असलेला एसी दुकानदार तुमच्या गळ्यात मारणार नाही. खरं तर विंडो एसी हा तसा हेल्दी पर्याय आहे. कारण यात बाहेरची शुद्ध हवा, त्यातला कॉम्प्रेसर प्रोसेस करतो आणि आतमध्ये थंड हवा फेकली जाते. त्यामुळे air circulation उत्तम होऊ शकतं. आपल्या गरजेनुसार एकदा आपण मॉडेल फायनल केलं की, त्याप्रमाणे मग विंडोध्ये त्याच्या साईजनुसार आवश्यक ते बदल करता येतात. हल्ली तर काही नवीन घरांध्ये आधीच भिंतीत त्याची जागा केलेली असते; जेणेकरून विंडोध्ये बदल करायची गरज लागत नाही. याचं दुसरं कारण हे पण असतं की, जर बाहेरून बघितलं तर हे सगळे एसीचे खोके एकाच रेषेत सगळ्या मजल्यांवर दिसतात. त्यामुळे इमारतीचं बाह्यरूप जरा सुसह्य दिसते. हल्ली काही इमारतींमध्ये या सर्व एसीच्या बॉक्सेससाठी बाहेरून एक डक्ट बनविण्यात येतो आणि त्यावर जाळीचे डिझाईन असते; जेणेकरून बाहेरून दिसताना ते सौंदर्यदेखील जपले जाते आणि एसीच्या समोर हवा खेळती राहते.

एसीचा दुसरा प्रकार म्हणजे स्प्लिट एसी. याच्या नावावरूनच याचं फंक्शन स्पष्ट होतं. स्प्लिट म्हणजे हा एसी दोन भागात विभागलेला असतो.

1. Indoor unit 2. Outdoor unit


हे दोन्ही युनिट कॉपरच्या पाईपने जोडलेले असतात. आऊटडोअर युनिट बाहेरची हवा प्रोसेस करून त्या पाईपच्याद्वारे इनडोअर युनिटमध्ये सोडतो आणि तिथून ती रूममध्ये येते. यात आपल्याला विंडोध्ये काहीच बदल करावे लागत नाहीत. कारण हे युनिट आपल्या रूममध्ये कोणत्याही भिंतीवर लागू शकतात. याचे आऊटडोअर युनिटदेखील आपण टेरेसवर लावू शकतो. अर्थात आपल्या मजल्यापासून ती जेवढ्या वर असेल, तेवढा तो कॉपर पाईप न्यावा लागतो. एसीचा हा प्रकार जरी सुलभ असला, तरी हा आरोग्यासाठी तेवढा चांगला नाही. कारण यात आत फेकलेली थंड हवा परत बाहेर फेकायला वाव नसतो आणि तीच हवा आपण घेत राहतो.

आपल्या घरात थंड हवा कशी येते, याचा साधारण अंदाज तुम्हाला आलाच असेल. एसीच्या बाकीच्या प्रकारांविषयी आपण पुढच्या लेखांध्ये जाणून घेऊच. तोपर्यंत तुचा उन्हाळा सुसह्य होऊ दे, हीच वायुदेवाच्या चरणी प्रार्थना!

(लेखक प्रसिद्ध इंटिरियर डिझायनर आहेत)

---

मुक्तचित्र **डॉ. संतोष पाठारे**




सत्यजित राय यांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट पाहताना त्यातील 'काळ' आणि 'अवकाश' हे केवळ पृष्ठभूमीचे घटक राहात नाहीत; ते त्या कथानकाचा एक भाग होऊन जातात. सत्यजित राय यांच्या चित्रपटांमध्ये दिसणारे सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन तसेच व्यक्तिरेखांचे आलेख हे विशिष्ट कालखंड आणि भौगोलिक संदर्भाशी घट्ट जोडलेले आहे. व्यापकपणे पाहिल्यास, राय यांच्या चित्रपटांना स्वातंत्र्यपूर्व भारतीय समाज आणि स्वातंत्र्योत्तर, विशेषतः पश्चिम बंगालमधील आधुनिक शहरी समाज, दोन प्रमुख कालखंडांत विभागता येते.

शतरंज के खिलाडी, देवी, सद्गती, जलसाघर, चारुलता आणि अपुत्रयी (पाथेर पांचाली, अपराजितो, अपूर संसार) या चित्रपटांमध्ये स्वातंत्र्यपूर्व भारतीय समाजाचे चित्रण दिसते; तर महानगर, अरण्येर दिनरात्री, सीमाबद्ध, जनअरण्य, प्रतिद्वंद्वी आणि आगंतुक या चित्रपटांमध्ये आधुनिक शहरी वास्तव उलगडलेले दिसते. या दोन कालखंडांमधील संक्रमणच राय यांच्या सिनेमाचा मुख्य गाभा आहे.

'शतरंज के खिलाडी' आणि 'सद्गती' हे प्रसिद्ध लेखक मुन्शी प्रेमचंद यांच्या साहित्यावर आधारित असलेले हिंदी चित्रपट वगळता, राय यांनी मुख्यतः बंगाली भाषेतूनच चित्रपट निर्माण केले. त्यांच्याकडे प्रादेशिकतेला वैश्विकतेत रूपांतरित करण्याची अद्वितीय प्रतिभा होती. प्रादेशिक तपशील, अस्सल व्यक्तिरेखा मात्र जागतिक प्रेक्षकांना अपील होईल असा आशय, ही त्यांच्या सर्वच चित्रपटांची वैशिष्ट्ये आहेत. ब्रिटिश वसाहतवादी सत्तेने भारतातील सामाजिक-आर्थिक रचना पूर्णपणे बदलून टाकली. पारंपरिक उद्योगधंदे उद्ध्वस्त झाले आणि सत्ताधारी वर्ग ब्रिटिशांच्या मांडलिकत्वात गुरफटला. 'शतरंज के खिलाडी'मध्ये राय यांनी या राजकीय अध:पतनाचा उपहासात्मक पण तीक्ष्ण वेध घेतला आहे. अवधचा नवाब वाजिद अली शाह आणि मीर-मिर्झा हे सरदार आपल्या विलासात इतके गुंतलेले आहेत की, ब्रिटिशांच्या आक्रमणाची जाणीव असूनही ते निष्क्रिय राहतात. या चित्रपटातील अवकाश हा केवळ दरबार किंवा महाल या पुरता मर्यादित राहत नाही; तो एका संपन्न पण निष्प्रभ होत चाललेल्या संस्कृतीचा प्रतीकात्मक अवकाश ठरतो.

साहित्याचे चित्रपट माध्यमात रूपांतर होत असताना मूळ साहित्याचा आशय प्रतिभावान दिग्दर्शक आपल्या दृष्टिकोनातून कसा प्रभावीपणे मांडू शकतो, त्याचे 'शतरंज के खिलाडी' हे उत्तम उदाहरण आहे. मूळ कथेत मीर-मिर्झा हे सरदार आपल्या जबाबदाऱ्या झटकून शतरंज खेळण्यात मश्गुल असतात. चित्रपटाची मांडणी करताना सत्यजित राय त्यांच्या अवतीभवती घडणाऱ्या घटना आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या धूर्त राजकीय हालचाली यांचे तपशीलवार चित्रण करून कलाकृतीला भरीवपणा देतात. 'देवी'मध्ये परंपरा आणि अंधश्रद्धा यांच्यात अडकलेल्या समाजाचे चित्रण आहे. कालीकिंकर राय ही व्यक्तिरेखा धार्मिक श्रद्धा आणि पितृसत्ताक वर्चस्व यांचे प्रतिनिधित्व करते. येथे घरगुती अवकाश (domestic space) हा स्त्रीच्या दडपशाहीचा केंद्रबिंदू बनतो.

'जलसाघर'मध्ये सरंजामशाहीच्या ऱ्हासाचे विदारक चित्रण राय करतात. विश्वंभर रॉय या जमीनदाराची भव्य हवेली आणि संगीत सभागृह हे एका लयाला जाऊ लागलेल्या युगाचे प्रतीक बनतात. अपु-चित्रत्रयी ('पाथेर पांचाली', 'अपराजितो', 'अपूर संसार') ने सत्यजित राय यांना आणि पर्यायाने भारतीय चित्रपटांना जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली.

अपु-चित्रत्रयीमध्ये सत्यजित राय यांनी ग्रामीण ते शहरी अशा संक्रमणाचा प्रवास मांडला. कथेच्या केंद्रस्थानी असलेल्या अपु या व्यक्तिरेखेच्या जन्मापासून त्याच्या तरुणपणापर्यंतचा काळ चित्रपटात दिसतो; तर चित्रपटातील अवकाश हा निश्चिंतिपूर या बंगालमधील एका छोट्याशा खेड्यापासून कोलकाता शहरापर्यंत विस्तारतो. बिभूतीभूषण बंडोपाध्याय यांनी लिहिलेल्या कादंबरीवर आधारित पटकथा लिहिताना सत्यजित राय यांनी चित्रपटांचे कथानक हरिहर या गरीब ब्राह्मणाच्या कुटुंबापुरते मर्यादित ठेवले.

हरिहरचा मुलगा अपु ही या तीनही चित्रपटांतील प्रमुख व्यक्तिरेखा. हरिहरची पत्नी सर्वोजया, मुलगी दुर्गा, दूरच्या नात्यातील बहीण इंदिरा ठकुराईन, अपुची पत्नी आणि मुलगा या व्यक्तिरेखांचे अपुशी असलेल्या जिव्हाळ्याचे चित्रण करता करता त्यांनी तत्कालीन समाजरचनेचा अनोखा पट सादर केला. खेड्यातील लोकांची जीवनशैली, परस्पर नात्यातील ताणेबाणे आणि आधुनिकीकरणाची चाहूल लागल्यावर तिथे घडत गेलेले बदल त्यांनी हळुवारपणे टिपले.

सत्यजित राय यांच्या या चित्रपटांच्या निर्मितीमध्ये इटालियन नववास्तववादाचा प्रभाव होता; मात्र राय यांनी त्यांच्या कथानकाला नेहमीच प्रादेशिक संदर्भ दिले. स्वातंत्र्योत्तर काळातील चित्रपटांमध्ये, विशेषतः 'महानगर' आणि 'चारुलता' मध्ये त्यांनी स्त्रीच्या लौकिक भूमिकेतील बदल अत्यंत सूक्ष्मपणे मांडले. 'महानगर'मधील आरती ही आर्थिक गरजेमुळे घराबाहेर पडणारी स्त्री आहे तर 'चारुलता' ही भावनिक आणि बौद्धिक एकटेपणाशी झुंजणारी स्त्री आहे. या चित्रपटांतील अवकाश हा घराच्या चार भिंतींपासून बाहेर पडून शहराच्या विस्तृत, पण तितक्याच परकेपणाने भरलेल्या जगात प्रवेश करतो. १९७० च्या दशकातील 'अरण्येर दिनरात्री', 'सीमाबद्ध', 'जनअरण्य', 'प्रतिद्वंद्वी' या चित्रपटांमध्ये शहरी जीवनातील नैतिक अध:पतन, बेरोजगारी आणि अस्तित्वाचा संघर्ष दिसून येतो. शहर हा येथे केवळ भौगोलिक अवकाश नसून तो एक मानसिक आणि नैतिक संकटांचा प्रदेश बनतो. या चित्रपटांमध्ये राय यांची दृष्टी टीकात्मक (critical) असली तरी निराशावादी नाही. 'आगंतुक'मध्ये त्यांनी तथाकथित आधुनिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना, मानवी मूल्यांवरील विश्वास टिकवून ठेवला आहे.

'आगंतुक'मधील मनमोहन मित्र ही व्यक्तिरेखा केवळ कथानकाचा भाग न राहता ती राय यांच्या अभिव्यक्तीचा आविष्कार बनते. राय यांचे समकालीन दिग्दर्शक ह्त्विक घटक आणि मृणाल सेन यांच्या तुलनेत, राय यांची शैली अधिक संयत आणि सूचक आहे. त्यांनी क्षोभनाट्य किंवा भेदक राजकीय भाष्य टाळून, मानवी जीवनातील सूक्ष्म भावनांवर लक्ष केंद्रित केले.

एकंदरीत, सत्यजित राय यांच्या चित्रपटांमध्ये 'काळ' आणि 'अवकाश' हे केवळ कथानकाचे घटक नसून ते सामाजिक परिवर्तनाचे सक्रिय साधन म्हणून येतात. त्यांच्या चित्रपटांमधून भारतीय समाजाच्या दीर्घकालीन बदलांचा, परंपरेपासून आधुनिकतेकडे आणि सामूहिकतेपासून वैयक्तिकतेकडे होणाऱ्या प्रवासाचा अभ्यास करता येतो. त्यामुळेच सत्यजित राय यांचे सिनेमे हे केवळ कलाकृती न राहता ते भारतीय समाजाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक बदलांचे जिवंत दस्तावेज ठरतात.

कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर

प्राचीन भारताचे, तिथल्या संस्कृतीचे, ज्ञानाचे, प्रगतीचे वर्णन करणारे अनेक परकीय प्रवासी होऊन गेले. इसवी सन पूर्व पाचव्या शतकात भारतात येऊन गेलेल्या हेरोडोटस नावाच्या ग्रीक प्रवाशानं आश्चर्य वाटून एक नोंद करून ठेवली आहे. तो म्हणतो, इथले लोक लोकरीच्या झाडांची शेती करतात. ही झाडावर उगवणारी लोकर आपल्या लोकरीहून अधिक मुलायम असते. त्यापासून इथले लोक कापड विणतात. हे कापड शरीराला अधिकच सुख देणारं असतं. झाडांवर उगवलेल्या या लोकरीचा रंग पांढरा शुभ्र असल्यामुळे ती वेगवेगळ्या रंगांत रंगवली जाऊ शकते.

आता हा हेरोडोटस ज्या संस्कृतीतून इथे आला होता त्या संस्कृतीच्या अभिजात असण्याचा आणि त्यांनी प्राप्त केलेल्या प्रगतीचा उदो उदो करणारी पुस्तकंच्या पुस्तकं या पाश्चात्त्य इतिहासकार लेखकांनी लिहिलीत. पण त्या ग्रीक लोकांना फक्त प्राण्यांच्या केसांपासूनच कापड विणता यायचं. झाडांवर उगवणारा कापूस हा पदार्थच त्यांना माहिती नव्हता. म्हणून हेरोडोटस पऱ्हाटीला लोकरीचं झाड 'वुलट्री' आणि कपाशीला झाडावर उगवणारी लोकर 'ट्रीवुल' म्हणतो. इसवी सन पूर्व पाचव्या शतकापर्यंत ग्रीकांना कापूस माहीत नसण्याचं कारण काय असावं बरं? ग्रीसच्या मध्य आणि दक्षिण भागात कापसाच्या वाढीसाठी आणि कापणीसाठी उत्तम असं उष्ण आणि कोरडं हवामान होतं. भरपूर सूर्यप्रकाशशिवाय जमीनही चांगली काळी आणि सुपीक होती. मग ग्रीकांना कापूस का माहीत नव्हता? कारण त्यांच्याकडे गृत्समद नावाचे ऋषी नव्हते. ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडलात यांच्या सूक्तांचा समावेश आहे. गाणपत्य म्हणजे गणपतीची उपासना करणारे साधक यांना गणपतीचे निस्सीम भक्त मानतात. ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडलातील सूक्त क्रमांक २३, ऋचा क्रमांक १ म्हणजे आजकाल गणपती देवतेचं आवाहन करताना म्हणतात. तोच हा मंत्र-

**'गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम्।**
**ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः शृण्वन्नूतिभिः सीद सादनम् ।।'**

हे गणांच्या गणपती, आम्ही तुझे आवाहन करतो. तू कवी/ज्ञानी लोकांमध्ये सर्वोत्तम कवी/ज्ञानी आणि प्रख्यात आहेस. तू(च) ज्येष्ठ राजा आणि ब्रह्मज्ञानी विद्वानांचा अधिपती आहेस. तू (यावे) आसनस्थ व्हावे आणि आमचे म्हणणे ऐकून घ्यावे (हीच प्रार्थना). वैदिक संदर्भ घेतला तर या ऋचेची देवता आहे ब्रह्मणस्पती आहे. 'गणपती' हे याच ब्रह्मणस्पतीचं विशेषण आहे. अर्थात हा सर्व बुद्धिवंतांचा- ज्ञानवंतांचा- विद्वज्जनांचा मुख्य आहे. तसाच तो गणांचा म्हणजे कळप, दल, समूह, संख्या, जमात, श्रेणी, मालिका किंवा वर्गाचाही सर्वश्रेष्ठ नेता आहे. नंतरच्या काळात या ऋचेचा विनियोग गणपती या देवतेचं आवाहन करण्यासाठी करण्यात येऊ लागला. या ऋचेचे द्रष्टा ऋषी आहेत गृत्समद! ऋग्वेदातील दुसऱ्या क्रमांकाच्या मंडलानुसार ते ऋषी अंगिरसांचे वंशज आणि शुनहोत्र ऋषींचे पुत्र होत. त्यामुळे अथर्ववेद, ऐतरेय ब्राह्मण, महाभारत, गणेशपुराणांसारख्या ग्रंथांत अनेक ठिकाणी त्यांचा उल्लेख 'शौनहोत्र' असाही केलेला आढळतो. एका कथेनुसार देवराज इंद्रांनी त्यांना अक्षय तप, वाक् सिद्धी, मंत्र-शक्ती आणि अखंड भक्तीचं वरदान दिलं आणि इंद्राच्याच सांगण्यावरून शुनक ऋषींनी गृत्समदांना दत्तक घेतले. त्यामुळे त्यांना 'शौनक' असं एक नामाभिधान मिळालं. गाणपत्य संप्रदाय म्हणजे गणपती या देवतेचे उपासक गृत्समद ऋषींना आद्य गाणपत्य मानतात. विदर्भ प्रांतात पसरलेल्या दंडकारण्यात 'कदंबगिरीग्रामी' (कदंब वृक्षांनी आच्छादलेल्या टेकडीच्या पायथ्याशी असलेलं गाव) त्यांनी तपश्चर्या केली आणि श्रीगणपती देवतेला प्रसन्न करून घेतलं.

आज हे स्थान विदर्भातल्या यवतमाळ जिल्ह्यातील 'कळंब' म्हणून ओळखले जाते. या स्थानी चिंतामणी गणेशाचं अतिशय प्राचीन मंदिर आहे. विदर्भातल्याच गवराळा, भांदक नावाच्या गावी स्थापन केलेला वरदविनायकाचा विग्रह, महडचा वरदविनायक आणि थेऊरचा चिंतामणी अशी तीन गणपती मंदिरंदेखील गृत्समद ऋषींना श्री गणेशानं त्या त्या स्थानी दिलेल्या दर्शनामुळेच अस्तित्वात आली, असा संदर्भ या मंदिरांच्या स्थलमाहात्म्यात येतो. गृत्समद ऋषींनी आपल्या सूक्ष्म निरीक्षणानं आणि चाणाक्ष बुद्धीनं एक अभूतपूर्व असं संशोधन केलं. त्यामुळे मानवी संस्कृतीत आमूलाग्र बदल घडून आला. तो शोध होता कपाशीच्या बोंडाचा. त्यातून निघणाऱ्या पांढऱ्या शुभ्र कापसाचा. त्याच्या तंतूंचा आणि त्यातून कातता येणाऱ्या सुताचा. त्या आधीचं जनजीवन हे प्राण्यांची कातडी पांघरून किंवा केसाळ प्राण्यांच्या केसांपासून विणलेल्या कापडाचा वापर करत थंडीपासून स्वत:चा बचाव करत. पण कापसाच्या शोधामुळे मानवाचं सगळं विश्वच बदलून गेलं. कापूस आणि नांगरटीची शेती हे दोन्ही शोध भारतातच लागले. नंतर सर्व जगात पसरले. हातमागावर सुताचे ताणे (मागावरचे लांबीच्या दिशेने असलेले उभे धागे) आणि बाणे (ताणा धाग्यांच्या मधून आरपार गुंफले जाणारे आडवे धागे) विणणं हा एक भला मोठा उद्योग आहे. गेल्या किमान २१ हजार वर्षांपासून हा उद्योग भारतीय करीत आलेले आहेत. कारण ऋग्वेदातील खगोलीय निरीक्षणांच्या नोंदींनुसार हा कालखंड किमान २१ हजार वर्षे मागे जातो. त्यातलं क्रमांक दोनचं मंडल सर्वात जुनं म्हणून सर्वमान्य आहे. त्यात गृत्समद ऋषी आणि त्यांच्या कापूसविषयीचा संदर्भ येतो. कौंडिण्यपूर, जि. अमरावतीत झालेल्या पुरातत्त्वीय उत्खननात चिक्कण मातीवर उमटलेले कापडाचे ठसे मिळाले. त्यांचा कालखंड साधारण इ.स.पू. ३००-२०० निश्चित करण्यात आला. त्या ठशांवरून स्पष्ट होतं की, त्या कापडात ३२ ताणे आणि २८ बाणे होते म्हणजे साधारणपणे एकूण ६० धागे प्रति चौरस इंच होते तर इ.स.पू. ३०० ते इ.स. ६०० कालखंडात विणण्यात आलेल्या भारतीय सुती कापडात सामान्य कापडासाठी प्रति चौरस इंच सुमारे २८ ते ४४ धागे असत.


कदंबगिरीग्रामी (कळंब, जि. यवतमाळ, विदर्भ)
कापसाचा शोध लावणारे गृत्समद ऋषी

भारतीय वस्त्रोद्योगाचा झेंडा संपूर्ण पृथ्वीतलावर फडकत होता. उत्तम प्रतीचं भारतीय सुती कापड, विशेषतः मलमल, इसवी सन पूर्व २००० सालापासून इजिप्तच्या राजघराण्यातील ममींसाठी कफन म्हणून आयात करून वापरत.

इजिप्तच्या दफनस्थळांमध्ये सापडलेल्या काही सर्वात जुन्या ममीदेखील भारतात विणलेल्या गेलेल्या उत्तम प्रतीच्या मौल्यवान कापडात गुंडाळण्यात आल्या असल्याचा भक्कम पुरावाच आता उपलब्ध झाला आहे. म्हणजेच किमान ३००० वर्षांहून अधिक काळापूर्वीपासून मिस्र देशाशी भारताचे व्यापारी संबंध सक्रिय होते. त्यात अत्यंत तलम पोतासाठी ओळखली जाणारी भारतीय सुती मलमल हा 'मोनोपोली आयटम' सामील होता. नंतरच्या काळातील नोंदींनुसार मेघना नदीच्या काठावर उगवणाऱ्या 'फुटी कापस' जातीपासून 'विणलेली हवा' म्हणून ख्याती असलेल्या ढाकाई मलमलमध्ये सर्वसाधारणपणे प्रति चौरस इंचात ८०० ते १२०० धागे असत.

**'मानवाच्या लज्जारक्षणा। ऋषी गृत्समद अवतार जाणा।**
**वस्त्रांचा हा ताणा बाणा। शक्य झाला जयामुळे।**
**त्यांच्या कार्यकर्तृत्वाची ही आठवकथा।।'**

---

बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे

# अवचिता परिमळू झुळकला अळुमाळू...

'झुळूक' हा सुंदर शब्द बोलीत आहे. या शब्दाचे अत्यंत सुरेख उपयोजन संत ज्ञानेश्वरांनी केले आहे. 'अवचिता परिमळू झुळकला अळुमाळू...' या ओळीतील चारही शब्द आता दुर्मिळ झाले आहेत. 'अळुमाळू' हा शब्द लोकजिव्हेवर फारसा नसेलच; पण आज अळुमाळू हा शब्द समजणार नाही. 'अवचित' या शब्दाचा अर्थ अकस्मात, अचानक, अकल्पित, एकाएकी, ध्यानीमनी नसताना असा काहीसा आहे. बोलीत चित म्हणजे मन, चित्त होय. चित असणे म्हणजे सावध असणे, जागे असणे. अवचित म्हणजे गाफिल असणे, बेसावध असणे. अवचित म्हणजे मनात नसताना.



**'अवचिता परिमळू झुळकला अळुमाळू'** मनात नसताना किंवा ध्यानीमनी नसताना वाऱ्याच्या नाजूक इवल्याशा झुळूकीसह सुगंध आला. हा परिमळु कसा आहे तर 'मी म्हणे गोपाळु आला गे माये' अवचित आलेली परिमळाची इवलीशी झुळूक गोपाळाच्या देहाच्या सुगंधासारखी आहे. परिमळाची झुळूक ही अत्यंत हळुवार, नाजूक आणि इवलीशी म्हणजे अळुमाळू आहे. ती तेवढ्यात अळुमाळूपणे अनुभवावी लागते. आता अवचित असलेल्या अवस्थेत मंद सुगंधाची संवेदना जाणवली आणि 'मी म्हणे गोपाळु आला गे माये' हा विचार मनात दरवळत राहिला. संत ज्ञानेश्वरांच्या सुंदर ओळी आहेत-

**'कापुरीं परिमळू दिसे वो अळुमाळु। हळू हळू सुढाळू पवनपंथें।'**

कापूर आणि सुगंध वेगवेगळे करता येत नाही. कापूर आणि सुगंध यांचे अस्तित्व एकमेकांसह असते. कापूर संपला की सुगंध संपतो. कापरात इवलासा सुगंध दडला आहे. हा सुगंध हळूहळू वाऱ्याच्या संगतीने परिसरात दरवळत आहे. ढळणे म्हणजे संपणे. 'सुढाळू पवनपंथे' म्हणजे वाऱ्यावर परिमळ दरवळत कापराचे संपणे होय. कापूर संपणे पण कापरात असलेल्या अळुमाळू परिमळाचे वाऱ्यावर अस्तित्व उरणे होय. 'अळुमाळू' हा शब्द आरती प्रभू यांच्या कवितेत आला आहे.

**ये रे घना ये रे घना न्हावूं घाल माझ्या मना**
**फुले माझी अळुमाळू वारा बघे चुर गळू**
नको नको म्हणताना...
**गंध गेला राना-वना ये रे घना.. ये रे घना..**

आरती प्रभूंनी संत ज्ञानेश्वरांच्या अभंगातील अळुमाळू हा शब्द वापरला आहे, पण 'परिमळू' ऐवजी ते 'गंध' हा शब्द योजतात. ज्ञानेश्वरांच्या विरहिणीप्रमाणेच 'ये रे घना'मध्येही स्त्री मन आहे.

**'अवचिता परिमळू झुळकला अळुमाळू**
**मी म्हणे गोपाळु आला गे माये'**

या ओळीतले स्त्रीमन आणि 'रे घना' म्हणणारे स्त्रीमन प्रतिभावंत आणि संवेदनशील आहेच.

**'ये रे घना ये रे घना, न्हावूं घाल माझ्या मना'** या शब्दांत आर्तता आहे. पावसाला मन:पूर्वक साद घातली आहे. संत ज्ञानेश्वरांच्या 'घनु वाजे घुणघुणा वारा वाजे रुणझुणा' या शब्दांतील वातावरण अपेक्षित आहे. रुणझुण वाऱ्यासह आलेल्या श्यामल मेघांतून बरसणाऱ्या तनमनाला न्हाऊ घालणाऱ्या पावसाला साद घातली आहे. आरती प्रभूंनी 'अळुमाळू' या शब्दाचे सुरेख उपयोजन केले आहे.

**फुले माझी अळुमाळू वारा बघे चुर गळू**

फुले अळुमाळू म्हणजे इवली इवलीशी आहेत, नाजूक आहेत. वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याने चुरगळली जाऊ शकतात एवढी ती इवलीशी आणि नाजूक आहेत. पण **'कापुरीं परिमळू दिसे वो अळुमाळु । हळू हळू सुढाळू पवनपंथें ।।'** या स्थितीच्या अगदी विरुद्ध स्थिती निर्माण झाली आहे. अळुमाळू फुलांचा सुगंध हळूहळू सुढाळू पवनपंथें असा दरवळला असता तर तक्रार नव्हती; पण नको नको म्हणताना वाऱ्याने अळुमाळू फुले अशी काही चुरगळली की क्षणार्धात गंध साऱ्या रानावनात गेला. येथे परिमळ हा नाजूक शब्द न येता गंध हा शब्द आला आहे. वाऱ्यावर हळूहळू दरवळतो तो परिमळ आणि एका क्षणात सर्वत्र पसरतो तो गंध. 'परिमळ म्हणुनी चोळू नये फूल' हे संत तुकारामांचे शब्द अर्थसघन आहेत.

'फुले माझी अळुमाळू वारा बाहे चुरगळू' या शब्दांपाशी 'परिमळ म्हणुनी चोळू नये फूल' हे संत तुकारामांचे शब्द आठवणे स्वाभाविक आहे. संत ज्ञानेश्वरांनी वाऱ्याच्या सुखावणाऱ्या आवाजाला रुणझुण म्हटले आहे. कानासह मनाला सुखदायी वाटणाऱ्या आवाजाला ज्ञानेश्वरांनी रुणझुण असे म्हटले आहे.

संत ज्ञानेश्वरांनी 'कापुरीं परिमळू दिसे वो अळुमाळु' या ओळीत परिमळ या शब्दाची अर्थसघनता नेमकी अभिव्यक्त केली आहे. झुळूक या शब्दाला संवेदनात्मक अर्थ आहे. झुळूक दिसत नाही, पण स्पर्श आणि गंध या संवेदनांतून जाणवते. झुळकणे या क्रियापदातून स्पर्श आणि गंध संवेदनांची अनुभूती झाल्याचे सूचित होते. अवचिता परिमळू झुळकला अळुमाळू या शब्दांतून किंचितसा इवलासा सुगंध झुळकीसरशी दरवळला हे सूचित होते. आज झुळूक, झुळकणे, अवचित हे सारे शब्द बोलण्यात नाहीत. रुणझुण, अळुमाळू यासारखे बोलीतील शब्द आपल्या भाषेतले नाहीत, असेही काहींना आज वाटू शकते.

**'वाऱ्याची अस्तुरी तिच्या अंगी कस्तुरी..'** लोकवाणीतील अस्तुरी, पस्तुरी आणि कस्तुरी या तीनही काव्यात्म शब्दांचे अर्थ फार वेगवेगळे आहेत. कस्तुरी हा शब्द अजूनही बोलीत आहे. त्याचा अर्थही सर्वांना माहीत आहे. अस्तुरी म्हणजे पत्नी, सहचारिणी, बायको. 'आठवणींचा झोका' या पुस्तकात कवी ना. धों. महानोर यांनी 'अस्तुरी' हा शब्द असलेल्या एका लोकगीताच्या ओळी दिल्या आहेत.

'घरची अस्तुरी कशी पुरणाची पोळी पराया नारीसाठी घाले खिशामंधी चोळी घरची अस्तुरी कसा हळदीचा गाभा पराया नारीसाठी हाये गल्लोगल्ली उभा घरची अस्तुरी कसं खोबऱ्याचं खांड पराया नारीसाठी घाले मोरीमंधी तोंड घरची अस्तुरी कसा पाण्याचा तलाव पराया नारीसाठी केला घराचा लिलाव.' घरी देखणी आणि सुस्वभावी अस्तुरी असताना परस्त्रीच्या मागे असणाऱ्या पुरुषाविषयीचा तीव्र राग स्त्रीप्रतिभेने अत्यंत समर्पक प्रतिमांमधून व्यक्त केला आहे. अस्तुरी हा बोलीतील शब्द आता लोकगीतांसह कथा-कविता वगैरे कलाकृतींशिवाय कुठेच आढळत नाही. स्त्रीप्रतिभेने रचलेल्या एका गीतात 'अस्तुरी जल्मा नको घालू शिरीहारी रात न दिस परायाची ताबेदारी' अशा ओळी आहेत. स्त्रीदास्याचे हे वर्णन वास्तवदर्शी आहे.

**'वाऱ्याची अस्तुरी तिच्या अंगी कस्तुरी'** या लोकवाणीतील शब्दकळेत अस्तुरीचा अर्थसुगंध उरला आहे. पस्तुरी म्हणजे मोजून दिलेल्या वस्तू किंवा पदार्थानंतर पुन्हा थोडे जास्तीचे देणे. गावात दही, दूध किंवा भाजी असे पदार्थ मापाने मोजून दिल्यानंतर पुन्हा थोडे दिले जातात, असे पसाभर, चमचाभर, मूठभर जास्तीचे देण्याला पस्तुरी म्हणतात. घेणारा पस्तुरी घ्यायला थांबतो आणि देणाराही मनापासून देतो. आता पस्तुरी देणे- घेणे आणि हा शब्द काहीच उरले नाही.

---

# या चिमण्यांनो परत फिरा रे...

**'गुगल' आणि 'मायक्रोसॉफ्ट'ला पर्याय ठरलेल्या 'झोहो'चे संस्थापक श्रीधर वेम्बू यांनी अमेरिकेतील भारतीयांना पुन्हा मायदेशी परतण्याचे भावनिक आवाहन केले. भारतमातेला तुमच्या विद्वत्तेची गरज आहे, हे वेम्बू यांचे 'ट्विट' भारतातील 'ब्रेनड्रेन'चे वास्तवदर्शकच... या चिमण्यांनो परत फिरा रे, घराकडे अपुल्या...**

समाजभान
विजय कुलकर्णी



लतादीदींच्या सुरेल आवाजातील 'जिव्हाळा' चित्रपटातील गदिमांच्या गीताचे हे बोल. आपल्या लेकरांच्या परतीच्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या व्याकूळ मातेचे भावस्पश चित्रण गदिमा या गीतातून शब्दबद्ध करतात. आज या गीताच्या पंक्ती आठवण्याचे कारण म्हणजे, असेच एक आवाहन भारतमातेच्या एका सुपुत्राने सातासमुद्रापार गेलेल्या लाखो भारतीयांना केले आहे. 'झोहो' या सध्या भारतात 'गुगल' आणि 'मायक्रोसॉफ्ट'ला पर्याय ठरू पाहणाऱ्या कंपनीचे संस्थापक श्रीधर वेम्बू यांनी अमेरिकेतील भारतीयांना पुन्हा मायदेशी परतण्याची साद काल 'ट्विटर'वरून घातली. त्यानंतर पुन्हा एकदा भारतातून अमेरिकेत होणार्या 'ब्रेनड्रेन'चा आणि त्याच्या भारतावरील परिणामांचा विषय चर्चेत आला आहे.

मुळात श्रीधर वेम्बू यांच्या वक्तव्याला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकत्याच केलेल्या वादग्रस्त वक्तव्याची किनार लाभली आहे. मागे ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडियावर अमेरिकेतील जन्मसिद्ध नागरिकत्वाच्या मुद्द्यावरून भारत आणि चीनवर निशाणा साधत, या देशांना चक्क 'नरकाचे द्वार' संबोधले. पण, ट्रम्प यांच्या या अपमानास्पद टिप्पणीनंतर, त्यांच्यावर टीकेची झोड उठली आणि त्यांनी घुमजाव केले. तेव्हा, ज्या देशाचा राष्ट्राध्यक्ष तुमच्या मायदेशाला 'नरकाचे द्वार' संबोधतो, त्या देशाला आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर सिंचित करण्यापेक्षा, भारतात या, आपल्या देशाच्या जडणघडणीत योगदान द्या, हा वेम्बू यांच्या आवाहनाचा मथितार्थ. वेम्बू यांनी असे आवाहन करणे, यात मुळात गैर काहीच नाही. पण, केवळ भावनिक होऊन विचार न करता, 'ब्रेनड्रेन'च्या संकटाचा सांगोपांग विचार करणे यानिमित्ताने क्रमप्राप्त ठरावे.

भारतीयांना अमेरिकेचे आकर्षण फार पूवपासूनचेच. त्यामुळे देशभरातून आधी शिक्षणासाठी, मग रोजगारासाठी पिढ्यान्पिढ्या अमेरिकेत स्थायिक होऊन तेथील संस्कृतीशी समरस झाल्या. उच्च शिक्षणाच्या, नोकरीच्या अमाप संधी, गलेलठ्ठ पगार आणि आधुनिक, मोकळी- ढाकळी जीवनशैली ही भारतीयांची अमेरिकेत स्थलांतरित होण्यामागची काही प्रमुख कारणं. एकाआकडेवारीनुसार, 'स्टेम' (सायन्स, टेक्नोलॉजी, इंजिनिअरिंग, मॅथमेटिक्स), आयटी, औषधनिर्मिती क्षेत्राशी संबंधित जवळपास एक लाखांहून अधिक भारतीय दरवष मोठ्या आशेने अमेरिका गाठतात. अमेरिकेतील 'स्टेम' क्षेत्रात तर परदेशी स्थलांतरितांपैकी तब्बल २९ टक्के संख्या ही एकट्या भारतीयांचीच. तसेच २०२४च्या एका आकडेवारीनुसार, १.६ लाख विद्याथ हे अमेरिकेत संशोधनासंबंधी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत होते. एवढेच नाही, तर आज 'गुगल', 'मायक्रोसॉफ्ट', 'अडॉब', 'आयबीएम', 'युट्यूब' यांसारख्या जागतिक कीर्तिमान प्राप्त कंपन्यांच्या प्रमुखपदीही भारतीय वंशाचे अमेरिकनच विराजमान आहेत. त्यामुळे भारतीयांनी त्यांच्या बुद्धिमत्तेच्या जोरावर केवळ अमेरिकेतील नोकर्या खिशात घातल्या, हे अर्धसत्य ठरावे. कारण, आज ज्या भारतीय वंशाच्या प्रमुखांकडे या जागतिक कंपन्यांची धुरा आहे, त्यांच्यामुळे अमेरिकेत लाखो हातांना रोजगार मिळतोय, याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. असो. एकीकडे अमेरिकेत स्थायिक झालेल्या या बुद्धिवंतांमुळे भारताचे 'ब्रेनड्रेन' होत असले तरी, हेच भारतीय मायदेशी ३२ ते ३५ अब्ज डॉलर्स इतकी भरघोस रक्कम पाठवतात. यावरून अमेरिकेतील भारतीयांची संख्या ही किती लक्षणीय आहे, याचा अंदाज यावा. पण, ट्रम्प सरकारच्या स्थलांतरितांविरोधी धोरणांमुळे ही परिस्थिती झपाट्याने बदलत चालल्याचे स्पष्टपणे दिसून येते. खरं सांगायला गेले, तर अमेरिकेतून पुन्हा भारतातच कायमस्वरुपी स्थायिक होण्याची प्रक्रिया ही ट्रम्प दुसऱ्यांदा सत्तेवर येताच सुरू झाली. त्यामागचे कारण म्हणजे, ट्रम्प यांचे 'अमेरिका फर्स्ट' धोरण. अमेरिकेतील नोकऱ्या, रोजगार यांवर अन्य कोणापेक्षाही स्थानिक अमेरिकनांचा अधिक हक्क, या तत्त्वानुसार ट्रम्प यांनी स्थलांतरितांविरोधात आक्रमक धोरणे राबवायला सुरुवात केली. 'एच १बी व्हिसा'चे नियम कठोर करण्याबरोबरच, बेकायदेशीररित्या स्थलांतरितांना चक्क हातात बेड्या ठोकून मायदेशी पाठविण्यात आले. त्यामुळे कित्येकांचे 'अमेरिकन ड्रिम'चे स्वप्न तर भंगले; शिवाय जे भारतीय विद्याथ, नोकरदार अमेरिकेत स्थायिक होण्याची मोठे स्वप्न उराशी बाळगून होते, त्यांनीही 'गड्या आपला देशच बरा' या भावनेने देशातच स्थिरस्थावर होण्याचा निर्णय घेतला. त्यातच नुकत्याच समोर आलेल्या एका अहवालानुसार, अमेरिकेत स्थायिक झालेले ४० टक्के भारतीय राजकीय, सामाजिक आणि आर्थिक कारणांमुळे पुन्हा मायदेशी परतण्याचा विचार करीत आहेत. त्याशिवाय, 'कोविड' काळातील अमेरिकेतील विदारक परिस्थिती, राहणीमानाचा वाढता खर्च, कंपन्यांचे 'एआय'वरील वाढते अवलंबित्व आणि नोकरी गमावण्याची भीती, भारतीयांवरील वर्णद्वेषी टीका आणि प्रत्यक्ष हल्ले आणि दिवसेंदिवस एकूणच खालावणारी परिस्थिती लक्षात घेता, अमेरिकेतील भारतीयांनाही आता मायदेश खुणावू लागला आहे. पण, मुळात अधिकाधिक भारतीयांना अमेरिकेत अथवा परदेशात जाण्यापासून परावृत्त करायचे असेल, तर सरकारला देशातील शिक्षणाचा दर्जा, संशोधन क्षेत्रातील गुंतवणुकीचा अधिक सर्वसमावेशक विचार करणे आवश्यकच. संशोधनावर आपण सध्या एकूण 'जीडीपी'च्या अवघे ०.६५ टक्के खर्च करतो. हे प्रमाण किमान १.५ ते २ टक्क्यांवर आणणे अपेक्षित. त्याचबरोबर संशोधनाच्या सुविधांचा, 'रामानुजन फेलोशिप', 'पीएमआरफ फेलोशिप' यांसारख्या शिष्यवृत्तीपर योजनांचाही अधिक विस्तार करावा लागेल. 'स्टार्टअप इंडिया', 'मेक इन इंडिया'ला बळ देणे, उद्योगधंदे आणि शैक्षणिक संस्थांमधील दरी कमी करणे, कौशल्य विकासाला चालना यांसारख्या उपाययोजनांमुळे देशातील 'ब्रेनड्रेन' कमी होण्यास नक्कीच हातभार लागू शकतो. तसेच 'ब्रेनड्रेन' हे केवळ शिक्षण, नोकऱ्या, स्टार्टअपपुरतेच मर्यादित नाही, तर देशातील पायाभूत सोयी-सुविधांचा विकास, स्वच्छ पर्यावरणाची हमी, भ्रष्टाचाराला आळा आणि लालफितशाहीला फाटा दिल्यास 'ब्रेनड्रेन' रोखता येईल. 'ब्रेनड्रेन' थांबवण्याबरोबरच जे अमेरिका अथवा परदेशातून पुन्हा भारतात स्थायिक होऊ इच्छितात, व्यापक धोरणात्मक सुधारणा हाती घ्याव्या लागतील. मायदेशी परतणाऱ्या अनिवासी भारतीयांसाठी आणि त्यांच्या कुटुंबांसाठी व्हिसा आणि 'वर्क परमिट' प्रक्रिया अधिक सुलभ केल्यास हे शक्य होईल. एकूणच काय, तर 'ब्रेनड्रेन'पासून ते 'ब्रेनगेन'पर्यंतचे स्थित्यंतर ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. सरकारने त्या दिशेने वाटचाल सुरू केली आहेच. त्यात आता 'झोहो'सारख्या भारतीय स्टार्टअप्सची भूमिकाही तितकीच महत्त्वाची!

# ग्रहसंकेत

**(रविवार, ३ मे ते शनिवार,९ मे २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार

'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ३ मे-** गुरु बसवमहास्वामी रथोत्सव बिळूर, रामसिद्ध महाराज यात्रा राम हिंगणी(जि. सोलापूर), श्री ज्योतिर्लिंग यात्रा बोरगाव (चिकोडी), सदगुरू माणिकनाथ महाराज पुण्यतिथी सोलापूर, उपासनीबाबा जयंती साकुरी (राहता) ✻ **सोमवार, ४ मे-** गुलबर्गा उरूस ✻ **मंगळवार, ५ मे-** अंगारक चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २२: १९, अहिल्यानगर- २२: ११, कलबुर्गी-२१: ५८, कोल्हापूर-२२: ०७, जालना-२२: ०८, धाराशिव-२२: ०३, नांदेड-२२: ००, पंढरपूर-२२: ०५, परभणी-२२:०३, पुणे-२२: १३, बीड-२२: ०७, लातूर-२२: ०२, विजापूर-२२: ०२, छत्रपती संभाजीनगर-२२: ११, सातारा-२२: ११, सोलापूर-२२: ०३), बिरदेव जन्मोत्सव वाशी, पट्टणकोडोली ✻ **बुधवार, ६ मे-** राजर्षी शाहू महाराज पुण्यदिन ✻ **गुरुवार, ७ मे-** संत चोखोबा मेळा पुण्यतिथी मंगळवेढा, ताडोबा देवस्थान जत्रा अणसूर वेंगर्ला ✻ **शुक्रवार, ८ मे-** जानुबाई यात्रा भोसे (ता. पंढरपूर), यल्लमादेवी यात्रा मल्लेवाडी (ता. मिरज), दत्त महाराज कदम पुण्यतिथी देवर्डे (वाळवा), रवींद्रनाथ टागोर जयंती, जागतिक रेडक्रॉस दिन ✻ **शनिवार, ९ मे-** कलाष्टमी, धनिष्ठा, नवरात्रारंभ, महाराणा प्रताप जयंती, सिद्धेश्वर महाराज उत्सव कोल्हापूर, कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी, गोपाल कृष्ण गोखले जयंती, व्यंकटेश बालाजी वर्धापन दिन नागांव (ता. हातकणंगले)

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ३, ६ (१६ पर्यंत), ९ मे ✻ **डोहाळ जेवण-** ३, ६ (१६ पर्यंत) मे ✻ **बारसे-** ३, ९ (१४ पर्यंत) मे ✻ **गृहप्रवेश-** ३, ६, ८ (१२ पर्यंत), ९ मे

**मेष :- समस्यांतून मार्ग निघेल**

इच्छा, गरज आणि झोप जीवनात कधीही पूर्ण होत नाहीत. राशी स्वामी मंगळाचा मंगळवारी गुरुशी होणारा केंद्रयोग आर्थिक समस्यांतून मार्ग काढणार आहे. अनावश्यक खर्च टाळावा. घरगुती उपकरणाची खरेदी कराल. आत्मविश्वासाने रहावे. प्रगती होत जाईल. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. ३, ७

**वृषभः- यांत्रिक क्षेत्रात प्रगती**

जो जेवा सुविधेत आहे, तो तेवढ्याच दुविधेत आहे. धनस्थ गुरु लाभातील मंगळाशी केंद्र योग करीत आहे. त्यामुळे यांत्रिक क्षेत्रात, वित्तीय संस्थांत प्रगती होईल. वक्तृत्व कलेचा गौरव होईल. सरकारी कामे विलंबाने मार्गी लागतील. परिश्रमाने आर्थिक प्रगती होईल. गुढ विद्येत प्रगती होईल. सामंजस्याने रहावे. शुभ ता. ६, ९

**मिथुनः- नव्या विचारांना चालना**

पुस्तकं आपणास बदलत नाहीत, ते आपल्याला ओळखायला शिकवतात. राशीतील गुरुचा कर्मस्थ मंगळाशी केंद्र योग होत आहे. त्यामुळे उत्साहाने विविध कामे मार्गी लावू शकाल. नव्या विचारांना चालना मिळेल. सरकारी कामे होतील. नोकरीत वरिष्ठांशी सामंजस्याने रहावे. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. ३, ७

**कर्कः- अपेक्षित घटना**

या जगात कमी मोत्यांची नाही, कमी आहे त्यांना ओळखणाऱ्याची. भाग्यस्थ मंगळाचा गुरुशी होणारा केंद्रयोग भाग्यवृध्दिंगत करणारा आहे. अपेक्षित घटना घडतील. नव्या संधीचे स्वागत करावे. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. संसर्गजन्य आजारापासून जपून असावे. आर्थिक कारणावरून वाद टाळावेत. शुभ ता. ६, ९

**सिंहः- आर्थिक प्रगती**

बगळा मासे शोधतो, राजहंस मोती शोधतो, पाणी तेच असतं फरक विचारांचा असतो. मंगळ गुरुचा केंद्रयोग आर्थिक प्रगती करणार आहे. शारीरिक बाबतीत समस्या संभवतात. काळजी घ्यावी. गृहसजावट, खाद्यपदार्थ अशा व्यवसायात अनुकूलता राहील. योजलेली कामे मनासारखी होतील. नव्या योजना मार्गी लावता येतील. उष्णतेपासून जपून असावे. शुभ ता. ७, ९

**कन्याः- कलागुणांचा विकास**

उध्वस्त अथवा परिवर्तन करण्याची शक्ती विचारात असते. राशी समोरच मंगळ, शनी आहे. त्यामुळे आपले विचार कसे योग्य राहतील याची काळजी घ्यावी. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. उपजत कलागुणांचा विकास होईल. कौटुंबिक जीवनात समस्या संभावतात. सामंजस्याने रहावे. दगदग टाळावी. शुभ ता. ६, ९

**तुलाः- मनासारखी प्रगती**

भाकरी जगायला मदत करेल तर पुस्तके कसं जगवायचे ते शिकविता. राशी समोरील रवि- बुधामुळे अंगीकृत कार्यात मनासारखी प्रगती होईल. मंगळ गुरु केंद्र उपासनेतून अनुकूलता वाढेल. नव्या संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रकृतीच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. ५, ७

**वृश्चिकः- चांगल्या संधी मिळतील**

पुस्तके आणि चांगली माणसं लगेच कळत नाही, त्यांना वाचावच लागतं. मंगळ गुरुचा केंद्रयोग चांगली संधी मिळवून देणार आहे. उत्साहवर्धक घटना घडतील. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. वादविवाद टाळावेत. आहार विहाराकडे दुर्लक्ष करू नका. रेंगाळलेली कामे होतील. आर्थिक कामे मनासारखी होतील. चिंता नको. शुभ ता. ७, ९

**धनुः- कार्यक्षेत्रात प्रगती**

पुस्तक म्हणजे ज्ञान, विचार आणि संस्काराची शिदोरी. राशी स्वामी गुरूचा मंगळाशी होणारा केंद्रयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणार आहे. फार दगदग करू नका. अस्वास्थ राहील. स्थावर प्रश्न विचाराने सोडवावेत. वाहनांपासून जपून असावे. संततीची प्रगती मनासारखी होईल. आहाराकडे दुर्लक्ष करू नका. शुभ ता.३, ७, ९

**मकरः- नव्या संधी**

दगड एकदाच मंदिरात जातो आणि भगवंत होऊन बसतो. मंगळ- गुरु केंद्र योग कार्यक्षेत्रात प्रगती करणार आहे. उपजत कलागुणांमध्ये प्रगती होईल. नव्या संधीचे स्वागत करावे. सरकारी कामासाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. अपेक्षित घटना घडतील. चिंता करू नका. अनुकूलता वाढत जाईल. शुभ ता. ७, ९

**कुंभः- कार्यक्षेत्रात प्रगती**

अंधाधुंद वृक्षतोड हीच आजच्या उष्णतेला कारणीभूत आहे. धनस्थ मंगळाचा गुरुशी होणारा केंद्रयोग आर्थिक विनियोग योग्य प्रकारे करणारा आहे. कार्यक्षेत्रात प्रगती घडेल. विलंबाने पण मनासारख्या घटना घडतील. स्थावर सौख्य लाभेल. मतभेदाचे प्रसंग टाळावेत. अनावश्यक खर्च टाळावा. अपेक्षित प्रगती होईल. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. ६, ७


**मीनः- नव्या विचारांना चालना**

प्रत्येक संघर्ष हा नव्या यशाची सुरुवात असते. राशीतील मंगळाचा सुखस्थ शनिशी होणारा केंद्रयोग कार्यक्षेत्रात धडाडीने प्रगती करणार आहे. प्रकृतीची काळजी घ्यावी. जुने येणे वसूल होईल. नव्या विचारांना चालना मिळेल. काव्य, गायनादि कलेत आनंद मिळवू शकाल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. संघर्षातून अपेक्षित यश मिळेल. शुभ ता. ६, ९

!! शुभ भवतु !!

तत्वदर्शन **डॉ. राजेंद्र डोळक**

# भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास



भारतीयांच्या तत्त्वज्ञानाचे कालदृष्ट्या प्रामुख्याने वैदिक काल, दर्शनपूर्व काल आणि दर्शन काल असे तीन कालखंड पडतात. वैदिक कालाचे पुन्हा मंत्रकाल, ब्राह्मणकाल, आरण्यककाल आणि उपनिषत्काल असे चार कालखंड पडतात. दर्शनपूर्व कालात तात्त्विक ग्रंथ म्हणून भगवद्गीता हा एक जगन्मान्य असा महत्त्वाचा ग्रंथ आहे. यानंतर निरनिराळ्या दर्शनांचा कालखंड पडतो. या सर्वांचा अभ्यास झाला की, भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास झाला असे समजावे. यात सर्वप्रथम अर्थातच वेदवाङ्मय येते.

वेदांचा सांगोपांग अभ्यास कसा करावा, याची एक परंपरामान्य पद्धत आहे. या पद्धतीला षडंग वेदाध्ययन पद्धती असे म्हणतात. कोणत्याही वेद संहितेचा अभ्यास या सहा अंगांच्यासह करायला हवा. ही सहा अंगे पुढील सुभाषितात सांगितली आहेत-

'शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छंदसमिती । ज्योतिषं नयनं चैव षडंगो वेद उच्चते ॥'

**(१) शिक्षा -** यात वेद कसा म्हणावा याच्या सूचना वेदपाठकांना दिल्या आहेत. वेद ऐकून व पाठ करून त्यांची परंपरा जिवंत ठेवत असल्यामुळे ते चांगल्या रीतीने म्हटले जाऊन नेहमी शुद्ध राहतील; त्यात अपपाठ शिरणार नाहीत, याची काळजी घ्यावी लागे.

**(२) कल्प -** कल्पसूत्रांत श्रौत, गृह्य, धर्म व शुल्व सूत्रांचा समावेश होतो. यज्ञांची माहिती श्रोत्रसूत्रांत आहे. १६ संस्कारांची, पंचमहायज्ञांची व श्राद्धादिकांची माहिती गृहसूत्रांत दिली आहे. धर्मसूत्रांत चार वर्णांच्या कर्तव्यांची माहिती असून शुल्वसूत्रांत यज्ञाला लागणाऱ्या वेदी, अग्नी कुंडे वगैरेंची रचना कशी करावी, हे सांगितले आहे.

**(३) व्याकरण -** व्याकरण म्हणजे पाणिनीची 'अष्टाध्यायी.' या ग्रंथाची जगातील व्याकरणशास्त्रावरील अत्युत्तम ग्रंथ म्हणून जगातील पंडित प्रशंसा करीत असतात.

**(४) निरुक्त -** या ग्रंथात वेदातील निरनिराळ्या शब्दांची व्युत्पत्ती दिली असून ही व्युत्पत्ती कशी करावी, भाषेत बदल कसे व कोणकोणते होतात याचे वर्गीकरण दिले आहे. भाषाशास्त्रावरील या अत्यंत प्राचीन ग्रंथाचे महत्त्व आधुनिक भाषाशास्त्रज्ञ फार मानतात.

**(५) छंद -** हा पिंगलाने केला असून त्यात वैदिक ऋचांच्या वृत्तांची माहिती दिली आहे.

**(६) ज्योतिष -** हा ग्रंथ लगध आचार्य यांनी केला असून त्यात यज्ञोपयोगी ज्योतिषाची माहिती दिली आहे. षडंगांप्रमाणेच चार उपांगांचाही वेदवाङ्मयात समावेश करावा लागतो. ही चार उपांगे म्हणजे पुराणे (अशी १८ पुराणे आहेत), न्यायदर्शन, मीमांसादर्शन आणि धर्मशास्त्र होत. अशारीतीने चार वेद, सहा वेदांगे किंवा षडंगे आणि चार उपांगे यांना १४ विद्या म्हणतात. या १४ विद्येत चार उपवेदांचा समावेश करावा. आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद आणि अर्थशास्त्र हे चार उपवेद होत. या चार उपवेदांचा समावेश झाल्यानंतर १८ विद्या होतात.

या १८ ही विद्यांचे अध्ययन झाले म्हणजे सांग वेदाध्ययन झाले, असे समजण्यात येते. वेदांच्या या अध्ययनास स्वाध्याय म्हणतात. भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात संपूर्ण नऊ दर्शनांचा अभ्यास अपेक्षित आहे. प्रमुख दर्शनांची संख्या आपल्याकडे नऊ मानल्या गेली आहे. वैदिक परंपरेचे अभिमानी पहिल्या सहांनाच 'दर्शने' म्हणतात. त्यांना 'षड्दर्शने' म्हणतात. इतर तीन दर्शनांचा अंतर्भाव ते 'दर्शनां'त करीत नाहीत. आस्तिक दर्शनांचे पुन्हा श्रौत व अश्रौत असे दोन प्रकार पडतात. श्रौतदर्शन श्रुतीच काय ते ज्ञानप्राप्तीचे व वादनिर्णयाचे एकमेव साधन आहे असे मानते. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक ही 'अश्रौतदर्शने' समजली जातात. ही दर्शने श्रुतींचे प्रामाण्य मान्य करतात. पण केवळ श्रुतिवाक्य प्रमाण न मानता तर्क व बुद्धी हीसुद्धा प्रमाण मानतात. चार्वाक, बौद्ध, जैन इत्यादी नास्तिक दर्शने आहेत. यांना वेदप्रामाण्य अमान्य आहे.

या दर्शनांचा आत्मवादी व अनात्मवादी असा आणखी एक भेद केला आहे. जी दर्शने आत्म्याचे अस्तित्व मानतात, ती आत्मवादी व जी मानीत नाहीत ती अनात्मवादी. सर्व आस्तिक दर्शने आत्मवादी दर्शने होत व सर्व नास्तिक दर्शने अनात्मवादी होत. भारतीय दर्शने कोणत्या क्रमाने कोणत्या काळी झाली हे नक्की कळत नाही. त्यांच्या कर्त्यांविषयीही फारशी माहिती हाती लागत नाही. ही दर्शने पूर्वाचार्यांचे खंडन-मंडन करीतच विकसित झालेली असल्यामुळे त्यातील पूर्वाचाऱ्यांचे उल्लेख तपासूनच त्यांचे पौवापौर्य ठरवावे लागते. ही दर्शने एकमेकांवर टीका करीत विकसित झाली असल्यामुळे एकाचा अभ्यास म्हणजे इतरांचाही अभ्यास! त्यांच्या टीका करण्याच्या विशिष्ट पद्धतीला खंडन- मंडन पद्धती असे नाव आहे. ज्याचे खंडन करावयाचे तो 'पूर्वपक्ष' व ज्याचे समर्थन करावयाचे तो 'उत्तरपक्ष.' एकाच विषयावर निरनिराळे लिखाण झाले की, त्यांची तुलना व श्रेष्ठ-कनिष्ठ भाव येतोच; तसा तो 'दर्शनां'मध्ये आला. आपापल्या मतानुकूल दर्शन हे सर्वश्रेष्ठ आहे, असे त्या त्या दर्शनांचे अभिमानी सांगतात. परंतु हे चूक असून सर्वच दर्शने समान दर्जाची आहेत. त्यात कोणतेही एक श्रेष्ठ व दुसरे कनिष्ठ असे मानणे पक्षपाती ठरते. चार्वाक हीन व वेदांत उच्च किंवा या उलट स्थिती, ही भूमिकाच सदोष असून ती प्रगतीला मारक ठरत असते. या सर्व तत्त्वदर्शनांची माहिती एकत्र देणारा एकच उत्तम ग्रंथ संस्कृतात आहे. तो 'सर्वदर्शनसंग्रह' हा होय. हा ग्रंथ माधवाचार्य आणि सायणाचार्य यांनी लिहिला आहे. माधव अथवा माधवाचार्य हे एक तपस्वी ब्राह्मण. विजयनगर शहर हे हरिहरराय याने माधवाचार्यांच्या मदतीने स्थापिले. विजयनगरचे ते मुख्य प्रधान झाले.

'सर्वदर्शनसंग्रह' हा त्यांचा पहिलाच ग्रंथ समजला जातो. हा ग्रंथ त्यांनी मंत्रिपद स्वीकारण्यापूर्वी इ. स. १३३७ मध्ये वयाच्या ४२ व्या वर्षी लिहिला. या ग्रंथात चार्वाक मताला आरंभ करून शांकरदर्शनापर्यंत उत्तरोत्तर १६ दर्शनांचे व्याख्यान (विवरण) केले आहे. त्या त्या या पंडितांच्या ग्रंथांतून अवतरणे देऊन विवेचन केले असल्यामुळे हा ग्रंथ सहजच गद्यपद्यात्मक असा झाला. यातील शेवटचे शांकरमताचे प्रकरण हे माधवाचार्यांचे धाकटे बंधू सायणाचार्य यांचे आहे, असा शेवटी उल्लेख केला आहे. स्वतः विद्यारण्य हे अद्वैतवादी शांकरमतानुयायी होते. त्यामुळे त्यांनी इतर मतांची माहिती पहिले देऊन त्या तुलनेने शांकरमत हे श्रेष्ठ कसे ठरते, या उद्देशाने शांकरमताची माहिती सर्वात शेवटी दिली असावी.

पान १ वरून

## जागतिक अर्थसत्तेकडे भारताची वाटचाल

जो देश एकेकाळी आयातीवर आणि विदेशी मदतीवर अवलंबून होता, तोच भारत आज जागतिक व्यापाराचे नियम स्वतःच्या अटींवर ठरवतो आहे. अमेरिकेपासून ते न्यूझीलंडपर्यंतचे देश भारतासोबत मैत्री आणि व्यापार वाढवण्यासाठी उत्सुक असतील, तर ते भारताच्या उदयोन्मुख जागतिक नेतृत्वाचेच लक्षण आहे. पाच ट्रिलियन आणि त्यापुढे दहा ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या भारताच्या प्रवासात आजचा करार, एक मैलाचा दगड ठरेल. किवींच्या देशातून वाहणारे हे गुंतवणुकीचे नवे वारे भारताच्या आर्थिक प्रगतीच्या इंजिनाला नवी गती देतील, हा विश्वास या ऐतिहासिक घटनेतून निश्चितच निर्माण झाला आहे.

पान १ वरून

## सांगा 'नरकाचे द्वार' नेमके कोणते?

कृतज्ञता हा आपल्या भारतीय स्वभावाचा अविभाज्य भाग आहे. तुम्हाला वाटत असेल की पुढील निवडणूक हे चित्र बदलेल; पण प्रत्यक्षात तुमची निवड अशी असेल; एकीकडे भारतीय संस्कृतीबद्दल द्वेष बाळगणारे आणि दुसरीकडे स्वतः संस्कृतीचाच तिरस्कार करणारे. हीच 'कट्टर उजवे' विरुद्ध 'जागरूक डावे' अशी लढाई आहे आणि तुम्ही त्या संघर्षाचे केवळ प्रेक्षक आहात. आपल्या पोस्टचा समारोप करताना ते म्हणतात, कृपया मायदेशी परत या. भारतमातेला तुमच्या प्रतिभेची गरज आहे. आपल्या विशाल तरुण पिढीला समृद्धीकडे नेण्यासाठी तुम्ही वर्षानुवर्षे मिळवलेले तंत्रज्ञान नेतृत्व अत्यंत महत्त्वाचे आहे. चला, हे काम आपण एका ध्येयभावनेने आणि उत्साहाने करूया. ही पोस्ट वाचून अमेरिकेतील किती भारतीय वंशाचे लोक भारतात परत येतील, हे सांगणे अवघड असले, तरी त्यांच्यापैकी अनेकांच्या मनात अशी भावना निर्माण झाली आहे. इतर देशांची 'नरकाशी' तुलना करणार्या अमेरिकन नेत्यांना अमेरिकेतील परिस्थिती हाताळणे अवघड झाले आहे, हेच खरे!

पान २ वरून

## 'एल्डरिज' युद्धनौका 'टेलिपोर्ट' झाली...

कालदृष्ट्यासुद्धा ती 'टेलिपोर्ट' झाली. म्हणजे, त्याच काळात ती लांब अंतरावरच्या दुसर्या ठिकाणी दृश्य झाली. मात्र, परत येताना ती पृथ्वीवर आज ज्या चार मिती - डायमेन्शन्स आहेत, लांबी, रुंदी, उंची आणि काळ यांच्या पलीकडच्या पाचव्या मितीमध्ये गेली. तिथून परत येताना तिच्यावरचे काही लोक याच पाचव्या मितीत राहिले, काही जहाजाला चिकटून परतले आणि काही त्या अतर्क्य, अमानवी अनुभवामुळे वेडे झाले. प्रचलित विज्ञानाच्या कोणात्याही कसोटीवर यांपैकी कोणतीही गोष्ट हडसून-खडसून सिद्ध होऊ शकलेली नाही. यामुळे कोणतेही सरकारी खाते वा वैज्ञानिक संस्था या प्रकाराला मान्यता देत नाही. पण सर्वसामान्य अमेरिकन समाजात मात्र ही कथा 'फिलाडेल्फिया एक्सपेरिमेंट' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यावर याच नावाने पुस्तके, चित्रपट आणि दूरदर्शन मालिकादेखील निघाल्या आहेत.

पान २ वरून

## ऋणानुबंध

हे तुम्हाला ठेवायचं नाही का? तुम्हाला हे मौल्यवान आहे न.'' ''आपल्या मौल्यवान गोष्टी आपल्याला मौल्यवान असलेल्या माणसांना द्यायलाच हव्या. म्हणून तर काका तुला देतायत गं.'' हसत हसत काकू म्हणाली. ''माझं सगळं स्त्री धन माझ्या देखत मी मुला-मुलींना जावई-सुनांना आणि नातवंडांना देऊन टाकलंय. काका स्मित हास्य करत म्हणाले. ''आणि शेवटी कसं सगळं इथेच सोडून जायचंय तर आपल्या डोळ्यांदेखत ज्यांना जे आवडतं, ते दिलं तर आनंद आणि समाधान दोन्ही मिळतं, नाही का!'' काका म्हणाले. ''तुला लक्षात येतंय ना, देण्याचं आणि समाधानी आनंदाचं नातं?'' ''वाचनामुळे मला जीवनाची अनेक सूत्रे कळली; त्यात सतत देत राहायची किमया आणि मजा दोन्ही कळली.'' काका सांगू लागले, नातेवाईकांना मार्गदर्शन दिलं. समाधान मिळालं. आई-वडिलांना सेवा दिली. पुण्य मिळालं. मित्रांना साथ दिली. प्रेम मिळालं. समाजाला सेवा दिली. आदर मिळाला. स्वतःला वेळ दिला. आरोग्य मिळालं...'' काकांचं बोलणं ऐकता ऐकता गौरीला आपले डोळे पाणावत आहेत, असं वाटू लागलं, ते ओळखून काका तिला हसवायला क्षणभर थांबून मिश्कीलपणे म्हणाले, ''आणि मुलांना माझं क्रेडिट कार्ड दिलं तर 'चांगला बाप' हा खिताब मिळाला!'' आता मात्र सगळ्यांच्याच डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या.

पान २ वरून

## कचऱ्यात हरवलेलं बालपण

त्यामुळे कचरा व्यवस्थापनाशी जोडलेल्या कुटुंबांना सामाजिक संरक्षण, स्थिर रोजगार आणि पुनर्वसनाच्या संधी देणं आवश्यक आहे. त्याचबरोबर मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष शिक्षण कार्यक्रम आणि समुदाय स्तरावर काम करण्याची गरज आहे. शहरांच्या स्वच्छतेसाठी मोठ्या मोहिमा राबविल्या जातात. परंतु त्या स्वच्छतेच्या प्रक्रियेत कचऱ्यात काम करणाऱ्या मुलांच्या आयुष्याबद्दल आपण किती विचार करतो? जर शहर स्वच्छ होत असेल, पण त्या स्वच्छतेच्या बदल्यात हजारो मुलांचं बालपण कचऱ्यात हरवत असेल, तर त्या स्वच्छतेचा अर्थ काय? समाजाच्या प्रगतीची खरी कसोटी त्याच्या सर्वात असुरक्षित मुलांच्या आयुष्यावरून ठरते. जर शहराच्या इमारतींच्या सावलीत अजूनही काही मुलं कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये भविष्य शोधत असतील, तर विकासाच्या दाव्यांवर पुन्हा विचार करण्याची वेळ आहे. कारण शेवटी प्रश्न कचऱ्याचा नाही; प्रश्न त्या मुलांच्या हरवत चाललेल्या बालपणाचा आहे.

पान ३ वरून

## जगावेगळी तक्षशिला

असेही अपोलोनियसला ज्ञान झाले. चार महिने सोफोईजवळ राहून अपोलोनियसने त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांच्या गूढ विद्या शिकून घेतल्या. सात ग्रहांच्या सात अंगठ्या, पुढच्या प्रवासासाठी उंट आणि वाटाड्या अशा भेटवस्तूंचा स्वीकार करीत अपोलोनियस आता परतीच्या प्रवासाला निघाला. अपोलोनियसच्या प्रवासवर्णनात तक्षशिला विद्यापीठाचा प्रत्यक्ष उल्लेख नाही. पण तक्षशिला नगरी आणि आसपासच्या परिसरातील तत्त्ववेत्त्यांचे जग आणि त्यांची प्रभावी तपश्चर्या, राज्यकर्त्यांना असलेली ज्ञानसाधनेची आस अपोलोनियसच्या शब्दाशब्दातून झिरपते आणि प्राचीन भारतीय संस्कृतीच्या खिडकीतून आलेल्या तेजाच्या तिरिपेने आपले डोळे दिपून जातात.

पान ३ वरून

## हरविलेली शांतता

पण आपण सर्व याला मानण्यास तयार नाही. आपण सर्व या ध्वनी-अत्याचाराचे बळी ठरत आहोत व त्यामुळे आपली मुले फार मोठ्या प्रमाणात प्रभावित होत आहेत, याचेही भान आपल्याला उरलेले नाही. या पृष्ठभूमीवर मी त्या खेडेगावात अनुभवलेली आनंदमयी प्रसन्नता प्रदान करणारी शांतता मला फारच भावली. त्या १० मिनिटांच्या शांततेने अनेक वर्षांचा कानांवरचा थकवा आणि ओझे दूर झाल्यागत वाटत होते. ती शांतता मनाच्या गाभारी झिरपत जाताना आम्ही सर्वांनी अनुभवली. ही शांतता जर आपण मिळवू शकलो आणि त्याचे पावित्र्य जर आपल्याला अनुभवता आले तर आपल्या जीवनात निर्माण होणारा तणाव आपल्याला सहज कमी करता येईल आणि तो देखील मनोविश्लेषकाला न भेटता व अँटी डीप्रेसंट गोळ्या न घेता. मनाला उभारी देणारी ही शांतता शोधूया...!

**वेध** मधुरा कुलकर्णी

**सर्वोच्च न्यायालयाने लष्कर, नौदल आणि हवाई दलातील महिला अधिकाऱ्यांच्या संदर्भात अलिकडेच दिलेल्या निकालांमधून निदर्शनास आणले की, महिलांना दीर्घकाळ कायमस्वरूपी कमिशनसाठी पात्र मानले जात नव्हते. त्यानुसारच त्यांच्या मूल्यांकनाची पद्धत विकसित झाली. त्यांना महत्त्वाच्या संधी, नियुक्त्या आणि पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले. त्यांच्या कारकीर्दीवर या भेदभावाचा परिणाम स्पष्टपणे दिसून आला.**

# महिलांना संधीचे दार खुले



लिंग समानता ही केवळ सामाजिक न्यायाची संकल्पना नाही, तर मानवजातीच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया आहे. जगभरातील संघर्ष, अस्थिरता आणि बदलत्या सुरक्षा आव्हानांच्या पृष्ठभूमीवर महिलांचा सहभाग आणि सक्षमीकरण हा केवळ नैतिक प्रश्न न राहता एक धोरणात्मक गरज बनली आहे. याच जाणिवेतून संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने इ. स. २००० मध्ये महिला, शांतता आणि सुरक्षा या विषयावरील ऐतिहासिक ठराव स्वीकारला. या ठरावाने जगभरातील देशांना शांतता प्रक्रियेत महिलांचा पूर्ण, समान आणि अर्थपूर्ण सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहन केले. या ठरावामागील मूलभूत विचार अत्यंत स्पष्ट आहे. शांतता प्रस्थापित करण्याच्या आणि टिकवून ठेवण्याच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग नसल्यास ती प्रक्रिया अपुरी आणि कमकुवत ठरते. महिलांना केवळ संघर्षग्रस्त म्हणून पाहण्याऐवजी बदलाचे सक्रिय घटक मानणे ही या ठरावामागील वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. त्यामुळेच राजकारण, संरक्षण, कूटनीती आणि धोरणनिर्मिती यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढविणे ही गरज आहे. तथापि, प्रत्यक्षात पाहता संरक्षण क्षेत्र अजूनही मोठ्या प्रमाणात पुरुषप्रधान आहे.

लष्कर, नौदल आणि हवाई दल यांसारख्या संस्थांमध्ये महिलांचा सहभाग गेल्या काही दशकां ध्ये वाढला असला, तरी अद्याप समाधानकारक पातळीवर पोहोचलेला नाही. उपलब्ध आकडेवारीनुसार २०२३ मध्ये जगातील केवळ १३ टक्के संरक्षण मंत्री महिला होत्या. सशस्त्र दलां धील महिलांचे प्रमाण काही प्रमाणात वाढले असले, तरी लष्करात १२ टक्के, हवाई दलात १५ टक्के, नौदलात १४ टक्के आणि पोलिस दलात १६ टक्के इतकेच मर्यादित आहे. बदलत्या काळात हा चर्चेचा आणि चिंतनाचा विषय बनला आहे.

आजघडीला भारतीय लष्करामध्ये वरिष्ठ नेतृत्व पातळीवर महिलांची उपस्थिती अत्यल्प आहे. जवळजवळ ९७ टक्के जनरल आणि ॲडमिरल पुरुष आहेत. ही परिस्थिती केवळ संख्यात्मक असमानतेची नाही, तर निर्णय प्रक्रियेतल्या असमतोलाची द्योतक आहे. धोरणनिर्मिती आणि सुरक्षा निर्णयां ध्ये महिलांचा आवाज कमी असतो, तेव्हा त्या धोरणांमध्ये लिंगस ंवेदनशीलता आणि समावेशकता कमी पडते. परिणामी, महिलांच्या सुरक्षेसंबंधीच्या गरजा आणि अनुभव अनेकदा दुर्लक्षित राहतात. संयुक्त राष्ट्रांनी प्रकाशित केलेल्या 'टोवर्डस इक्वल ऑपॉर्च्युनिटी फॉर वुमेन इन डिफेन्स' या अहवालात या असमानतेचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे.

५० हून अधिक देशांमधील संरक्षण क्षेत्रांचा अभ्यास करून या अहवालाने महिलांच्या सहभागातील प्रगती, कायमस्वरूपी अडथळे आणि उपलब्ध संधी यांचे वास्तव चित्र मांडले आहे. विशेषतः जागतिक लष्करी खर्चात होत असलेली विक्रमी वाढ आणि 'डब्ल्यूपीएस' अजेंड्याला जवळपास २५ वर्षे पूर्ण होत असताना, या अहवालाने अधिक ठोस आणि प्रभावी उपाययोजनांची गरज अधोरेखित केली आहे. न्यायालयाने लष्कराच्या 'निष्काळजी श्रेणीकरण' या संकल्पनेवर कठोर टीका केली. महिला अधिकाऱ्यांना आपल्या नेतृत्वक्षमतेचा पूर्ण विचार न करता कमी दर्जाचे मूल्यांकन दिले जात होते.

नौदलामध्ये निवड प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव ही गंभीर त्रुटी असल्याचे न्यायालयाने नमूद केले, तर वायुसेनेमध्ये जुन्या आणि अप्रासंगिक कामगिरी नोंदींवर आधारित मूल्यांकन करणे मनमानी आणि अन्यायकारक असल्याचे स्पष्ट केले. ही निरीक्षणे केवळ कायदेशीर मुद्दे नाहीत, तर व्यापक सामाजिक मानसिकतेचे प्रतिबिंब आहेत. संरक्षण क्षेत्रासारख्या संवेदनशील आणि महत्त्वाच्या क्षेत्रात महिलांच्या क्षमतेकडे अजूनही संशयाच्या नजरेने पाहिले जाते. ही मानसिकता बदलल्याशिवाय केवळ धोरणात्मक सुधारणा पुरेशा ठरणार नाहीत.

आजच्या बदलत्या जागतिक परिस्थितीत, जिथे सुरक्षा आव्हाने अधिक जटिल आणि बहुआयामी होत आहेत, तिथे विविधता आणि समावेशकता ही ताकद ठरू शकते. महिलांचा सहभाग वाढल्यास निर्णयप्रक्रिया अधिक समतोल, संवेदनशील आणि प्रभावी होऊ शकते. संयुक्त राष्ट्रांचे शांतता मोहिमांचे उपमहासचिव जीन- पियरे लॅक्रॉईक्स यांनी म्हटल्याप्रमाणे लष्करी कारवायांमध्ये लिंग आधारित दृष्टिकोन समाविष्ट करणे ही आता केवळ पर्यायाची बाब राहिलेली नाही, तर एक धोरणात्मक आवश्यकता बनली आहे. यासाठी पुढील काळात अधिक ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

समान संधी देणारी धोरणे, पारदर्शक आणि न्याय्य निवड प्रक्रिया, नेतृत्व पातळीवर महिलांचे प्रतिनिधित्व वाढविणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संस्थात्मक आणि सामाजिक मानसिकतेत बदल घडवून आणणे या सर्व बाबींची अंमलबजावणी एकत्रितपणे करावी लागेल. लिंग समानता ही केवळ महिलांसाठीची लढाई नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे.

शांतता, समृद्धी आणि स्थिरता साध्य करायची असेल, तर महिलांना केंद्रस्थानी ठेवूनच पुढील वाटचाल करावी लागेल. अन्यथा, विकासाचा प्रवास अपूर्ण आणि असमतोल राहण्याचा धोका कायम राहील.

भारतातील संरक्षण क्षेत्रात महिलांच्या समान हक्कांच्या लढ्याला निर्णायक वळण देणारे अलिकडील निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या निर्णयांनी केवळ वैयक्तिक प्रकरणांमध्ये न्याय दिला नाही, तर संस्थात्मक पातळीवर खोलवर रुजलेल्या असमानतेवरही प्रकाश टाकला आहे. न्यायालयाने सर्व प्रकरणांमध्ये पुनर्नियुक्ती किंवा पुनर्विचाराचा आदेश दिला नसला, तरी प्रभावित महिला अधिकाऱ्यांना निवृत्ती वेतन आणि इतर सेवा लाभ देण्याचे निर्देश दिले.

विशेषतः हवाई दलाच्या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनी २० वर्षांची सेवा पूर्ण केली आहे, असे गृहीत धरून पेन्शनचा हक्क देण्यात आला, हा एक प्रकारचा न्यायिक समतोल साधण्याचा प्रयत्न होता. सर्वोच्च न्यायालयाने भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे निर्देश दिले. निवड प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित करणे, मूल्यांकन निकष स्पष्ट करणे आणि रिक्त पदांची माहिती आगाऊ जाहीर करणे या बाबी केवळ प्रशासकीय सुधारणा नसून न्यायाच्या मूलभूत तत्त्वांचा भाग आहेत. संरक्षण क्षेत्रासारख्या संवेदनशील संस्थांमध्ये पारदर्शकता ही विश्वास आणि कार्यक्षमतेची पूर्वअट आहे, हे न्यायालयाने अधोरेखित केले. या निर्णयांचा संदर्भ पाहिला, तर ते अचानक उद्भवलेले नाहीत.


याआधीच्या बबिता पुनिया आणि लेफ्टनंट कर्नल नितीशा यांच्याशी संबंधित महत्त्वपूर्ण प्रकरणां ध्येही न्यायालयाने महिला अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी कमिशनसाठी पात्र ठरविले होते. त्या निर्णयांनी या लढ्याची पायाभरणी केली होती आणि सध्याचे निकाल त्या प्रवासातील पुढचे टप्पे ठरले आहेत.

न्यायालयाने आपल्या निरीक्षणांमध्ये एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित केला. सेवा कायद्यातील निष्पक्षतेचा अर्थ केवळ नियमांचे पालन नसून मूल्यांकन करताना प्रत्यक्ष करीअर संधींचा विचार करणे आवश्यक आहे. दीर्घकाळ चालत आलेल्या भेदभावपूर्ण प्रणालीमुळे महिलांच्या करीअरवर झालेला परिणाम लक्षात घेता केवळ औपचारिक समानता पुरेशी नसून वास्तविक समानता साध्य करणे गरजेचे आहे. या प्रकरणाच्या केंद्रस्थानी असलेली समस्या म्हणजे शॉर्ट सर्व्हिस कमिशन प्रणाली. या अंतर्गत महिलांना मर्यादित कालावधीसाठी सेवा

देण्याची परवानगी होती. याउलट, पुरुष अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी कमिशन मिळत असे. त्यामुळे त्यांना दीर्घकालीन करीअर, पदोन्नती आणि निवृत्ती वेतनाचे लाभ मिळत. हा फरक गुणवत्तेवर आधारित नसून व्यवस्थेतील अंगभूत पक्षपाताचे प्रतीक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. संविधानातील अनुच्छेद १४२ चा वापर करून न्यायालयाने 'संपूर्ण न्याय' देण्याचा प्रयत्न केला. हा अधिकार विशेष परिस्थितीत न्यायालयाला व्यापक उपाययोजना करण्याची मुभा देतो आणि या प्रकरणात तो दीर्घकाळ वंचित राहिलेल्या महिला अधिकाऱ्यांसाठी दिलासा ठरला.

---

**वेधक** संजीव ओक




**'अँथ्रोपिक' या आघाडीच्या 'एआय' कंपनीने विकसित केलेले 'क्लॉड मिथोस' हे नवीन 'एआय' मॉडेल सध्या जागतिक चर्चेचा आणि चिंतेचा विषय ठरले आहे. तंत्रज्ञानाच्या या नव्या, स्वायत्त आणि काहीशा विद्ध्वंसक वळणाचा वेध घेतानाच, भारतासारख्या वेगाने प्रगती करणार्या डिजिटल अर्थव्यवस्थेवर याचे किती भयंकर परिणाम होऊ शकतात, याचे विलेषण म्हणूनच गरजेचे.**

# क्लॉड मिथोस : सायबर सुरक्षेचे अभूतपूर्व आव्हान

दि. ७ एप्रिल रोजी 'एआय' क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या 'अँथ्रोपिक'ने त्यांच्या 'क्लॉड' श्रृंखलेतील सर्वांत प्रगत आणि नवीन मॉडेल 'क्लॉड मिथोस प्रिव्ह्यू'ची अधिकृत घोषणा केली. आजवर आपण 'चॅटजीपीटी' किंवा इतर अनेक प्रगत 'एआय' मॉडेल्स पाहिली आहेत. या मॉडेल्सना 'जनरेटिव्ह एआय' म्हटले जाते. परंतु, 'मिथोस' हे या सर्व मॉडेल्सच्या कित्येक पावले पुढे आहे. हे मॉडेल 'एजंटिक' स्वरूपाचे आहे. 'एजंटिक मॉडेल'चा अर्थ असा की, हे मॉडेल दिलेल्या कामासाठी स्वतःहून निर्णय घेऊ शकते, स्वतःच्या चुकांमधून शिकू शकते, अनेक टप्प्यांमध्ये विभागलेली गुंतागुंतीची कामे पार पाडू शकते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, संगणकीय प्रणालींम धील अतिसूक्ष्म त्रुटी शोधून त्यावर कोणत्याही मानवी हस्तक्षेपाविना स्वायत्तपणे सायबर हल्ला करू शकते. तज्ज्ञांच्या पातळीवरील हॅकिंगच्या कामांमध्ये तब्बल ७३ टक्के यश मिळविले. या चाचणीदरम्यान, 'मिथोस'ने सायबर हल्ल्याचे ३२ टप्प्यांचे एक अत्यंत गुंतागुंतीचे 'सिम्युलेशन' स्वतःहून यशस्वीपणे पूर्ण केले.

एखादा अत्यंत कुशल मानवी हॅकर ज्या प्रणालीला भेदण्यासाठी आणि तिचा ताबा मिळवण्यासाठी अनेक दिवस किंवा महिने घेतो, तेच काम 'मिथोस' अवघ्या काही मिनिटांत करून दाखवते. हे मॉडेल सॉफ्टवेअरमधील अशा त्रुटी शोधून काढते, ज्यांच्याबद्दल प्रत्यक्ष सॉफ्टवेअर निर्मात्यांनाही माहिती नसते. अशा अज्ञात त्रुटींना तांत्रिक परिभाषेत 'झिरो-डे व्हल्नेरेबिलिटी' असे म्हणतात. 'मिथोस'ने जगातील सर्व प्रमुख ऑपरेटिंग सिस्टम्स आणि वेब ब्राऊझर्समध्ये हजारो 'झिरो-डे' त्रुटी शोधून काढल्या आहेत, ज्यात गेल्या २७ वर्षांपासून सिस्टममध्ये लपून राहिलेल्या त्रुटींचाही समावेश आहे. 'अँथ्रोपिक' कंपनीला या मॉडेलच्या विद्ध्वंसक क्षमतेची पूर्ण जाणीव होती. हे मॉडेल चुकीच्या हातांत पडले किंवा सार्वजनिकरित्या उपलब्ध झाले, तर ते जगभरातील डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये हाहाकार उडवू शकते, याची त्यांना खात्री होती. म्हणूनच त्यांनी हे मॉडेल सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध करून न देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्याऐवजी त्यांनी 'प्रोजेक्ट ग्लासस्विंग' नावाचा एक अत्यंत नियंत्रित उपक्रम सुरू केला. या उपक्रमांतर्गत निवडक आणि अत्यंत विश्वासार्ह संस्थांनाच सायबर सुरक्षेच्या संरक्षणात्मक उद्देशांसाठी या अनरिलिज्ड मॉडेलचा वापर करण्याची परवानगी देण्यात आली. असे असतानाही 'डिस्कॉर्ड' या समाजमाध्यमावर काही अनधिकृत वापरकर्त्यांनी 'क्लॉड मिथोस'च्या प्रणालीत घुसखोरी करून अनधिकृत प्रवेश मिळवल्याचे उघड झाले. त्यामुळे, जगभरातील सरकारे, बँका आणि गुप्तचर यंत्रणांचे धाबे दणाणले.

आतापर्यंत सायबर सुरक्षा, 'एआय'नियमन आणि आपत्ती व्यवस्थापन हे तीन वेगळे विषय मानले जात होते आणि त्यांच्यासाठी वेगवेगळ्या तज्ज्ञांची फौज काम करत असे. परंतु, 'मिथोस'च्या उदयानंतर हे तिन्ही विषय एकत्र करून त्यांना एकाच 'डिजिटल रिस्क गव्हर्नन्स'च्या चौकटीत आणण्याची निकड निर्माण झाली आहे.

जागतिक स्तरावरील या घडामोडींचा भारतावर काय आणि किती भीषण परिणाम होऊ शकतो, हा यातील सर्वांत कळीचा आणि महत्त्वाचा मुद्दा आहे. आज भारत वेगाने डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. भारतासमोरील सर्वांत मोठी आणि चिंताजनक अडचण ही आहे की, आपला आर्थिक, सरकारी आणि नागरी व्यवहारांचा एक अत्यंत मोठा भाग अजूनही जुन्या सॉफ्टवेअर आणि कालबाह्य प्रणालींवर चालतो. जेव्हा 'मिथोस'सारखे अत्याधुनिक 'एआय' मॉडेल या जुन्या प्रणालींवर आपली नजर टाकेल, तेव्हा त्याला अशा हजारो 'झिरो-डे' त्रुटी सहज मिळतील, ज्यांच्याबद्दल आपल्याला कोणतीही कल्पना नाही. भारतीय संस्थांकडे या जुन्या त्रुटी तत्काळ दूर करण्याची तांत्रिक क्षमता आणि वेग सध्या तरी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही.

अशा असुरक्षित परिस्थितीत, जर एखाद्या परदेशी हॅकरला किंवा देशाच्या शत्रूला भारताच्या बँकिंग प्रणालीत, ऊर्जा-ग्रीडमध्ये किंवा दूरसंचार क्षेत्रात शिरकाव करायचा असेल, तर त्याला केवळ या 'एआय' मॉडेलचा वापर करायचा आहे. क्षणात देशाची अर्थव्यवस्था ठप्प होऊ शकते, कोट्यवधी नागरिकांचा अत्यंत संवेदनशील डेटा चोरीला जाऊ शकतो आणि संपूर्ण देशात अभूतपूर्व गोंधळाची स्थिती निर्माण होऊ शकते. या अभूतपूर्व धोक्याची दखल घेत, भारत सरकारने अत्यंत तातडीने आणि गंभीरपणे पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. दि. २३ एप्रिलला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बँकिंग क्षेत्रातील सर्वोच्च अधिकार्यांची आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्रतिनिधींची एक अत्यंत महत्त्वाची उच्चस्तरीय बैठक बोलावली होती.

'अँथ्रोपिक'च्या या नव्या मॉडेलच्या अनधिकृत प्रवेशामुळे भारतीय बँकिंग क्षेत्राला आणि देशाच्या आर्थिक स्थिरतेला निर्माण झालेल्या धोक्याचा सविस्तर आढावा घेणे, हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. त्यांनी सर्व बँका आणि वित्तीय संस्थांना अति-दक्षता बाळगण्याचे आणि या नव्या तंत्रज्ञानातून निर्माण होणाऱ्या धोक्यांचा सामना करण्यासाठी तातडीने एक भक्कम समन्वय यंत्रणा विकसित करण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय, बँकांनी आपली सायबर सुरक्षा अधिक मजबूत करून 'मिथोस'सारख्या मॉडेल्सपासून प्रणालींचे रक्षण करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजावेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. देशांतर्गत बैठकांवर न थांबता, अधिकाऱ्यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या माध्यमातून 'अँथ्रोपिक'च्या अमेरिकेतील नेतृत्वाशी थेट चर्चाही सुरू केली आहे. 'इंडियन कम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम' या देशाच्या सर्वोच्च सायबर सुरक्षा संस्थेला या प्रक्रियेत सामावून घेण्यात आले असून, ते परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. हा धोका एका कंपनीपुरता किंवा 'क्लॉड मिथोस' या एका मॉडेलपुरता मर्यादित नाही. भविष्यात यापेक्षाही अधिक प्रगत, चपळ आणि विनाशकारी 'एआय' मॉडेल्स बाजारात येणार आहेत. अशा परिस्थितीत सायबर सुरक्षेचे सक्षमीकरण करण्यासाठी भारताला बहुआयामी आणि आक्रमक धोरण आखावे लागेल. एकूणच नव्या युगाचे हे अदृश्य आव्हान पेलण्यासाठी भारत नक्कीच सक्षम आहे; परंतु त्यासाठी कृतीची वेळ आजची आणि आताचीच आहे!

---




तृप्त पिऊन बहावा,
उन्ह सोनेरी कोवळे
उन्हाच्या सोन्याचे त्या,
मना मनात सोहळे
मना-मनाच्या सोहळ्यात
स्वप्न हळदी पिवळे
मनी सावलीचे उन्ह,
स्वप्न अधिर बावळे
स्वप्न अधिर बावळे
डोईवर नभ निळे
निळ्या निळ्या नभात
त्या उडे थव्यांनी कावळे.
थव्यातल्या कावळ्याचे
चित्त पिंडाकडे वळे
बहाव्याच्या दिवसात
पितरांशी नाते जुळे
नाते जुळता जुळता
नयन भरतात खुळे
बहाव्याच्या शेंड्यावर,
तृप्त पितर सावळे..

**अश्विनी भागवत**

## झुला

झुला बांधिला आम्र उद्यानी ।
गौरी झुलते ही चैत्रांगणी ।।धृ।।
मिटल्या पापणी दवबिंदूंचे थेंब ।
जैसे प्राजक्त होई ओलाचिंब ।।
हळूच खुणवी तीज रविबिंब ।
मुग्ध कळी ती लाजली मनी ।।१।।
हरितवर्णी लेवूनी पैठणी ।
बकुळीचे डूल घालुनी कर्णी ।।
सुमन हार गळा घालुनी ।
गेली गेली वरती गगणी ।।२।।
दिव्य कुंकुम विलसे भाळी ।
काय वर्णावी ती वेल्हाळी ।।
हिमकन्या ही राजस बाळी ।
जिने अनुपम पुष्प माळलेत वेणी ।।३।।
गौरी झुलते ही चैत्रांगणी ।।धृ।।
झुला बांधिला आम्र उद्यानी ।।

**अश्विनी भागवत**

देश एकीकडे आर्थिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत असताना महासत्ता होण्यात मोठी भूमिका बजावू शकणाऱ्या युवकांनाच शिक्षण अर्धवट सोडावे लागत आहे. अझीम प्रे जी फाऊंडेशनचा याबाबतचा अहवाल धोरणकर्त्यांच्या डोळ्यां ध्ये झणझणीत अंजन घालणारा आहे. अहवालातून पुढे आलेल्या विविध मुद्यांचा विचार केला असता हा पायंडा दुर्दैवी ठरत असून त्याची साकल्याने नोंद घेणे आवश्यक ठरत आहे.

# उच्च शिक्षणाकडे मुलांची पाठ का?



निमीत्त

नंदकुमार काळे

‘अझीम प्रेमजी फाऊंडेशन’च्या एका महत्त्वपूर्ण अहवालानुसार २०१७ ते २०२४ या केवळ सात वर्षांच्या कालावधीमध्ये उच्च शिक्षणात मुलांच्या प्रवेशाचे प्रमाण ३८ टक्क्यांवरून घसरून ३४ टक्क्यांपर्यंत आल्याचे समोर आले आहे. याहूनही अधिक चिंतेची बाब म्हणजे २०१७ मध्ये कुटुंबाला मदत करण्यासाठी शिक्षण सोडणाऱ्या मुलांचे प्रमाण ५८ टक्के होते. २०२४ मध्ये ते वाढून ७२ टक्क्यांपर्यंत पोहोचले. ज्या काळात प्रत्येक जण केवळ शिक्षणावर लक्ष केंद्रित करून भविष्य घडवण्याची गरज अधोरेखित करताना दिसतो, तेव्हाच हे चित्र समोर येत असल्याने हे आकडे धक्कादायक ठरत आहेत. त्याच काळात अनेक मुले महाविद्यालय सोडून किरकोळ नोकऱ्यांना प्राधान्य देत आहेत.

कुटुंबाला हातभार लावण्याची आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याचीभावना पुढील शिक्षण अर्धवट सोडण्याचे कारण बनत आहे. परिणामी, उच्च शिक्षणातील प्रवेशदर घटताना दिसत आहे. उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणे आणि कुटुंबासाठी शिक्षण सोडणे यासंबंधीचे हे आकडे ‘विकसित भारत’ या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी अडथळा ठरत आहेत. उच्च शिक्षण न घेताही सहज चांगल्या नोकऱ्या उपलब्ध होत आहेत, म्हणून असे काही घडत नाहीये. प्रत्यक्षात, असे करणाऱ्यांना बहुतेक वेळा लहान-मोठ्या नोकऱ्यांवरच समाधान मानावे लागते. स्वयंरोजगारात असणाऱ्यांनाही केवळ उपजीविकेपुरतेच उत्पन्न मिळते. म्हणूनच हा पायंडा दुर्दैवी ठरत असून त्याची साकल्याने नोंद घेणे आवश्यक ठरत आहे. उच्च शिक्षणातून बाहेर पडणाऱ्या मुलांची आकडेवारी चिंताजनक आहे. शालेय स्तरावर प्रवेश आणि टिकाव यात सुधारणा दिसून येत असली, तरी माध्यमिक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गळती होते. दहावीनंतर सर्व विद्यार्थी अकरावीमध्ये प्रवेश घेत नाहीत आणि घेतात त्यांच्यापैकीही अनेक जण बारावीपुढे उच्च शिक्षणाकडे वळत नाहीत. देशाचा उच्च शिक्षणातील एकूण नावनोंदणी दर, म्हणजेच ‘ग्रॉस एनरोलमेंट रेशो’ सुमारे २७ टक्क्यांच्या आसपास आहे. म्हणजेच उच्च शिक्षणासाठी पात्र असलेल्या दर १०० तरुणांपैकी २७ जणच महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत.

जागतिक दर लक्षात घेता हा आकडा खूपच कमी आहे. ही घसरण केवळ आकड्यांमध्ये मर्यादित नाही, तर वास्तवातही दिसून येते. काही राज्यांमध्ये महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरीत्या घटली आहे. काही पारंपरिक अभ्यासक्रमांमध्ये तर प्रवेश निम्म्याने कमी झाल्याची उदाहरणे आहेत. याशिवाय, उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणारे काही विद्यार्थी विविध कारणांमुळे शिक्षण मध्येच सोडतात. त्यामुळे एकूण शैक्षणिक साखळी अधिक कमकुवत होते. यामागील कारणे परस्परांशी गुंतलेली आहेत. सर्वात ठळक कारण म्हणजे आर्थिक अडचणी. अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण परवडत नसते आणि नोकरी किंवा व्यवसायाकडे वळावे लागते. त्यामुळे तातडीच्या गरजांपुढे हा विषय दुय्यम ठरतो.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे रोजगाराची बदलती दिशा. आजच्या काळात कौशल्याधारित प्रशिक्षणाला वाढती मागणी आहे. त्यामुळे काही विद्यार्थी पारंपरिक पदवी अभ्यासक्रम टाळून कौशल्य प्रशिक्षण किंवा अल्पकालीन कोर्सेसकडे वळतात. शैक्षणिक संस्थांच्या गुणवत्तेचा मुद्दाही येथे दुर्लक्षित करता येत नाही.

अनेक महाविद्यालयांमध्ये पुरेशा सुविधा, अद्ययावत अभ्यासक्रम किंवा गुणवत्तापूर्ण शिक्षकांचा अभाव आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाबद्दल आकर्षण कमी होते. यासोबतच ग्रामीण आणि शहरी भागातील दरी, सामाजिक असमानता आणि मार्गदर्शनाचा अभाव या घटकांमुळेही अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून दूर राहतात. मानसिक ताण, स्पर्धेचा दबाव आणि अपयशाची भीती हे घटकदेखील या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतात. या समस्येचे परिणाम दूरगामी आहेत. उच्च शिक्षणातील घटते प्रमाण म्हणजे कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता. यामुळे उद्योग क्षेत्रावर परिणाम होतो, नवोपक्रमाची गती मंदावते आणि देशाच्या आर्थिक प्रगतीला मर्यादा येतात. शिक्षणातील असमानता वाढल्याने सामाजिक विषमताही तीव्र होते. या पृष्ठभूमीवर उपाययोजनांची गरज अत्यंत तातडीची आहे. शिक्षण अधिक परवडणारे आणि सुलभ करण्यासाठी आर्थिक सहाय्य वाढविणे आवश्यक आहे. उच्च शिक्षण आणि रोजगारामध्ये युवावर्गाच्या सहभागाबाबत प्रसिद्ध झालेला ताजा अहवाल खरोखरच चिंताजनक आहे. ज्या उच्च शिक्षणाला युवावर्गाच्या स्वप्नांना दिशा देणारे माध्यम मानले जाते, त्यालाच बाजूला सारून आज अनेक तरुण उपजीविकेसाठी कोणताही मार्ग स्वीकारताना दिसत आहेत.

उच्च शिक्षणामध्ये मुलींच्या नावनोंदणीमध्ये फारसा फरक पडला नसला, तरी कुटुंबाची जबाबदारी उचलण्यामध्ये पुढे मानले जाणारी मुले उच्च शिक्षणाऐवजी नोकरी किंवा स्वयंरोजगाराला प्राधान्य देताना दिसतात. मुलांच्या या वाढत्या प्रवृत्तीवरून स्पष्ट होते की, त्यांनी काही ना काही अडचणींमुळे आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा सोडला आहे. शिक्षण अर्धवट सोडण्याची वाढती प्रवृत्ती ही देशातील रोजगाराच्या संधींशी संबंधित परिस्थितीवरही बोट ठेवते. आपल्या देशात नोकऱ्यांची संख्या ही इच्छुक उमेदवारांच्या तुलनेत कमी आहेच; शिवाय पदांची गुणवत्ता आणि वेतनमानही अपेक्षेप्रमाणे नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर मुलांना अपेक्षित प्रगती साधता येतनाही. अशा परिस्थितीत उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांच्यात आवश्यक प्रेरणा निर्माण होत नाही.

युवकांचे स्वप्न पूर्ण व्हावे आणि ते आपल्या ध्येयापासून विचलित होऊ नयेत, यासाठी धोरणकर्त्यांनी व्यापक स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणातील घटते प्रमाण हा आजच्या भारतासमोरचा एक गंभीर आणि बहुआयामी प्रश्न आहे. शिक्षणाच्या पायऱ्या चढत असताना विद्यार्थ्यांची संख्या टप्प्याटप्प्याने कमी होत जाते आणि शेवटी उच्च शिक्षणाच्या दाराशी पोहोचणाऱ्यांची संख्या अपेक्षेपेक्षा खूपच कमी राहते. हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर देशाच्या भविष्यातील मानवी संसाधनाच्या गुणवत्तेशी थेट संबंधित असलेला मुद्दा आहे. भारतातील शिक्षणव्यवस्थेकडे पाहताना एक विरोधाभास प्रकर्षाने जाणवतो. एका बाजूला ‘शिका आणि पुढे जा’ हा संदेश सातत्याने दिला जात असताना दुसऱ्या बाजूला अनेक तरुण उच्च शिक्षणापासून दूर जाताना दिसत आहेत. विशेषतः मुलांच्या बाबतीत ही प्रवृत्ती अधिक ठळकपणे समोर येत आहे.

महाविद्यालयाच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या अनेक मुलांनी उच्च शिक्षणाकडे पाठ फिरवून थेट रोजगाराच्या शोधात उडी घेतली आहे. हा बदल केवळ वैयक्तिक निवडीचा प्रश्न नसून सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे द्योतक आहे. अलिकडील अहवाल आणि आकडेवारी यावर प्रकाश टाकते. काही वर्षांमध्येच उच्च शिक्षणात मुलांच्या प्रवेशाचे प्रमाण घटले आहे. कुटुंबाला हातभार लावण्यासाठी शिक्षण अर्धवट सोडणाऱ्यांची संख्या वाढली आहे. हे चित्र केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित नाही, तर शहरी भागातही अनेक तरुण आता ‘कमावणे महत्त्वाचे’ या विचाराने पुढील शिक्षण टाळताना दिसतात. यामुळे उच्च शिक्षणाचा मार्ग अनेकांसाठी दूर होत चालला आहे. या मागे सर्वात पहिला मुद्दा आर्थिक वास्तवाचा आहे. उच्च शिक्षणाचा खर्च गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. खासगी महाविद्यालयांची फी, वसतिगृह खर्च, प्रवास, पुस्तके या सर्वांचा एकत्रित भार सामान्य कुटुंबासाठी मोठा ठरतो. अशा परिस्थितीत मुलाने शिक्षण सुरू ठेवण्याऐवजी कमाईकडे वळणे हा अनेक कुटुंबांचा व्यवहार्य निर्णय ठरतो.

‘आजची गरज उद्याच्या स्वप्नांपेक्षा मोठी’ ही मानसिकता इथे स्पष्टपणे दिसून येते; मात्र प्रश्न फक्त शिक्षण महाग होण्याचा नाही. रोजगाराच्या संधींची अनिश्चितता हेही एक मोठे कारण आहे. अनेक तरुणांना पदवी घेतल्यानंतरही खात्रीशीर नोकरी मिळेल, याची हमी वाटत नाही. बेरोजगारी, अल्पवेतन आणि करारनियुक्ती यामुळे शिक्षणावर खर्च केलेला वेळ आणि पैसा वाया जाईल, अशी भीती त्यांच्या मनात निर्माण होते. परिणामी, ते लवकरात लवकर काही तरी काम मिळविण्याचा पर्याय निवडतात. यासोबतच कौशल्याधारित अर्थव्यवस्थेचा वाढता प्रभावही लक्षात घ्यावा लागेल. आज अनेक क्षेत्रांमध्ये औपचारिक पदवीपेक्षा प्रत्यक्ष कौशल्याला जास्त महत्त्व दिले जाते. डिजिटल प्लॅटफॉर्म ’, लघुउद्योग, फ्रीलान्सिंग यांसारख्या पर्यायांमुळे तरुणांना ‘पदवीशिवायही करीअर घडू शकते’ असा विश्वास वाटू लागला आहे. हा बदल सकारात्मक असला, तरी उच्च शिक्षणापासून दुरावण्यास कारणीभूत ठरत आहे.

# भारतातील तरुण लोकसंख्येचे रुपेरी आव्हान...

आकलन

दिपक दोडगे

आजचे तरुण हे उद्याचे प्रौढ आणि ज्येष्ठ नागरिक. त्यामुळे आजघडीला भारत सर्वाधिक तरुण लोकसंख्येचा देश असला, तरी भविष्यात एवढीच संख्या ही ज्येष्ठ नागरिकांची असेल. तेव्हा, देशाच्या लोकसंख्येचा विचार करताना, भविष्यातील आरोग्य क्षेत्रातील आव्हानांचीही दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. त्यादृष्टीने देशातील आरोग्य व्यवस्थेत नेमक्या कोणत्या उपाययोजना राबवाव्या लागतील, यासंबंधीचा ऊहापोह करणारा हा लेख...


भारत आज जगातील सर्वांत मोठ्या तरुण लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जातो. हीच तरुण लोकसंख्या देशाची सर्वांत मोठी ताकद मानली जाते. मात्र, या ताकदीसोबत एक दीर्घकालीन वास्तव जोडलेले आहे. आजचा हा तरुण वर्ग पुढील दोन दशकांत मोठ्या प्रमाणावर ज्येष्ठ नागरिकांमध्ये रूपांतरित होणार आहे. त्यामुळे भारताच्या आरोग्य व्यवस्थेसमोर उभे राहणारे आव्हान हे केवळ व्यवस्थापनाचे नसून, ते सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक स्वरूपाचे आहे. एकूण पाहता, आजमितीस भारतात १६ कोटी ज्येष्ठ नागरिक आहे आणि हीच संख्या २०३५ पर्यंत २४ कोटींवर पोहोचणार आहेत. ही वाढ केवळ लोकसंख्येतील बदल नसून, आरोग्य व्यवस्थेच्या क्षमतेची देखील खरी परीक्षा आहे. जर सध्याच्या पायाभूत सुविधा, डॉक्टरांची उपलब्धता, विमा व्यवस्था आणि जनजागृती यामध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाली नाही, तर २०३५ पर्यंत भारताला 'healthbare rrterr'चा गंभीर सामना करावा लागू शकतो. पण, याच परिस्थितीत एक संधीही दडलेली आहे. योग्य नियोजन केल्यास भारत ‘सिल्व्हर इकोनॉमी’ मध्ये जागतिक नेतृत्व करू शकतो. २०३५ पर्यंत ही भारतासाठी केवळ लोकसंख्येतील बदलांची वर्षे नसून, आरोग्य व्यवस्थेच्या भवितव्याचा निर्णायक टप्पा ठरणार आहे. याचा अर्थ असा की, आजच्या तुलनेत अनेक पटींनी अधिक लोकांना दीर्घकालीन डॉक्टर्स, रुग्णालये, आरोग्य सेवा, औषधे आणि विमा इ. संसाधनांची गरज भासणार आहे. आधीच डॉक्टरांची कमतरता, हॉस्पिटल बेड्सची अपुरी संख्या आणि ग्रामीण-शहरी दरी या समस्या अस्तित्वात असताना, या वाढत्या मागणीचा सामना करणे, ही मोठी कसोटी ठरणार आहे. तथापि, भारताचे चित्र केवळ आव्हानांचे नाही. उलटपक्षी, या बदलत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर भारताकडे काही अद्वितीय ताकदीही आहेत.

भारत हा जगातील सर्वांत मोठ्या जेनेरिक औषध उत्पादक देशांपैकी एक आहे, ज्यामुळे औषधांची किंमत तुलनेने कमी राहते. तसेच, इतर विकसित देशांच्या तुलनेत भारतात सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा स्वस्त आहेत. यामुळे ‘मेडिकल टुरिझम’साठी भारत एक महत्त्वाचे केंद्र बनत आहे. कुशल डॉक्टर, वाढते खासगी रुग्णालयांचे जाळे आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर या सर्व गोष्टी भारताला जागतिक आरोग्य क्षेत्रात महत्त्वाची भूमिका देऊ शकतात. मात्र, या ताकदीचा योग्य उपयोग करण्यासाठी नियोजनबद्ध पावले उचलणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम, सरकारने आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढवणे गरजेचे आहे.

सध्या भारताचा सार्वजनिक आरोग्य खर्च ‘जीडीपी’च्या सुमारे दोन टक्क्यांच्या आसपास आहे, जो विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. ही गुंतवणूक वाढवून प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये आणि ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर डॉक्टर, परिचारिका आणि इतर साहाय्यक वैयक्तिक सेवा तयार करण्यासाठी वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार आणि गुणवत्ता सुधारणा हीदेखील महत्त्वाची बाब आहे. आरोग्य विम्याच्या क्षेत्रात, सर्व ज्येष्ठ नागरिकांना विमा कवच देण्याची गरज आहे.

आजही मोठा वर्ग विम्याच्या कक्षेबाहेर आहे आणि वृद्धावस्थेत विमा मिळवणे अधिक कठीण होत आहे. त्यामुळे तरुण वयातच विमा सुलभ आणि परवडणारा बनवणे, तसेच सार्वजनिक आणि खासगी विमा योजनांमध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे. परंतु, या सर्व उपाययोजनांसोबत एक अत्यंत महत्त्वाचा घटक दुर्लक्षित करता येत नाही, तो म्हणजे जनजागृती. भारतात अजूनही आरोग्य विमा, 'Preventive healthbare' आणि नियमित तपासणी याबाबत पुरेशी जागरूकता नाही. विशेषतः असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांमध्ये आरोग्य सुरक्षेबाबतची जाणीव कमी आहे. या पार्श्वभूमीवर सरकार, स्वयंसेवी संस्था आणि खासगी क्षेत्र यांनी एकत्रितपणे व्यापक जनजागृती मोहीम राबवणे आवश्यक आहे. जसे बँकिंग क्षेत्रात ‘जनधन योजना’मुळे आर्थिक समावेशन वाढले, तसेच आरोग्य क्षेत्रातही "health inblruion' घडवून आणणे गरजेचे आहे.

असंघटित क्षेत्रातील कामगार, जसे की शेतमजूर, बांधकाम कामगार, छोटे व्यावसायिक हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा मोठा भाग आहेत. त्यांच्यासाठी कमी प्रीमियमच्या ‘मायक्रो-इन्शुरन्स’ योजना, सहकारी संस्थांद्वारे सामूहिक विमा आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या मदतीने सहज नोंदणी या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. उदाहरणार्थ, दररोज अगदी अल्प रक्कम (जसे १०-२० रुपये) बचत करून मोठ्या प्रमाणावर आरोग्य विमा कव्हरेज निर्माण करता येऊ शकते, जर योग्य रचना आणि विश्वासार्ह अंमलबजावणी असेल तरच. याला ‘हेल्थ क्रेडीट स्कीम’ असे म्हणतात. यासंदर्भात ‘नारायण हृदयालया’चे संस्थापक यांचे कार्य आणि त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रेरणादायी ठरतो. या रुग्णालय साखळीने ‘कमी खर्चात उत्तम दर्जाची आरोग्य सेवा’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांनी पाच ते दहा लाख रुपयांचा आरोग्य विमा अत्यंत कमी पैशांत उपलब्ध करून दिलेला आहे, जेणेकरून कुटुंबाची आरोग्य जोखीम घेण्याची क्षमता वाढेल. तसेच त्यांच्या रुग्णालयात हृदयरोगाच्या शस्त्रक्रिया ७५ हजार रुपयांत होतात.



भारतात आरोग्य सेवा महाग असण्याचे कारण तंत्रज्ञान नाही, तर व्यवस्थापन आणि स्केलचा अभाव आहे. "ebonomier of rbale'चा वापर करून हृदय शस्त्रक्रिया अत्यंत परवडणार्या किमतीत उपलब्ध करून दिल्या जाऊ शकतात. आणखी एक महत्त्वाची कल्पना म्हणजे 'marr health inrruanbe.' जर मोठ्या लोकसंख्येने अल्प प्रीमियम भरून विमा घेतला, तर संपूर्ण देशासाठी अत्याधुनिक आरोग्य सेवा परवडणार्या दरात उपलब्ध होऊ शकतात. मोठ्या हॉस्पिटल चेनसमोरही काही स्पष्ट जबाबदाऱ्या उभ्या राहतात. केवळ महानगरांमध्ये अत्याधुनिक सुविधा उभारण्यापेक्षा, ’टियर-२’ आणि ’टियर-३’ शहरांमध्ये विस्तार करणे ही काळाची गरज आहे. a'talue-bared healthbare’ या संकल्पनेनुसार, कमी खर्चात दर्जेदार सेवा देणे, हे ध्येय असले पाहिजे.

याशिवाय, वृद्धांसाठी विशेष 'geriartibr bare', घरपोच आरोग्य सेवा आणि दीर्घकालीन उपचारांसाठी स्वतंत्र सुविधा उभारणे आवश्यक ठरणार आहे. या सर्व आव्हानांमध्येच भारतासाठी एक मोठी आर्थिक संधीही दडलेली आहे. वाढती ज्येष्ठांची लोकसंख्या, वाढणारी आरोग्य जाणीव आणि विम्याचा विस्तार यांमुळे आरोग्य क्षेत्र हे पुढील दशकात सर्वांत वेगाने वाढणार्या क्षेत्रांपैकी एक ठरणार आहे. हॉस्पिटल्स, डायग्नोस्टिक सेंटर्स, औषधनिर्मिती, वैद्यकीय उपकरणे, होम हेल्थकेअर आणि वृद्ध सेवा या सर्व क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण होणार आहेत.

आजच्या तरुणांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. वैद्यकीय शिक्षण, नर्सिंग, फार्मसी, हेल्थटेक, बायोटेक्नोलॉजी आणि हेल्थ मॅनेजमेंट या क्षेत्रांमध्ये करिअरच्या असंख्य वाटा खुल्या होत आहेत. तसेच, स्टार्टअप्सच्या माध्यमातून डिजिटल हेल्थ, 'remote diagnortibr' आणि 'elderly bare' यांसारख्या नव्या क्षेत्रांमध्ये नावीन्यपूर्ण उपाय विकसित करण्याची मोठी संधी आहे. लवकरच रुग्णांना ‘आयसीयू’मध्ये न ठेवता, घरच्या घरी, ही सुविधा, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपचार देण्यास सक्षम होणार आहे. भारताच्या किफायतशीर आरोग्य सेवांचा जागतिक स्तरावर विस्तार करण्यासाठी तरुण उद्योजक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शेवटी, भारताचे वैद्यकीय भविष्य अशा वळणावर उभे आहे की, हे आव्हान संधी म्हणून स्वीकारले, तर भारत जागतिक आरोग्य क्षेत्रात अग्रणी स्थान मिळवू शकतो. आजच योग्य निर्णय घेतले, तर उद्याचा भारतीय ज्येष्ठ नागरिक सुरक्षिततेत, सन्मानाने आणि निरोगी आयुष्य जगेल.

या निर्णयांमध्ये सरकार, उद्योगक्षेत्र आणि समाज जितके महत्त्वाचे आहेत, तितकाच महत्त्वाचा आहे, जागरूक, जबाबदार आणि दूरदृष्टी असलेला आजचा तरुण वर्ग...